# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, ७ जानेवारी २०२४

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी • दैनिक

वर्ष - ०३ • अंक - १४४

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

• MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 7 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-03 • ISSUE-144 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-16 • PRICE-05


## आम्ही शोधतोय ऑनलाइन जगातला

# महाराष्ट्राचा महाकवी

### आधुनिक केसरी आयोजित

## राज्यस्तरीय यू-ट्यूब काव्यवाचन स्पर्धा

स्पर्धकांच्या विशेष आग्रहामुळे कविता पाठवण्याचा कालावधी

**15 जानेवारी 2024**


पर्यंत वाढवण्यात आला आहे.

कविता 7620838883 या नंबर वर व्हाट्सप डॉक्युमेंट मध्ये पाठवाव्या.

स्पर्धेचे नियम व अटी माहिती करून घेण्यासाठी कृपया बारकोड स्कॅन करून ग्रुप जॉइन करा.

महाराष्ट्राचा महाकवी
WhatsApp group

सर्व कवींच्या कविता आधुनिक केसरीच्या यू-ट्यूब चॅनलवर प्रसारित होतील.
ज्या कवितेला जास्त वॉच टाइम, व्ह्यूज आणि लाइक येतील तेच होतील महाकवी !




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

तसा समाज घडवण्यासाठी त्यांच्याजवळ इच्छाशक्ती असावी लागते. राममंदिर होणार याचा आनंद आहेच पण उच्च नैतिक मूल्ये, शांत, समाधानी आणि संयमित जीवन जगणारा समाज, एकमेकांचा आदर करणारे नागरिक, गुरुजनांना शीर्षस्थानी बसवणारा आदर्श समाज निर्माण करायचा असेल, तर तो जाणीवपूर्वक घडवावा लागेल. प्रभू श्रीरामांचे गुण अंगी बाणवावे लागतील. रामाचे अतिशय सुंदर, भव्य आणि देखणे मंदिर भलेही आम्ही निर्माण करू, पण रामराज्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. त्याचाच संकल्प या नवीन वर्षात करू या. आपल्या आरोग्यासाठीचे संकल्प तर आपण नववर्षानिमित्त करूच पण हे संकल्प करतानाच निसर्गाचे स्रोत मर्यादित आहेत. ते मी जपून वापरीन, पाणी, ऊर्जा, जलसाठे या गोष्टी मर्यादित आहेत. त्या मी काटकसरीने वापरेन. प्लास्टिकचा वापर शक्य होईल तितका कमी करेन. माझं आणि माझ्या कुटुंबाचं हित साधताना मी समाजाचं सुद्धा काही देणं लागतो या भावनेतून माझ्या उत्पन्नातील किमान दहा वीस टक्के भाग समाजाच्या हितासाठी वापरेन असेही काही नवीन संकल्प नवीन वर्षात घेऊ या. नवीन वर्षात ठरवून वाचण्यासाठी वेळ देऊ या. आपली दृष्टी जाणीवपूर्वक विशाल करू या. याप्रसंगी मला आपले माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या कवितेतील ओळी आठवत आहेत. आपल्या ' आओ फिरसे दिया जलाये ' या कवितेत ते म्हणतात हम पडाव को समझे मंजिल लक्ष्य हुआ आँखोंसे ओझल वर्तमान के मोहजाल में आनेवाला कल न भुलायें आओ फिरसे दिया जलाये ।सगळीकडे निराशाजनक वातावरण असताना अंतरातील स्नेहाने ही ज्योत आपल्याला पुन्हा प्रज्वलित करायची आहे असे अटलजी म्हणतात. नवीन वर्षाची सकाळ त्यासाठीच जणू आपली वाट पाहते आहे. नवीन वर्षात शक्ती, बुद्धी आणि धैर्य देण्यासाठी रामरायाचे स्मरण करू या. मनी धरावे ते होते । विघ्न अवघेचि नासोनि जाते । कृपा केली रघुनाथे । प्रचिती येते ।। श्रीराम ।।
आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा !






## आनंदी पहाट

# वैवाहिक जीवनात परमार्थ असावाच

आधुनिक केसरी

विवाह करण्यामागचे खरे कारण न समजण्याची उणिव असेल तर असे विवाह दीर्घकाळ टिकत नाहीत अथवा टिकले तरीही व्यक्तिगतरीत्या ते असफल झाल्याचेच स्पष्ट होते. विवाहबंधन असा शब्दप्रयोग आपण सर्रास ऐकतो-करतो, तोच खरे तर चुकीचा असल्याची जाणीव करून घेणे आवश्यक असते. सर्व बंधने झुकारून वैवाहिक सुख, समाधान आणि शांती शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, वैवाहिक, शैक्षणिक पातळींवर परस्परांना देण्यासाठी कटिबद्ध असणे जरुरीचे असते. ह्याठिकाणी स्वतः पेक्षा सहचारीणीचा विचार प्रकर्षाने, प्राधान्याने आणि प्रामुख्याने करणे अभिप्रेत असते. ह्या दृष्टीकोनातून स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा ठरत असतो. पती-पत्नींचा परस्परांवर अपेक्षित असणारा विश्वास त्यांच्या नातेसंबंधासाठी महत्वाची भूमिका बजावीत असतो. त्याचे तन-मन एकरूप होण्यासाठी त्यांनीच एकमेकांना समजून घ्यावे लागते. समाजात त्यांच्यासंदर्भातील निर्माण झालेले, त्यांच्या परस्परसंबंधातील नात्याचे चित्र अधिक महत्वाचे असते. ते टिकवून ठेवणे त्याच दोघांवर अवलंबून असते, प्रत्यक्षात तसे असावेही लागते. ह्यासाठी स्वपेक्षा सह्चार्याच्या जाणिवांची उणीव असून चालणार नाही, हे सर्वप्रथम समजून घेणे सद्यःस्थितीत जरुरीचे आहे. विवाह हा स्थिर आणि सुप्रजाकारक कसा होईल, ही काळजी वैदिक काळापासून आधुनिक काळापर्यंत प्रत्येकाला सदैव लागलेली असल्याचे आपण सर्वत्र अनुभवतो. अर्थात, ह्याच काळजीतून विवाह संस्थांची उभारणी होत असल्याचे आपण सर्वचजण जाणतो. पती-पत्नी यांचे वैवाहिक संबंधांमुळे निर्माण होणारे सामाजिक स्थान त्याच दृष्टीने महत्वाचे ठरते. विवाह हा स्थिर म्हणजे दीर्घकाळ टिकणारा तसेच सुख, समाधान आणि मनःशांती देणारा कसा ठरेल, त्यायोगे घराण्याला स्थैर्य लाभून मागील-पुढील पिढ्यांना आणि पर्यायाने समाजाला स्थैर्य कसे लाभेल, यासाठी अनेक नियम आणि कायदे प्रस्थापित केल्याचे आपल्या सर्वांना ज्ञात आहेच.




विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# पूजा...

आधुनिक केसरी

पूजा ही फक्त देव देवतांची करतात असं नाही. आपल्या मनात ज्यांना ज्यांना मानाचे आदराचे स्थान आहे त्यांची आपण त्यांना मानसन्मान देऊन एक प्रकारे पूजाच करत असतो. पूजा म्हटलं की आपल्या डोळ्यासमोर उभी राहते ती सत्यनारायण पूजा, वास्तुपूजा, गौरीपूजा, देवपूजा,चैत्रगौर पूजा, महालक्ष्मी पूजा अशा कितीतरी पूजा. रांगोळी, आरास, धूपदीप, अगरबत्ती, फुले वाहून अशा प्रकारची पूजा केल्याने मन प्रसन्न होते. घरातील वातावरण प्रसन्न होते. असं आपल्या मनाला वाटतं. फक्त देवाला फुलं वाहताना ती आपलीच असावी. कोणाची ओरबाडून आणलेली नको. आपण करत असलेलं काम किंवा नोकरी ही सुद्धा तेवढीच पवित्र असते. नोकरीवर आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. तेव्हा ती प्रथम पूजा. देवपूजे इतकीच नोकरीची पूजा महत्त्वाची असते. कारण ती नीट झाली तर पोटपूजा नीट होते. देवाला फक्त मनोभावे हात जोडून नमस्कार केला तरी ती पूजा पवित्र असते. आणि हात जोडायला फार कष्ट पडत नाही. नोकरीसाठी बाहेर जाताना देवाला हात जोडावेत. कारण सायंकाळी परत सुखरूप आणणारा तोच आहे. आणि दिवसभर नोकरी करण्यास देवाचा आशीर्वाद सोबत घेऊन गेलात तर काम करण्यास बळ येते .सकारात्मक विचार येतात .एक अदृश्य शक्ती आपल्यासोबत आहे असा विश्वास आपल्याला वाटतो. तासनतास पूजा जप तप उपवास वाचन नाही केले तरी चालेल. पण सकाळ संध्याकाळ देवाला फक्त नमस्कार केलात तरी एक सकारात्मक ऊर्जा आपल्याला मिळते. सायंकाळी एक दिवा देवासमोर लावला तर मग जग उजळल्याचा आपल्याला भास होईल. दिवा दुसऱ्यांसाठी जळतो हा त्याचा गुण आपल्यात येईल. स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देणं इतकं सोपं नाहीये. ती एक पूजाच आहे....दीपपूजा,... चांगली माणसं, चांगले विचार, चांगले आचार ,आई वडील यांचीही आपण पूजा केलीच पाहिजे. कोणतीही पूजा खूप महत्त्वाची आणि पवित्र आहे..

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.३१

# सेल्फीचा अतिरेक ही विकृती !

आधुनिक केसरी

कुठे नवीन ठिकाणी गेल्यावर आपल्या परिजनांना त्या ठिकाणची आपली उपस्थिती दर्शवण्यासाठी वेगवेगळ्या कोनांतून सेल्फी काढण्याचे आणि काढलेले फोटो स्टेटसला ठेवून लाईक्स आणि कमेंट मिळवण्याचे हल्ली फॅडच आले आहे. बऱ्याच तरुण तरुणींना या सेल्फीचे जणू व्यसनच जडलेले असते. त्यासाठी ही मंडळी फ्रंट कॅमेरा चांगल्या पिक्सलचा असलेला स्मार्ट फोन खासकरून खरेदी करतात. या व्यसनाच्या अधीन झालेली ही मंडळी देहभान विसरून जिथे जातील तिथे सेल्फी घेत असतात. अनेक मंदिरांमध्ये, आश्रमांमध्ये, लेण्यांमध्ये, प्रदर्शनांमध्ये, पुरातन आणि प्राचीन वस्तूंच्या वस्तू संग्रहालयामध्ये ज्या ठिकाणी छायाचित्रे काढण्यास सक्त मनाई असल्याचे फलक लावलेले असतात अशा ठिकाणीही ही मंडळी स्वतःवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. याठिकाणी यांना कोणी हटकले तरी लपून छपून सेल्फी घेण्याचे यांचे प्रयत्न चालुच असतात. ओठांचा चंबू करून किंवा चेहऱ्यावर बनावटी हास्य आणून वेगवेगळ्या पोजमध्ये यांना सेल्फी घेताना पाहिल्यावर काहीवेळा हसूही आवरता नाही. डोंगराळ भागात, दरीच्या अथवा धबधब्याचा ठिकाणी जाऊन सेल्फी घेण्याच्या नादात कोसळून मृत्यू झाल्याच्या घटना दरवर्षी खासकरून पावसाळी दिवसांत वृत्तपत्रांतून वाचनास येतात. रेल्वे ट्रॅकच्या नजीक धावत्या ट्रेनसह सेल्फी घेणारेही काही महाभाग पाहायला मिळतात. ट्रेनचा नीटसा अंदाज न आल्याने यातील काही महाभागानी आपला जीव गमावला आहे तर काही आयुष्यभरासाठी जायबंदी झाले आहेत. अशा जीवघेण्या घटना वारंवार घडूनही सेल्फीप्रेमींच्या संख्येत आणि त्यांच्या सेल्फीप्रेमात आजतागायत तिळमात्र फरक पडलेला नाही. सेल्फीचा अतिरेक केवळ व्यसन नसून ती एक विकृती असल्याचेही काही सेल्फीप्रेमींच्या विचित्र वागण्यातून दिसून येते. अशी जीवघेणी विकृती सुजाण तरुण-तरुणींनी आपल्यापासून दूर ठेवलेलीच योग्य ठरेल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

# निरुपण


आधुनिक केसरी

आता भलतैसें करावें ।परि द्रव्य मेळऊन न्यावें ।
रितें जातां स्वभावें ।दुःख आहे ॥४५॥
ऐसी वेवर्धना करी ।दुःख वाटलें अंतरीं ।
चिंतेचिये माहापुरीं ।बुडोन गेला ॥४६॥
ऐसा हा देह आपुला ।असतांच पराधेन केला ।
ईश्वरीं कानकोंडा जाला ।कुटुंबकाबाडी ॥४७॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

पूर्ण ज्ञान वैराग में, साथ होय अभ्यास ।
उतरे रोंदा धनुष से, तीर न लागे पास
।।०५।।(स्वर्वेद प्रथम मण्डल तृतीय अध्याय) ०१/०३/०५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
पूर्ण ज्ञान वैराग्ययुक्त झाल्यावरच साधना होते. ज्याप्रमाणे धनुष्यावरून त्याची प्रत्यंचा (दोरी) उतरली असता जवळ असणाऱ्या लक्ष्यालाही बाण लागत नाही, त्याचप्रमाणे पूर्ण ज्ञान वैराग्य विहीन झाल्यावर अभ्यासाद्वारे अनुभव लक्ष्याची प्राप्ती होत नाही. म्हणून ज्ञान-वैराग्य पूर्ण झाल्यावरच योगाचा अभ्यास केला पाहिजे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# ब्रम्हज्ञान

आधुनिक केसरी

स्वस्वरूपाचे वर्णन शब्दांनी केलेले असते.त्याचा अर्थ प्रथम नीट समजून घ्यावा. शब्दाचा अर्थ बरोबर समजणे यालाच वाच्यार्थ असे म्हणतात.काही शब्द खुणेने सद्वस्तूचे वर्णन करतात.म्हणून वाच्यार्थ लक्षात आल्यावर सद्वस्तूचे विचार कसे असतील याची कल्पना करावी. ह्यालाच लक्ष्यांश असे म्हणतात. लक्ष्यांश समजल्यावर मग वाच्यार्थाला महत्व रहात नाही. एकचं लक्ष्यांश निरनिराळ्या शब्दांनी सांगता येतो. म्हणून शब्दांना लक्ष्यांशापेक्षा कमी महत्व असते. सर्व ब्रम्ह जाणणारा म्हणतो की "सर्व दृष्य बाजूला सारून जे शुध्द व निर्मल स्वस्वरूप उरते ते ब्रम्ह होय. सर्वब्रम्ह व विमलब्रह हे दोन्ही पक्ष वाच्यांशामध्येच संपून जातात.त्यांचे क्षेत्र शब्दांच्या पलीकडे नाही. ते फक्त शब्दांच्या कक्षेतचं वावरतात. तर स्वस्वरूपाशी एकरूप होऊन दोन्हीचा लाभांश घेणे.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# अनुसंधानासाठी सतत नामस्मरण करावे

आधुनिक केसरी

नामस्मरण हे प्रपंचाकरिता, म्हणजे तो चांगला व्हावा म्हणून नाही, तर प्रपंचाची आसक्ती कमी करण्यासाठी आहे. तरी पण त्याने प्रपंच बिघडणार नाही. जे होईल ते आपल्या बऱ्याकरिता आहे असे मानून परमात्म्यावर विश्वास ठेवून राहावे. एक गृहस्थ मला भेटले तेव्हा म्हणाले, '' मी रिकाम्या वेळेत नामस्मरण करतो. '' त्यावर मी म्हटले, '' साऱ्या जन्मात महत्त्वाचा आणि सार्थकी लागलेला वेळ असेल तर तो हाच; त्याला तुम्ही रिकामा वेळ कसा म्हणता ? '' पुढे ते म्हणाले, '' प्रारब्धाचे भोग काही केल्या टळत नाहीत, ते भोगावेच लागतात, असे सर्व संत सांगतात. हे जर खरे, तर प्रारब्धाचे भोग आपण भोगत असताना त्यामध्ये भगवंताच्या स्मरणाची काय गरज आहे ? '' खरोखर हा प्रश्न अगदी बरोबर आहे. आपल्या कर्माचे भोग आपल्यालाच भोगावे लागतात हे खरे. पण भोग आले की, आपल्या मनाला चैन पडत नाही, तिथे मनाला भगवंताच्या स्मरणात गुंतवून ठेवले की आपले समाधान टिकते. आपल्या सध्याच्या अवस्थेमध्ये, ' भगवंताच्या इच्छेने घडायचे ते घडते ' असे मानणे, किंवा ' भगवंत चांगले करील' असा विश्वास ठेवून वागणे, हेच सोपे जाईल. हे दिसायला साधे दिसले तरी यात फार मोठे मर्म साठविले आहे हे ध्यानात धरा. ''भगवंताच्या इच्छेने घडणार ते घडू द्यावे'' अशी निष्ठा उत्पन्न व्हायला त्याचे अनुसंधान सतत ठेवले पाहिजे. ''आहे त्यात समाधान, आणि भगवंताचे अनुसंधान,'' एवढीच सद्गुरूची आज्ञा असते. दुसऱ्याने आपल्याला दुःख दिले असता आपले अनुसंधान चुकते ही त्याची नव्हे, आपली चूक आहे. 'विषय कसा सुटेल ? मन एकाग्र कसे होईल ?' हे न कळले तरी चालेल. सोडण्याच्या गोष्टीचा अभ्यास करण्यापेक्षा धरण्याच्या गोष्टीचा, म्हणजे अनुसंधानाचा, अभ्यास करावा. एक भगवंताचे अनुसंधान ठेवले की सर्व गुण आपोआपच वाढतील; ते कसे, तर शरीराचे अवयव सारख्या प्रमाणात वाढतात तसे. झाडाच्या मुळाला पाणी घातले की, त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे भगवंताचा विसर पडू न दिला तर सर्व काही बरोबर होते. ''अज्ञानाच्या अंधकाराने दुःख भोगत असताना तू माझे स्मरण, माझे अनुसंधान ठेव, म्हणजे तुला पुढे उजेड दिसेल,'' असे गीतेमध्ये प्रत्यक्ष श्रीकृष्णच अर्जुनाला सुचवीत आहेत. दिवा जळायला हवा असेल तर त्यामध्ये सतत तेल घातले पाहिजे, तसे भगवंताचे अनुसंधान सारखे राहण्यासाठी त्याचे नामस्मरण आपण सतत करीत असावे. ज्याचे अनुसंधान अखंड टिकले, त्याचे खाणे, पिणे, उठणे, बसणे वगैरे सर्व क्रिया भगवंताची सेवाच बनतात. **२५. भगवंताचे अनुसंधान हे आपले ध्येय. त्याला अनुसरून बाकीच्या गोष्टी आपण करू या.**



# गहिनीनाथ

आधुनिक केसरी

ती गुरूची हाक ऐकून गोरक्ष एका घरात लपला होता तेथून बाहेर आला. पण मच्छिंद्राच्या हातातील मुलास पाहताच त्यालाहि भीति वाटली. त्याची गुरूजवळ येण्यास हिंमत होईना. हे पाहून गोरक्षास भय वाटते असे मच्छिंद्रनाथ समजले. मग त्याने मुलास चिरगुटात गुंडाळून ठेविले व गोरक्षापाशी जाऊन सांगितले की. हा मनुष्य आहे व तो नवनारायणापैकी एक नारायणाचा अवतार आहे. मग गोरक्षानेही कसा काय प्रकार झाला होता तो सांगितला तेव्हा ते वर्तमान ऐकून मच्छिंद्रनाथांसआनंद झाला जसा तू गोवरामध्ये झालास तसाच तू संजीवनी मंत्र म्हणून हा पुतळा केलास. त्यात करभंजन नारायणाने संचार केला आहे; तो भूत नसून मनुष्य झाला आहे, अशी साद्यंत हकीगत सांगून मच्छिंद्रनाथाने गोरक्षाची भीति उडविली मग त्यासहवर्तमान मुलास घेऊन मच्छिंद्रनाथ आपल्या आश्रमास गेला तेथे त्याने गाईचे दूध आणून मुलास पाजिले व त्यास झोळीत घालून हालवून निजविले.

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ७ जानेवारी २०२४



# हिंदुस्तानात मशिदी 'आबाद' ?

आधुनिक केसरी

**अयोध्यात पाचशे वर्षाच्या प्रतिक्षेनंतर प्रभू रामचंद्राचे मंदिर उभारले गेले. यावरुन हिंदू विरोधी राजकीय नेत्यात पोटदुखी वाढली आहे. मंदिराचा भव्य सोहळा दिवस जवळ येत असल्याने राजकीय नेत्यांचे मानसिक संतुलन बिघडत चालले आहे! त्यातून वाचाळवीर राजकीय नेते धार्मिक भावना भडकिणे, हिंदूच्या दुखविण्याचे कृत्य करत आहेत. बेगडी बुरखा धर्मनिरपेक्षतेचा बुरखा घालणारे काँग्रेससह इंडी आघाडीचे भाजपा लक्ष्य करताना मुस्लिम समाजाच्या भावना भडविणे, धार्मिक भावना दुखविणारे कृत्य करत आहेत! मंदिर सोहळ्यावरुन देशात मतांचे धृव्रीकरण षडयंत्र रचत आहेत! पुरातन ग्रंथात अयोध्यानगरीत रामाचा जन्म झाल्याचा उल्लेख आहे.**

श्रीराम हे आदर्श पूत्र होते. त्यांनी आई- वडिलांचा आज्ञांचे सदैव पालन केले. त्यांच्या बंधूप्रेमाची उपमा आजही दिली जाते. ते राजधर्माचे तत्पर पालन करणारे आदर्श राजा व शत्रूही होते. त्यांच्या कालखंडात प्रजा सुखी व समाधानी होती. म्हणून तर रामराज्याची कल्पना केली जाते. जगात मुस्लिम बहुल असलेल्या इंडोनेशियातही रामभक्त आहेत. प्रभू श्री रामचंद्र यांचा विश्वाने त्यांचा आदर्श घ्यावा, असे आहेत. भारतात क्रूर राजे टीपू सुलतान, बाबर, औरंगजेब चालतात, पण प्रभूरामचंद्र चालत नाहीत! हेच वेदनादायक आहे. जेव्हा उज्जैनचे चक्रवती सम्राट विक्रमादित्य अयोध्याला गेले असता त्या भूमीत त्यांना चमत्कारिक बाबी निदर्शनास आल्या. त्यांनी शोध घेतला असता, त्याठिकाणी प्रभूरामांचा जन्म झाला. त्याठिकाणी सुंदर असा महाल होता. त्यांनी संताना त्याजागी भगवान रामाचे मंदिर उभारण्यास सांगितले. संतानी तेथे रामाचे मंदिर उभारले.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

नंतर मोगल साम्राज्याचे संस्थापक बाबरचे सेनापती बीर बाकीने इ.स. १५२८ -१५२९ मध्ये अयोध्यातील राम मंदिर उध्वस्त करण्याचा आदेश दिला.मंदिर पाडुन मस्जिद उभारली. तीस 'बाबरी मस्जिद'नाव दिले. भारतावर मुस्लिमांनी अतिक्रमण करुन सुमारे २ लाख ८० हजार मंदिरे पाडून तेथे मस्जिदी उभारल्या. स्वातंत्र्यानंतरही देशात अयोध्यातील प्रभू राम मंदिराचा वाद चालू होता. तेव्हा हिंदू संत आणि मुस्लिमांची एक समझौता बैठक झाली होती.

त्यावेळी केवळ अयोध्याची रामजन्मभूमी, मथूरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी आणि काशीतील महादेवांचे विश्वनाथ मंदिर हे केवळ तीन हिंदूचे पवित्र व श्रध्दास्थाने मुस्लिम बांधवांनी सोडावेत, हिंदू इतर मंदिरावर केलेल्या अतिक्रमणाबाबत दावा करणार नाही,असा पर्याय होता. मुस्लिमांना प्रस्ताव मान्य नाकारला. तेंव्हा भारतीय मुस्लिमानांनी मोठेपणा दाखविला असता तेंव्हाच मंदिर व मस्जिदीचा वाद संपुष्टात आला असता. मंदिर उभारणी वाद न्यायालयात गेल्यानंतर पुरातत्व विभागाचे शास्त्रज्ञ के. के. मुहम्मद यांनी संशोधनात त्यांनाजागी हिंदू मंदिराचे खांब व इतर अवशेष सापडल्याचे सांगितले. भाजपाने राम मंदिराचा विषय राजकीय अजेंड्यावर घेतला नसता तर अयोध्यत राम मंदिर उभारले गेले नसते. काँग्रसचे मुस्लिम मतांसाठी खूप राम मंदिर होऊ नये, असेच प्रयत्नात होते. काँग्रेसचे धोरण राम मंदिर उभारणीच्या विरोध होता, त्यांनी हिंदु श्रध्देचा व भावना कधीच विचार केला नाही. म्हणून तर! काँग्रेस सरकारचे तत्कालिन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी १९९१ मध्ये (प्लेस ऑफ वर्शिप ॲक्ट १९९१) प्रार्थना स्थळाबाबचा कायदा हिदू विरोधात आणला. या कायद्यानुसार १९४७ मध्ये प्रार्थनास्थळे होती, ती जशी तशीच राहतील, असे नमुद केले आहे. आज अयोध्याबरोबर वाराणशीच्या ज्ञानवापी व मथुरेत मशिदीच्या अतिक्रमणाचा वाद न्यायालयात चालू आहे. यात दिल्लीतील मस्जिदी पाडण्याचे प्रकरण आहे. यासर्व प्रकरणात मुस्लिम पक्ष प्रार्थनास्थळ ब १९९१ च्या कायद्याचा वारंवार आधार घेतला जात आहे. दि.९ नोव्हेबर २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ती जागा राम मंदिराची असल्याचा निकाल ऐतिहासिक निकाल दिला. तो कट्टर मुस्लिम नेत्याच्या पचनी पडत नाही. या निकालामुळे राम मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला. त्या जागेवर प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर उभारले गेले आहे. या मंदिराचे शुभारंभ व प्राणप्रतिष्ठा सोहळा २२ जानेवारी २०२४ रोजी होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत.भारतात बहुसंख्य हिंदू असताना राम मंदिरासाठी अनेक वर्षे संघर्ष करावा लागला. काँग्रेसला तर हा प्रश्न कधी सुटणार नाही,राम मंदिर उभारले जाणार नाही, असे वाटत होते. पण त्यांचा राजकीय डाव फसला. भाजपा हिंदु संस्कृतीचे समर्थक आहे, हे लपून नाही, पण इतर धर्माचा व्देष नाही. काँग्रेसचे धोरण मुस्लिम धार्जिणे व हिंदु विरोधी आहे? हे स्पष्ट आहे, यातून काँग्रेससह इंडी आघाडीच्या घटक पक्ष तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, डी.एम.के. समाजवादी, शिवसेना ठाकरे गट व आम आदमी नेते भाजपा लक्ष्य करत आहेत. ही नेते मंडळीना सतेसाठी प्रभूरामचंद्राचा अवमान करत आहे. भाजपाने रामाला पेंटट घेतले आहे काय? आम्त्राला निमंत्रण मिळाले तर जाऊ.आम्ही जाणारच नाही, असे नेते म्हणत आहेत. खर तर! भाजपाने जर २०२४ लोकसभा निवडणुकीत राम मंदिर प्रश्नावर उपस्थित केला तर पुन्हा मोदी सरकार सत्तेत येवू शकते. याची विरोधी पक्षाला भीती वाटते आहे. त्यामुळे त्यांचा थयथयाट चालू आहे. काँग्रस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जून खडगे यांना तर मोदी निवडून आले, तर देशात सनातन धर्माचे राज्य येईल, असे भाष्य केले. यावरुन काँग्रेस पक्षाची हिंदू विरोधी मानसिकता स्पष्ट होते, समाजवादी पक्षाचे नेते स्वामी प्रसाद मौर्य तर नित्य हिंदू धर्मावर विषारी वक्तव्य देत असतात. नेते स्व. मुलायमसिंह यांनी निशस्त्र रामभक्तावर गोळ्या झाडल्या होत्या. ममतादीदीला तर राम जयघोष केलेला आवडत नाही. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. शरद पवार यांचे उपस्थितीत पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी प्रभू राम हे मांसाहारी होते असे, बेताल विधान केले आहे. यावर नेते शरद पवार मूग गिळून गप्प बसले.बेताल विधाने पक्ष नेत्याच्या आशीर्वादाशिवाय केली जाऊ शकत नाही. भाजपाच्या नेत्या नुपूर शर्मानी वृत्त वाहिनीवर चर्चा करताना इस्लाम धर्मावरील कथित टिप्पणी केली होती. यावरुन जगातील मुस्लिम राष्ट्राने निषेध केला. या घटनेवरुन भारतावर दवाब आणला गेला होता. भाजपाने शर्मा यांना पक्षातून निलंबित केले.विरोधी पक्षांनी हिंदू विरोधी वक्तव्य करणाऱ्या किती जणांना निलंबीत केले?

पाकमध्ये' सर तनसे जुदा' नारा दिला,तो नारा भारततहीया दिला गेला. मुस्लिम राष्ट्रामध्ये धार्मिक अवमान केल्यास 'इश निंदा' कायद्याखाली फाशीची शिक्षा दिली जाते. भारतात हिंदू देव- देवतांची उघडपणे टिंगल टवाळी केली जाते तरीही त्यांचेवर कारवाई होत नाही. औवेशी बंधूने तर हिंदू देवतांचा अवमान करणारे वक्तव्य केली आहेत. आता आ. आव्हाड यांनी धार्मिक भावना दुखविणारे विधान केले आहे. ते माफी मागण्यास तयार नाहीत. तेंव्हा शिंदे -फडणवीस सरकार आव्हाड विरोधात भा. द. वि.२९५ (अ) गुन्हा दाखल करुन अटक का करत नाहीत? फडणवीस यांनी यावर राजकीय टिप्पणी करण्यापेक्षा ते राज्याचे गृहमंत्री आहेत, त्यांनी कारवाई करणे अपेक्षित आहे. राज्यात शरद पवारावर टिप्पणी केली म्हणून एका तरुणीला व तरुणाला हातखड्या घातल्या गेल्या होत्या. हनुमान चालिसावरुन खासदार व आमदारावर राजद्रोहचा गुन्हा दाखल करुन जेलमध्ये टाकले गेले. महाराष्ट्रात राजकीय नेत्यांना बेताल बोलण्याची सूट आहे काय? महाराष्ट्रात भाजपाने सत्तेसाठी शिंदे व अजित पवार गटासोबत मैत्री केली! कारण भाजपाचे मित्र पक्षाचे नेते भ्रष्ट, हिंदू, इतर जातीय चिखलफेक करणारे आहेत. महाराष्ट्रात भाजपाला सत्तामैत्री भोवणार आहे. या सरकारने डोके ठिकाणावर आहे काय?

दुसरे ऑल इंडिया मजलिस-ए- इत्तेहादूल मुस्लिमीनचे ( AIMIM)चे अध्यक्ष असदुद्दिन औवेसी यांनी अयोध्यातील राम मंदिर उभारणीवरून मुस्लिम तरुणांना भडकविणारे वक्तव्य दिले. यांच्या पोटदुखीचे कारण वाराणशी, मथूरा आणि दिल्लीतील सुनहरी बाग मस्जिदबाबतचे वाद चालू आहे. या प्रकरणात त्यांच्या विरोधात निकाल लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे कट्टरवादी नेते औवेसी निराश्यातून म्हणाले की, 'पाचशे वर्षापासून ज्या जागेवर कुराण वाचले जात होते, ती जागा आपल्या हातातून गेली आहे. त्या ठिकाणी काय होत आहे? याचे तुम्हाला दुःख वाटत नाही काय? आणखी तीन - चार मिस्जिदी घेण्याचे कारस्थान चालू आहे. तेव्हा मुस्लिम तरुणांनी संघटीत झाले पाहिजे. हिंदुस्थानात मस्जिदी आबाद नाहीत त्यांचे हे भाषण तरूणांचे माथे भडकविणारे नाही काय? तेलंगणात काँग्रेसची सत्ता आहे, मग हे सरकार औवेसी कारवाई करण्यात का घाबरते आहे? शरद पवारांनी शिर्डीत भाजपावर हिंदुत्वावर आगपाखड केली. पवारांनी कट्टरपथी मुस्लिम विचारप्रवृत्तीवर ज्ञान देऊन बघावे! पवारांनी मोदीवर टीका करण्यापेक्षा आयुष्यात त्यांनी राज्यात काय दिवे लावले ? हे सांगावे. देशाचे विभाजन करणारे मुस्लिम लिगचे नेते महमद अली जिन्ना व ए.आय. एम.आय.एम.चे औवेसी हे दोघेही कट्टर इस्लाम व शरियाचे समर्थक आहेत. त्यांना देशाची घटना मान्य नाही. १९४७ ला स्वातंत्र्याचे पहाटे पहिले किरण निघत होते. तेव्हा तत्कालिन पंतप्रधान पंडित नेहरू हे लालकिल्ल्यावर ध्वजारोहण होत असताना बिस्मिलाह खां यांनी शहनाई वाजून स्वागत केले. यावेळी आकाशात इंद्रधनुष्य दिसत होते. देशात राष्ट्रभक्त मुस्लिमही आहेत.पण औवेसीना भारतात शरियानुसार कायदे हवे आहेत.त्यांनी जरी भारतीय घटनेची शपथ घेवून खासदार झाले, तरी मानसिकता बदलेली नाही. त्यांना घटनेपेक्षा धर्म महत्वाचा वाटतो.मुस्लिम लागप्रमाणे एम. आय. एम.ही सुध्दा भारत विरोधी संघटना होती. बॅ.औवेसी यांचेवर निजाम हुजूर के सोबत का असर हुआ है, असे म्हटले जाते. देशात मुस्लिम हिताचे असेल तर भारतीय घटनेचा आधार.जर कायद्यातत मुस्लिमांचा फायद्याचा नसेल तेंव्हा धर्माचा आधार घेतात. इस्लाम खतररे मे हे ?असे म्हंटले जाते.त्यांचे राजकीय दुकानदारी यावर चालू आहे.हिंदुस्थानात मस्जिद आबाद नाहीत, असे म्हणणारे औवेसींनी जगातील मुस्लिम राष्ट्राकडे पहावे! या राष्ट्रात ना मुसलमान ना मस्जिदी सुरक्षित आहेत. पाकिस्तानातील पेशावर, काबूल अफगानिस्तान या मुस्लिम राष्ट्रात मशिदीत बाँम्बस्फोट होतात.गाजापट्टीच्या युध्दात मशिदी उडविल्या गेल्या. इराकमध्ये तर तीनशे वर्षांपूर्वीच्या मस्जीदच्या मीनार पाडून टाकल्या गेल्या.चीनमध्ये मुसलमानांना धार्मिक स्वातंत्र्य नाही. येथे नमाज पढणे, दाढी ठेवणे व नवीन मस्जिद बांधण्यावर प्रतिबंध आहे. चीनमध्ये शेकडो मुस्लिमांना गोळया घालून ठार मारले गेलै. नुकतेच पाकिस्तानने वीस लाख अफगानीस्थानच्या मुस्लिमांना देशातून हाकलून लावले जात आहे. या राष्ट्रात अहमदिया मुस्लिमांवर निर्बध आहेत त्यांचा छळ केला जातोय! हे दिसत नाही काय? दुसरीकडे भारतात घुसखोर बांगला देशी व रोहिग्यांना पोसले जात आहे. हिंदुस्थान हा सहिष्णु राष्ट्र आहे.राष्ट्रात बहुसंख्य हिंदु आहेत.हिंदु धर्म दुसऱ्या धर्माचा कधी अनादार करणारा नाही,तसेच रक्तपात अथवा तलवारीने धर्माचा प्रचार व प्रसार करणारा नाही. ही धर्माची शिकवण नाही, म्हणून जगात केवळ भारतात मुस्लिम व मस्जिदी "आबाद" आहेत, हे लक्षात घ्यावे.

मांडणी व सजावट
अतुह ह . खंडगावकर






प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

# सांस्कृतिक दहशतवाद


आधुनिक केसरी

**अलीकडे प्रचलित होऊ पाहणारी आणि अनेक विचारवंतांच्या लेखी जिचा विचार करणे निवार्य आहे अशी संकल्पना म्हणजे सांस्कृतिक दहशतवाद होय. मुळात दहशत म्हणजे कोणालातरी घाबरवणे. ही घाबरण्याची व घाबरवण्याची प्रक्रिया अनेक प्रकारे होत असते. चार माणसे एकत्र आली तर त्यांच्याशी संबंध नसलेला दुसरा माणूस सहजच घाबरत नसला तरी त्यासंबंधाने नक्की विचार करतो. परंतु एखादा समूह आपल्या संस्कृती आणि चालीरीतीच्या अनुषंगाने दुसऱ्यावर जरब बसविण्याच्या उद्देशाने काही कृती करत असेल तर आपण त्यास सांस्कृतिक दहशतवाद म्हणतो.**



## क्षितिजापल्याड

सांस्कृतिक मूल्यांच्या सत्तास्पर्धेत आणि संस्थापनेच्या अभिनिवेषात काही कृती निश्चितच दोन्ही बाजूने होत असतात. त्या फक्त सांस्कृतिक असतात असे नव्हे तर ही कुरघोडी बहुपदरी आणि व्यामिश्र असते. सांस्कृतिकता हे साध्य आहे की साधन हे त्या त्या काळातील परिस्थितीवर आणि एकूणच जीवनप्रणालीवर अवलंबून असते. परकीयांच्या आक्रमणाच्या वेळी जेत्यांच्या दृष्टीने हे एक साधन म्हणून काम करते तर जितांच्या दृष्टीने त्याशिवाय दुसरे साध्य काहीच असू शकत नाही. हा सत्ता स्पर्धेतील खेळाचा एक भाग होय. केवळ एखादी संस्कृती दुसऱ्यांच्या संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असते म्हणून ते श्रेष्ठ ठरतात असे नव्हे तर भौतिक साधनांच्याद्वारा इतरांवर पकड मजबूत केल्यानंतर आपसूकच जेत्यांची संस्कृती श्रेष्ठ असल्याचा गवगवा होणे क्रमप्राप्त आहे. अलीकडच्या काळात हिंदुत्वाचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. हिंदुत्व हे आर्य संस्कृतीवर अधिष्ठित आहे असे गृहीत धरले तरी आर्य ही काही जैविक ओळख नाही. आर्य अनार्य हा वाद केवळ जैवशास्त्रीयदृष्ट्या समजून घेता येणार नाही. आर्य मूळचे कोण? ते कोठून आले? एतद्देशीय की परकीय? याबाबत अनेक उपपत्ती प्रचलित आहेत, परंतु या सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे ज्यांना आपण आर्य म्हणतो ते जैवशास्त्रीयदृष्ट्या पृथक नसून भाषिकदृष्ट्या भिन्न आहेत. म्हणूनआर्य अनार्य वाद सनातन आहे. मूळचे किंवा परकीय यापेक्षा भाषिक भिन्नता आणि त्याअनुषंगाने येणारा कलह समजून घेतल्यास काहीएक निष्कर्षाप्रत आपण पोहचू शकू. अन्यथा हा वाद भविष्यातदेखील चालूच राहील. आपले भौतिक सांस्कृतिक सर्व प्रकारचे क्रियाकलाप ज्या माध्यमातून उजागर होतात ते माध्यम म्हणजे भाषा. सर्व प्रकारच्या भावना आणि विचारांना सामावून घेणारी, सामाजिक अभिसरणात महत्त्वाची भूमिका बजावून नवनवीन शब्द प्रसवता धारण करणारी आणि इतर भाषकांकडून अगदी अलगद शब्द सामावून घेणारी भाषा ही सांस्कृतिक उत्थापन घडवून आणण्यास मदत करणारी ठरते. हजारो वर्षांपासून कोणताच बदल न झालेली भाषा मृतप्राय होणे हे अगदी नैसर्गिक आहे. कालानुरूप त्यात बदल होणे आणि त्या बदलानुसार सांस्कृतिक प्रवाह गतिमान होत असल्यास अशी संस्कृती आणि त्याची मूल्यव्यवस्था इतरांपेक्षा श्रेष्ठ ठरत असतील तर भाषिक बदल होऊन नवीन चिन्हव्यवस्थात्मक संरचना स्वीकारणे अनिवार्य होते. आजपर्यंतचा इतिहास हा फक्त युद्ध आणि वर्चस्ववादी प्रणाली समजून घेण्याच्या उद्देशाने त्याकडे पाहू तर एकूण सांस्कृतिक भान आपणास येणार नाही. हा जसा वर्चस्ववादाचा इतिहास आहे तसाच शोषितांच्या कर्मकहाण्या उद्धृत करणारा, धर्माला नवे आयाम मिळवून देणारा, नवसांस्कृतिक मूल्यांना आपल्यात सामावून घेणारा आणि काळानुसार आपल्यात बदल केला पाहिजे असे सांगणारा हा इतिहास आहे. विशेषतः भारतीय इतिहास हा फक्त धार्मिक इतिहास नाही तर खरे पाहता अनेक पंथोपपंथांचा हा इतिहास आहे. इथे हिंदू असण्यापेक्षा कोणीतरी कबीरपंथी आहे, कोणी नाथपंथी, वारकरी, महानुभाव, दत्त संप्रदायी, समर्थ संप्रदायी, कार्तिकेयी न जाणो कितीतरी भक्ती संप्रदायात आणि कित्येक नास्तिकपंथी आहेत. या सर्वांचा परिणाम असा झाला की, सांस्कृतिक मूल्यव्यवस्था भिन्न बनली. या विविध विचारांच्या सांस्कृतिक मूल्यांचा एकमेकांवर परिणाम होणे आणि प्रभाव पडणे साहजिकच आहे. इथे हा प्रभाव कधी जाणीवपूर्वक असेल



किंवा अनाहूतपणे असेल पण यास आपण सांस्कृतिक दहशतवाद म्हणत नाही. कारण एकाच झाडाच्या फांद्या एकमेकांत मिसळून जो एक गुंता तयार होतो तशीच इथे परिस्थिती असते. किंबहुना जैन, बौद्ध, शीख किंवा अन्य भारतीय विचारधारांच्या बाबतीत देखील आपली तितकीशी तक्रार नसते, परंतु इस्लाम, ख्रिश्चन यांच्या बाबतीत मात्र क्षणार्धात कान टवकारले जातात. खरेतर तेही तेवढ्याच सहजतेने आपण घेऊ शकतो. फार पूर्वीपासून इथे दर्गा, पीर किंवा तत्सम पुजाप्रार्थना स्थळे सर्व धर्मियांना तेवढीच वंदनीय होती आणि आहेत सुद्धा. स्वसांस्कृतिक मूल्यभान येणे म्हणजे इतरांच्या मूल्यांचा अधिक्षेप करून ते त्याज्य ठरवणे असा होत नाही. इथला गावगाड्यात राहणारा मुसलमान अमावस्या पौर्णिमेला मारुतीला नारळ फोडणारा जसा आहे तसाच अयोध्येला रामाच्या भेटीसाठी आणिव्यवस्थापनासाठी आसुसलेला देखील आहे. परस्परांच्या मूल्यांचा योग्य सन्मान राखल्यास सांस्कृतिक वातावरण निकोप राहण्यास मदतच होते. जोर जबरदस्तीचा जेथे विषय येतो त्याठिकाणी मात्र कट्टरता वाढत जाते. अशा कट्टर वातावरणातून मग राजकारण केवळ चंचूप्रवेश करत नाही तर अगदी बिनधास्तपणे शिरकाव करते. सांस्कृतिक दहशतवाद हा मग राजकीय अंगाने सुरू होतो. मानवी कल्याणाच्या प्रयोजनार्थ निर्माण झालेली संस्कृती दहशतवाद माजवत नाही तर व्यवस्थात्मक बांधणीसाठी निर्माण झालेल्या राजकारणाचे आयुध सांस्कृतिकता ठरते. ती या ठिकाणी साधनरुप धारण करते. विशिष्ट हेत्वाभास निर्माण करून अधिकाधिक संकुचित विचार हा त्यापुढची पायरी ठरतो. सर्वांच्या ठायी विश्वचैतन्य कल्पून सबंध प्राणिमात्रावर प्रेम करण्याची शिकवण देणारी सांस्कृतिक मूल्ये दहशतीचे वातावरण निर्माण करणे शक्य नाही, परंतु हीच सांस्कृतिकता राजकारणाश्रयी गेल्यानंतर मात्र त्यात विशिष्टता येते. मग आपले-परके, आतले-बाहेरचे, शाकाहारी-मांसाहारी, आर्य-अनार्य हे वाद उपस्थित होतात. विशिष्टांची विशिष्ट सांस्कृतिक मूल्ये अशी रचना न ठेवता एकूण मानवी मूल्यांचा परिपोष करणारी सांस्कृतिकता विकसित होणे गरजेचे आहे. मग कोणत्याही प्रकारचा सांस्कृतिक दहशतवाद असणार नाही.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**



जगन घाणेकर
मुंबई, ९६६४५५९७८०

# मुलगी का नको ?

आधुनिक केसरी

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती राज्यात सर्वत्र उत्साहात साजरी झाली. यानिमित्ताने सावित्रीबाईंना अभिवादन करण्यासाठी ठिकठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. समस्त शाळांमध्येही 'बालिका दिन' म्हणून हा दिवस वेगवेगळ्या उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परीस्थितीतही ध्येयाने झपाटलेली एक स्त्री जिद्दीच्या आणि मेहेनतीच्या बळावर केवढी मोठी क्रांती करू शकते हे सावित्रीबाईंनी आपल्या जीवनपटातून दाखवून दिले. समस्त स्त्रीवर्गासाठी एक आदर्श उदाहरण म्हणून सावित्रीबाईंचे चरित्र पुढील अनंत वर्षे अबाधित राहील. या दिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांत राजकीय मंडळींसह समस्त वक्तेमंडळींनी स्त्रीशक्तीचा जागर केला.**

स्त्री शिक्षणामुळे आजची स्त्री किती सक्षम आणि सशक्त झाली आहे याची उदाहरणे यानिमित्ताने देण्यात आली. आज स्त्री कुठल्याच बाबतीत पुरुषांपेक्षा कमी नाही. देशाच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपती पदावर आज एक स्त्री विराजमान आहे. स्व. इंदिरा गांधींसारख्या एका स्त्रीने देशाचे पंतप्रधानपद यशस्वीरीत्या भूषवले आहे. जागतिक कीर्तीच्या गायिका स्व. लता मंगेशकर या तर महाराष्ट्राच्या कन्या. छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्याची प्रेरणा देऊन त्यांच्यात शौर्याचे आणि जनकल्याणाचे बीज रोवण्याचे महत्कार्य राजमाता जिजाऊंनी केले म्हणूनच आज आपण स्वातंत्र्यात सुखाने जगात आहोत. आक्रमकांनी उध्वस्त केलेली हिंदूंची ऊर्जास्रोत असलेली प्राचीन मंदिरे पुनश्च उभारण्याचे धाडसी कार्य महाराष्ट्राच्या पुण्यश्लोक अहल्यादेवींनी केले. झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंच्या पराक्रमाचा इतिहास तर आपल्या सर्वांनाच ठाऊक आहे. आपल्यासह आपल्या कुटुंबाचे आणि देशाचे नाव उज्वल करणाऱ्या स्त्रियांची अशी तीन चार नव्हे तर शेकडो उदाहरणे आहेत. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून आज स्त्रियांनी नानाविध क्षेत्रे पादाक्रांत केली आहेत. आजची आधुनिक स्त्री चूल आणि मूल यांच्यात अडकलेली नसून पुरुषांसोबत तीही प्रतिदिन नोकरी व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागली आहे. असे असताना समाजात अशी काही विकृत मंडळी आहेत ज्यांना आपल्या कुटुंबात मुलगी नको आहे. कुटुंबाला वारस म्हणून मुलगाच हवा आहे. यासाठी घरात गर्भवती राहणाऱ्या स्त्रीची अवैधपणे लाखो रुपये देऊन गर्भलिंगनिदान चाचणी केली जाते. गर्भ मुलीचा असेल तर गर्भपात करून गर्भाची हत्या केली जाते. सर्वत्र 'बालिका दिन' साजरा होत असतानाच बीडमधील गेवराई परिसरात अवैधपणे गर्भलिंगनिदान करणाऱ्या एका टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला. विशेष म्हणजे अशाच प्रकारच्या गुन्ह्यामध्ये अटकेत असलेल्या आणि जामिनावर सुटलेल्या एका डॉक्टरने आणि अंगणवाडी सेविकेने बाहेर येताच हा अवैध धंदा पुन्हा सुरु केला होता. याविषयीची तक्रार पोलिसांकडे येताच पोलिसांनी डमी रुग्ण पाठवून जामिनावर बाहेर आलेल्या अंगणवाडी सेविकेला आणि तिच्या साथीदाराला ताब्यात घेतले. डॉक्टर पसार होण्यात यशस्वी झाला असला तरी लवकरच पोलीस त्याचाही शोध घेतील,

प्रसुतीपूर्व गर्भलिंगनिदान आणि गर्भनिवड करणे हा भारतीय दंडविधानानुसार गंभीर अपराध आहे. यासंदर्भातील कायदा करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. १९८८ पासून हा कायदा राज्यात लागू झाला. यानुसार गर्भलिंगनिदान करणे हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे. यामध्ये सोनोग्राफी सेंटर , संबंधित डॉक्टर आणि सेवा घेणाऱ्या कुटुंबियांवर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. दोषी आढळल्यास ३ वर्ष शिक्षेसह ५० हजार रुपयांचा दंड ठोठाण्याचे प्रावधान यामध्ये आहे. कायद्यानुसार प्रत्येक सोनोग्राफी सेंटर हे नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे अशा प्रत्येक सेंटरवर 'गर्भलिंगनिदान प्रतिबंधक कायद्यानुसार गर्भलिंगनिदान करणे गुन्हा आहे.' अशा प्रकारचा ठळक अक्षरातील फलक लावणे बंधनकारक आहे, तरीही अशाप्रकारचे प्रकार राज्यातील अनेक भागांत सर्रासपणे घडत आहेत. गर्भवती स्त्रीचे कुटुंबियांच्या संमतीनेच गर्भलिंगनिदान आणि गर्भपात केला जात असल्याने अशा प्रकरणात तक्रार तरी कोण करणार ? शिवाय अशाप्रकारच्या चाचण्या करण्यासाठी सोनोग्राफी सेंटर्सना हजारो रुपये मिळत असल्याने हा काळा धंदा राज्यातील काही भागांत वर्षोनुवर्षे अविरतपणे सुरू आहे.

समाजव्यवस्था उत्तम राखण्यासाठी स्त्री आणि पुरुष यांच्या संख्येत समतोल राहणे अत्यंत आवश्यक आहे. निसर्गनियमानुसार १००० मुलांमागे ९५० ते ९५२ मुली जन्माला येतात. २००१ साली झालेल्या जनगणनेनुसार भारतात हे प्रमाण १००० मुलांमागे ९२७ मुली असे होते. हेच प्रमाण महाराष्ट्रात १००० मुलांमागे ९१३ मुली असे होते, त्यातही सांगली, सातारा आणि कोल्हापूर या जिल्ह्यांत हे प्रमाण १००० मुलांमागे ८७८ मुली इतके कमी होते. मुलींचा जन्मदर कमी होण्यामागे प्रसुतीपूर्व केले जाणारे गर्भलिंगनिदान आणि मुलींची गर्भातच केली जाणारी हत्या हेच आहे. केवळ बीड जिल्ह्यात नव्हे, तर अशा प्रकारचे अवैधपणे गर्भलिंगनिदान करणारे सेंटर्स राज्यात ठिकठिकाणी आहेत. बीड येथे कारवाई करण्यात आलेल्या टोळीचे राजकीय नेत्यांशी असलेले हितसंबंधही आता बाहेर आले असून अन्य ठिकाणीही हे अवैध धंदे स्थानिक राजकीय किंवा प्रतिष्ठित पुढाऱ्यांच्या वरदहस्ताने चालू असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भारतात कुटुंबियांच्या समंतीने गर्भपात करण्यास कायद्याने परवानगी असली, तरी त्यामागे सबळ कारण असणेही बंधनकारक आहे. केवळ गर्भ मुलीचा आहे म्हणून गर्भपात करणे ही एकप्रकारची मानवी जीवाची हत्याच आहे. त्यामुळे अशा हत्यांना कारणीभूत असणाऱ्या कुटुंबीयांसहित गर्भपात सेंटर्सवरही हत्येचा गुन्हा नोंदवला गेला पाहिजे. आपल्यावर प्रेम करणारी आणि आपली सर्वस्वी काळजी घेणारी एक स्त्री आईच्या रूपाने आपल्याला हवी असते, सहचारिणी पत्नी म्हणूनही स्त्री हवी असते; मग मूल म्हणून मुलगी का नको असते ? आजमितीला जेव्हढा सांभाळ आपल्या आईवडिलांचा मुली करतात तेव्हढा मुले करत नाहीत ही सत्य परिस्थिती आहे. लग्न होईपर्यंत मुलगी आपल्या आईला घरकामात सर्वतोपरी मदत करते आपल्या लहान भावंडांचा आईच्या मायेने सांभाळ करते तरीही आपल्याला मुलगी का नको असते ? 'लडकी धनकी पेटी' अशी हिंदी म्हण आहे. मुलीच्या येण्याने घरात श्री महालक्ष्मी देवीचा म्हणजेच धनसंपत्तीचा प्रवेश होतो असा या म्हणीचा अर्थ आहे. जनतेने मुलीच्या जन्माचे स्वागत करावे यासाठी सरकार विविध योजना राबवते, अनुदान देते. आज महिलांसाठी सरकारने असंख्य सुविधा दिल्या आहेत. असे असताना स्त्रीला जन्माला घालण्याविषयी लोकांमध्ये असलेली अनास्था अनाकलनीय आहे. सृष्टीचे संतुलन राखण्यासाठी स्त्रीजन्माचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. स्त्रीभ्रूणहत्या हा केवळ दंडनीय अपराध नसून ते फार मोठे पाप आहे. समस्त सृष्टीचे संचालन करणारा भगवंत आहे यावर आपल्या प्रत्येकाचीच दृढ श्रद्धा आहे. जीवाचा जन्म हासुद्धा तोच निश्चित करतो. असे असताना जीवाची गर्भात वाढ होत असतानाच केवळ आपल्या स्वार्थासाठी त्या गर्भाची हत्या करून त्याला जन्माला न घालणे म्हणजे त्या जगनियंत्याच्या कार्यात हस्तक्षेप करण्यासारखे आहे त्यामुळे त्यास कारणीभूत असणाऱ्या प्रत्येकालाच त्याचे पातक लागते. भारतासारखा प्रगतशील देश आज जागतिक स्तरावर आर्थिक महासत्ता होण्याकडे मार्गक्रमण करत असताना देशातील स्त्रीभ्रूण हत्येचे वाढते प्रमाण देशाच्या प्रतिमेवर बट्टा लावणारे आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ७ जानेवारी २०२४
adhunikkesari.com Adhunik Kesari




# लोककलावंतांमुळे नाट्यदिंडी लक्षवेधी

आधुनिक केसरी न्यूज

**भगवान राऊत**

**पिंपरी-चिंचवड :** अखिल भारतीय मराठी नाट्य परीषदेच्या पिंपरी चिंचवड येथे आयोजित १०० व्या नाट्य संमेलना निमित्त चिंचवड येथील मोरया गोसावी गणपती मंदिर ते क्रीडा संकुल मार्गावर भव्य दिव्य नाट्य दिंडी काढण्यात आली होती. अ. भा. नाट्य परिषदेचे अध्यक्ष अभिनेते प्रशांत दामले व नाट्य संमेलनाचे निमंत्रक तथा पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर व अन्य मान्यवरांच्या हस्ते पालखी पूजन करून या नाट्य दिंडीस प्रारंभ झाला. या नाट्य दिंडी मध्ये सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर, सुकन्या कुलकर्णी, प्रतिक्षा लोणकर, सविता मालपेकर, सुरेखा कुडची, स्पृहा जोशी, अर्चना नेवरेकर, अंशुमाला पाटील, प्रिया बेर्डे, शुभांगी गोखले, कविता लाड, अभिनेता वैभव मांगले, संदीप पाठक, गौरव मोरे, पुष्कर श्रोत्री, अतुल तोडणकर, लावणी सम्राज्ञी संजीवनी मुळे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. मराठी रंगभूमी, मालिका, व चित्रपट अभिनेत्या बरोबरच विविध लोक कलावंतांच्या सहभागाने ही नाट्य दिंडी लक्षवेधी ठरली. या नाट्य दिंडी मध्ये वासुदेव, गोंधळ, जागरण, पोतराज, कडक लक्ष्मी, गजी नृत्य, बंजारा लेंगी नृत्य, स्मशान जोगी, भुत्या भोपे, आदिवासी नृत्य, मरी आईवाले, कोळी नृत्य, तारपा नृत्य, दश अवतार, रायरंद, पिंगळा जोशी, शिमग्याची सोंग अशे महाराष्ट्रातील २५ लोककला पथके सहभागी झाली होते. आसाराम कसबे व संजय विभूते यांनी या लोक कलावंतांशी समन्वय साधला होता.

# बालाजी साखर कारखान्याची चाके पुन्हा फिरणार ?

## २५ वर्षांची प्रतीक्षा संपणार

आधुनिक केसरी न्यूज

**अरविंद देशमुख**

**रिसोड :** तालुक्यातील मसलापेण येथे उभा असलेला बालाजी सहकारी साखर कारखाना गेल्या जवळपास २५ वर्षापासून धूळखात पडून आहे. मात्र एमएससी बँकेने न्यायालयातील दावा क्रमांक ९७०३/२०१०च्या निर्णयास अधिन राहुन सदर कारखाना भाड्याने अथवा विक्रीसाठी निविदा सूचना जारी केली आहे. परिणामी बालाजी सहकारी साखर कारखाना पुन्हा सुरू होण्याच्या चर्चेला उधाण आले असून, त्याअनुषंगाने कारखान्याचे चाक पुन्हा फिरणार? हा उत्कंठादायक प्रश्न जानेवारी २०२४ च्या अखेरीस सुटणार आहे.

वाशिम जिल्ह्यातील मसलापेण ( केशव नगर ) येथे असलेला बालाजी सहकारी साखर कारखाना केवळ गटबाजीतून निर्माण झालेल्या अनास्थेपोटी गेल्या २५ वर्षापासून धूळखात पडून आहे. सन १९८९ मधे योजनामहर्षी स्व. बाबासाहेब धाबेकर यांच्या नेतृत्वात कारखान्याचा पहिला गळीप हंगाम सुरू झाला होता. कारखान्याची प्रगती पाहता, अवघ्या एक वर्षातच येथील कामगारांना वेतन आयोग लागू झाला होता. एव्हढेच नव्हे; तर १२५०० टन दररोजची गाळप क्षमता असलेल्या या कारखान्याने १९९१/९२ सालात तब्बल तीन लाख ६१ हजार टणाची गाळप करून संपुर्ण महाराष्ट्रात बालाजी सहकारी साखर कारखाना नावलौकिकास आला होता. याची दखल घेत राष्ट्रपती पुरस्काराने कारखान्यास गौरविण्यात सुद्धा आले होते. मात्र एखाद्या चांगल्या गोष्टीला दृष्ट लागावी तशी गत बालाजी कारखान्याची झाली. संचालक मंडळ आणि कामगार यांच्यात सुद्धा सरळ सरळ दोन गट पडले आणि कारखान्याची अधोगती सुरू झाली ती आजतागायत कायम आहे.

२५ वर्षापूर्वी सुजलाम् सुफलाम् अवस्थेत असलेल्या बालाजी सहकारी साखर कारखान्यामुळे परिक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला होता. तेंव्हा सध्यस्थितीत असलेल्या सिंचनाच्या सुविधा उपलब्ध नव्हत्या त्यामुळे कारखान्याला जवळपास २५० की.मी. अंतरावरून बाहेरचा ऊस आणावा लागत होता. आज कारखाना क्षेत्रात जवळपास नव्वद टक्के सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे त्यामुळे आपसुकच ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या चौपट वाढणार असल्याचे तज्ञ शेतकरी बोलत आहेत. सोयाबीन,तूर, हरभरा या पारंपारिक पिकांना नैसर्गीक संकटांचा धोका मोठ्या प्रमाणात असतो.त्यामुळे ऊस हे हमी व नगद पीक असल्याने बालाजी कारखाना सुरू होण्याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे. एमएससी बँकेने जारी केलेल्या निविदा सूचनेनुसार २७ डिसेंबर २०२३ ते २५ जानेवारी २०२४ पर्यंत निविदा फॉर्म विक्री होणार आहे.तर इच्छुकांसाठी ११ ते १२ जानेवारी रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मालमत्ता पाहणी कार्यक्रम पार पडणार आहे. एकंदरीत परिस्थीती पाहता बालाजी सहकारी साखर कारखाना सुरू होण्याच्या हालचालींना वेग आला असल्याचे स्पष्ट होत आहे.

सदर कारखाना कोणी विकत घेवो अथवा भाडे तत्वावर चालविण्यास घेवो..! मात्र २५ वर्षाच्या प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर बालाजी सहकारी साखर कारखान्याचे चाक पुन्हा फिरणार ? हा प्रश्न सध्यस्थितीत रिसोड, मालेगाव तालुक्यातील शेतकरी मोठ्या उत्कंठेने विचारत आहेत. त्याचे उत्तर जानेवारीच्या अखेरीस स्पष्ट होणार असल्याचे देखील काही माहितगार यांच्याकडून कळले आहे.



ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर बालाजी सहकारी साखर कारखान्याचा प्रश्न ऐरणीवर आल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांसाठी हा प्रश्न प्रतिष्ठेचा समजला जाणारा आहे . साखर कारखाना सुरू होणे हा शेतकऱ्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे . या बाबत स्थानिक नेत्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता,आ . रिसोडचे आ . अमित झनक हे बाहेरगावी असल्यामूळे कव्हरेज अभावी त्यांच्या पर्यंत आवाज पोहचू शकला नाही .तर माजी आ . विजयराव जाधव यांच्यासोबत संपर्क होऊ शकला नाही . मात्र या बाबत शेकडो शेतकरी व्यक्त झाले असून, त्यासर्वांनी कुठल्याही परिस्थितीत बालाजी साखर कारखाना सुरु व्हावा . . ! अश्या प्रतिक्रीया दिल्या आहेत . तीच परिस्थीती परिसरातील साखर कामगारांची सुद्धा आहे .

माजी खासदार अनंतराव देशमुख यांच्याशी सुद्धा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता, त्यांचे स्वियसहाय्यक यांच्याकडून माहिती मिळाली आहे की, शेतकऱ्यांच्या हितासाठी बालाजी साखर कारखाना सुरु होणे गरजेचे आहे . त्यासाठी मा .खा . अनंतराव देशमुख यांनी वेळोवेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा केला आहे व अजूनही पाठपुरावा करणे सुरूच आहे . . !

# 'आदित्य एल १' पोहोचले निश्चित स्थळी


## मोदींनी केले इस्त्रोचे अभिनंदन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : देशाच्या पहिल्या सौर मोहिमेतील 'आदित्य एल १' उपग्रहाने सूर्य आणि पृथ्वी यांच्यातील गुरुत्वाकर्षण समतोल बिंदूंपैकी एक बिंदू- 'लँगरेंज पॉइंट १' (एल-१) वर यशस्वीरित्या पोहोचण्याचा विक्रम केला आहे. पृथ्वीपासून सुमारे १५ लाख किलोमीटर अंतरावर सूर्याच्या दिशेने हे यान ११० दिवसांनी पोहोचले आहे. 'आदित्य-एल १' ही अवकाशीय सौर वेधशाळा असून, ती सूर्याच्या बाह्य वातावरणाचा अभ्यास करणार आहे. हा यशस्वी टप्पा पार केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही इस्रोचे अभिनंदन व्यक्त केले आहे.**

भारताने आणखी एक टप्पा पूर्ण केला आहे, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला. "भारताने आणखी एक टप्पा पूर्ण केला आहे, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त केला. भारताची पहिली सौर वेधशाळा आदित्य एल१ हे उपग्रह निश्चितस्थळी पोहोचले आहे. आमच्या शास्त्रज्ञांनी अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या अंतराळ मोहिमा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम केले. त्याचेच हे यश आहे. संपूर्ण देश या कामगिरीसाठी शास्त्रज्ञांचे अभिनंदन व्यक्त करत असताना मीदेखील त्यात सामील होत आहे.

मानवतेच्या विकासासाठी विज्ञानाचे नवे नवे क्षितीज गाठण्याचा प्रयत्न आम्ही करत राहू", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सूर्याचा अभ्यास करण्यासाठी इस्रोने आदित्य एल-१ हे अवकाशयान २ सप्टेंबर रोजी प्रक्षेपित केले. सूर्याच्या सर्वात वरील आवरणाचा, म्हणजेच सूर्य प्रभामंडळाचा (करोना) अभ्यास करण्यासाठी हे यान पाठवले आहे. यासाठी आदित्य एल-१ मध्ये वेगवेगळी उपकरणे (पेलोड) बसवण्यात आली आहेत. सौरवादळांचा पृथ्वीच्या




वातावरणावर होणारा परिणाम, सूर्याचं तापमान, अतिनील किरणांचा पृथ्वीवर होणारा परिणाम, ओझोनचा थर आणि अंतराळातील हवामान या सर्व गोष्टींचा अभ्यास करण्यासाठी इस्रोने ही सौरमोहीम हाती घेतली आहे. अंतराळातील मोठे वस्तुमान असलेल्या दोन वस्तूंमध्ये (तारे, ग्रह, उपग्रह इत्यादी) गुरुत्वाकर्षण असते. या दोन वस्तूंमधील काही बिंदू असे असतात की तेथे दोन्हींचे गुरुत्वाकर्षण समतोल (बॅलन्स) असते. अशा बिंदूंना 'लँगरेंज पॉइंट' म्हटले जाते. इटालियन संशोधक जोसेफ लुई लँगरेंज यांच्या स्मरणार्थ हे नाव देण्यात आले आहे. सूर्य आणि पृथ्वीदरम्यान आतापर्यंत असे पाच बिंदू खगोल अभ्यासकांना सापडले असून त्यांना एल-१, एल-२, एल-३, एल-४ आणि एल-५ अशी नावे देण्यात आली आहेत. 'आदित्य' हे अंतराळयान एल-१ या बिंदूवरून सूर्याचा अभ्यास करणार असल्याने मोहिमेचे नाव 'आदित्य एल-१' असे ठेवण्यात आले आहे. अलीकडेच 'नासा' आणि 'युरोपियन स्पेस एजन्सी'ने (ईएसए) संयुक्तपणे काढलेल्या 'सोलर ऑर्बिटर' मोहिमेतून तुलनेने लहान सौरवाऱ्यांचा शोध लागला होता. आदित्यच्या निरीक्षणांमधून यावर अधिक प्रकाश पडेल, अशी संशोधकांना अपेक्षा आहे.




# दर्पण वृत्तपत्राची लक्षणीय कामगिरी!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी ज्यांनी मोलाचे कार्य केले. त्या दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचे स्मरणपर्व या हेतुने ६ जानेवारी हा दिवस पत्रकार तथा पत्रकारिता दिन म्हणून महाराष्ट्रभर साजरा केला जातो. नवीन जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवून त्यांनी या परंपरेचा पाया घातला. कोकणात सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड तालुक्यातील पोंभुर्ले या गावी दि.६ जानेवारी १८१२ रोजी बाळशास्त्रींचा जन्म एका पुराणिकाच्या घरी झाला.**

अज्ञान, दारिद्र्य आणि रुढीप्रिय समाजाच्या अंधःकारातून बाहेर पडण्यासाठी ते मुंबईत आले. तेथे बापू छत्रे यांच्या निवासस्थानी राहून त्यांनी अध्ययन सुरू केले. आपल्या विलक्षण बुद्धिचातुर्याने व तल्लख स्मरण शक्तीने त्यांनी त्या वेळच्या सार्वजनिक जीवनावर विलक्षण छाप टाकली. सन १८३०मध्ये हिंद शाळा पुस्तक मंडळाचे सेक्रेटरी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आणि एक नवे क्षितिज त्यांच्यासाठी खुले झाले. त्यांनी आता ग्रंथरचनेस प्रारंभ केला. त्यानंतर वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी जन्मदिनी दि.६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या पत्राची मुहूर्तमेढ रोवली. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात केले. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी! ती महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी केली. प्रयत्नशील व वैचारिक चळवळ सुरू केली. त्यांनी समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी हेच आपले जीवनकार्य मानले.

मराठी पत्रकारितेचा पाया श्रेष्ठ दर्जाच्या संपादकाने- आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी घातला. त्यांनी अल्पावधित महाराष्ट्राच्या जीवनावर विलक्षण छाप टाकली. त्यांनी राष्ट्रीय विकासासाठी पोषक अशा बहुविध क्षितिजाचा विकास केला. त्यामुळे त्यांना पश्चिम भारतामधील प्रबोधनाचे प्रवर्तक म्हटले जाते. मराठी पत्रकारितेचा पाया भक्कमपणे उभारण्यासाठी त्यांनी बजावलेले कार्य हे आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविण्यासारखे आहे. त्यामुळे परंपरेचा सुवर्णप्रवाह विकसित झाला. प्रथम श्रेणीचे आद्य वृत्तपत्र म्हणून 'दर्पण' वृत्तपत्राची कामगिरी लक्षणीय अशी ठरली आहे. दर्पण हे वृत्तपत्र सन १८३२मध्ये काढून मराठी वृत्तपत्रव्यवसायाचा त्यांनी पाया घातला. त्यांनीच सन १८४०मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. त्यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू, या उपक्रमांमागे होता.

सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करुन नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाव्दारे रुजविली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालामध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे नवयुग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. मराठी पत्रकारितेच्या विचार विश्वात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांसारखी विलक्षण कामगिरी बजावणारे ते त्यामुळे युगप्रवर्तक पत्रकार ठरले. सन १८३४मध्ये भारतातील पहिले प्राध्यापक- प्रोफेसर होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. एलफिस्टन निधीतून त्यांच्यासाठी स्वतंत्र अध्यासन निर्माण करण्यात आले. सन १८४५मध्ये राज्यातील शिक्षण विभागाचे संचालक होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. प्राध्यापक या नात्याने अध्ययन,


THE BOMBAY DURPUN
दर्पण

अध्यापन संशोधन व विस्तार ही कार्ये पार पाडण्यात त्यांनी धन्यता मानली. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात नवविचारांची लाट निर्माण करण्यासाठी वैचारिक चळवळ सुरु केली. समाज सुधारणा व शिक्षणाची अभिवृद्धी तेच त्यांनी आपले जीवनकार्य मानले. प्राध्यापक या नात्याने केवळ अध्यापन व संशोधनात ते व्यग्र होते, असे नाही तर त्यांनी राष्ट्रीय जीवनात अनेक प्रागतिक चळवळींना गती दिली. सामाजिक प्रबोधनात वृत्तपत्रासारखे दुसरे साधन नाही, हे ओळखून त्यांनी बंगाली वृत्तपत्रांपासून प्रेरणा घेतली. राजाराम मोहन रॉय यांचे कार्य आणि बंगाली पत्रांनी केलेला झंझावाती प्रचार यामुळे ते प्रभावित झाले. त्यांनी नव्या पत्राचा संकल्प करून तो कृतीत आणला. ध्येयवादी बंगाली पत्राचा वस्तुपाठ त्यांनी गिरविला आणि त्यातून महाराष्ट्रात नवीन लोकचळवळ उभारली. गंगा-यमुना द्वैभाषिक पत्र ही परंपरा बंगालतून महाराष्ट्रात पुढे आली.

आचार्य बाळशास्त्रीं जांभेकर यांच्या समग्र जीवनाकडे पाहिले असता त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे विलोभनीय दर्शन घडते. त्यांना देशी व विदेशी ९ भाषा अवगत होत्या. मराठी, इंग्रजी, संस्कृत, बंगाली, कन्नड इत्यादीप्रमाणे त्यांनी विदेशी भाषांचाही अभ्यास केला होता. त्यांच्या अभ्यासविषयात भाषाशास्त्रे, इतिहास व संस्कृती, गणित, पदार्थविज्ञान, भूगर्भशास्त्र, पुरातत्वविद्या इत्यादीचा समावेश होता. या सर्व विषयात त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचनाही केली. त्यांच्या कार्याबद्दल तत्कालीन वृत्तपत्रांमध्ये प्रामुख्याने बॉम्बे टाईम्स, कुरियर, ज्ञानोदय, ओरिएंटल स्पेक्टेटर इत्यादी पत्रांनी वारंवार प्रशंसा केलेली आढळते व त्यांच्या समाजकार्याची नोंदही घेतलेली दिसते. तत्कालीन शाळा खात्याने त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. मुंबई न्यायालयाचे त्यावेळचे न्या.सर टी.ई.पैरी यांनी त्यांचा गौरव केला होता. रे.डॉ.विल्सन व न्या.चंदावरकर या तत्कालीन विद्वानांनी त्यांच्या लोकाभिमुख विद्वत्तेचा गौरव केला होता. आज बऱ्याच ठिकाणी पत्रकार बांधवाच्या वतीने उत्कृष्ट साहित्यिक, लेखक, कवी, समाजसेवक आदींना दर्पणकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येऊ लागले आहे. समाजानेही पत्रकार बांधव वृत्तसंकलनरुपात करीत असलेली अविरत- अहर्निश सेवा व न्यायदानाची धडपड लक्षात घेऊन यथोचित त्यांचाही दर्पणकार पुरस्काराने गौरव केला पाहिजे, असे जाहीरपणे सुचवावेसे वाटते.

भारतीय राष्ट्रवादाचे पितामह दादाभाई नौरोजी हे जांभेकरांचे विद्यार्थी होते. त्यांनी गुरुबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे, की ते पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वान मुकुटमणी, प्रख्यात पं.अद्वितीय विद्वान होते. मुंबईना समाचार या गुजराथी पत्राने या शिक्षण महर्षींची स्मृती भारतीयांनी सतत जागृत ठेवावी, असे आवाहनही केले होते. दि.१७ मे १८४६ रोजी जांभेकरांचा आकस्मिक मृत्यू झाला. पण अल्पावधित त्यांनी बजावलेले कार्य महाराष्ट्राच्या लोकजीवनाचा कायापालट करणारे ठरले, हेच खरे!

# नामविस्तार दिन : एकीकरणासाठी सुवर्णसंधी



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर नामविस्तार दिन अर्थात १४ जानेवारी जवळ येत आहे. एकीचा विजय म्हणजे नामविस्तार दिन, सतत केलेला संघर्ष म्हणजे नामविस्तार दिन, कोणत्याही पदाची, माना सन्मानाची अपेक्षा न करता केलेला संघर्ष म्हणजे नामविस्तार दिन, वैचारिक तरुणांचे त्याग आणि समर्पण म्हणजे नामविस्तार दिन, स्वाभीमानाचा व सन्मानाचा दिवस म्हणजे नामविस्तार दिन. नामविस्तार दिनाला महाराष्ट्रातच नव्हे तर देशात सर्वाधिक महत्त्व आहे. विद्यापीठाचे नामांतर झाल्यावर तो लोकभावनेतुन साजरा करून विद्यापिठाच्या नामांतरनासाठी शहीद झालेल्या तरुणांना व विद्यापीठ कमानीला सलामी देण्यासाठी लाखोंचा समुह एकत्र येऊन आपल्या एकीचा विजय साजरा करतात. असे कृत्य देशातच नव्हता जगात एकमेव आहे.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापिठाला मिळावे म्हणून सर्वांनी एकत्र येऊन सलग हा लढा जिवंत ठेवला. लढा लढताना कोणत्याही मानापानाची सन्मानाची अपेक्षा केली नाही, लहान मोठा असा भेद केला नाही, सर्वसामान्य लोकांच्या संरक्षणासाठी, विद्यापिठाला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मिळण्यासाठी दगडफेक सहन केली, लाठीमार सहन केला, रक्ताचा सडा सहन केला, अनेक कुटूबांची जळती घरे बघितली एवढेच नाही तर तुरुंगात गेले ते फक्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापिठाला मिळावे म्हणुन. हा लढा लढताना समस्या अनेक आल्या, संकटे अनेक आले परंतु एकीच्या जोरावर हा लढा यशस्वी करून कमानीवर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जेव्हा आले तेव्हाच लढा शांत झाला. एकीकरणाचे एवढे मोठे उदाहरण डोळ्यासमोर असताना, सर्वजन सुशिक्षित आणि अभ्यासु असताना एकीने मिळवलेला विजय बेकीने साजरा करतात तेव्हा मात्र सुशिक्षित पणा, अभ्यासुपणा यावर मात्र प्रश्न चिन्ह उभा राहतो. फक्त नामविस्तार दिनच बेकीने साजरा होत नाही तर सामाजिक आणि राजकीय कामेही वेगवेगळे राहुन केले जातात. अर्थात वेगवेगळे राहुन राजकीय सत्ता हस्तगत करता येत नाही आणि सामाजिक प्रश्नही प्रभावीपणे सोडविता येत नाहीत याची जाणीव असुन ही आणि स्वतः ला आंबेडरवादी समजून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संघटीत होण्याची शिकवण पायदळी तुडवून नेमके काय साध्य होत आहे हा प्रश्न तमान आंबेडकवादी जनते समोर आहे. नामविस्तार दिनी केवळ शहिदांना व विद्यापीठ कमानीला अभिवादन करायला आलेल्या आंबेडकरवादी जनतेला राजकीय हायजॅक करून स्वतः ची जाहिरात करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येकाचे वेगवेगळे स्टेज, बॅनर, आणि गायक व इतर काही खर्च करून नामविस्तार दिन साजरा करण्याच्या नावाखाली स्वतः ची जाहिरात करण्यात येते. अनेक मोठमोठे बॅनर लावले जातात, मोठ मोठे स्वतः चे व स्वतःच्या कार्यकर्त्यांचे फोटो असतात पण शहिद जवानांचे फोटो लावण्याचा विसर मात्र नामविस्तार दिन साजरा करताना पडतो. हिच गोष्ट मनाला सलते. सर्वांनी एकाच स्टेज वर येऊन एकीचा संदेश देऊन एकत्रितपणे राजकारण समाजकारण केले तर काही खासदार काही आमदार नक्कीच येतील, बेकीकरणामुळे वाढलेला खर्च कमी करून उरलेला पैसा गोरगरीब मुलांच्या शिक्षणावर, आरोग्यावर खर्च झाला तर खऱ्या अर्थाने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनाचे काम होईल. परंतु येथे आमदार खासदार एवढेच काय तर स्थानिक स्वराज्य संस्थेत सदस्य ही नसले तरी चालेल परंतु स्वतःच्या कंसातील राष्ट्रीय अध्यक्षाला धक्का लागु नये यासाठी च हा प्रयत्न सुरू असेल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावासाठी जिवाची बाजी लावणारे, लढा जिवंत ठेऊन समाजाचे




वैचारिक प्रबोधन करून समाजात आंदोलनाची उर्जा भरणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कामासाठी काहीच का करत नाहीत हे पाहुन खंत वाटते. जनता आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यासाठी, संविधानासाठी आणि हक्क अधिकारासाठी जिवाची बाजी लावायला तयार आहेत. परंतु नेतृत्व बेकीकरणात गेल्याने वैचारिक जनता हतबल झाली. संविधान धोक्यात आहे, भिमाकोरेगाव स्तंभ धोक्यात आहे, लेण्याचे विद्रुपिकरण करणे सुरू आहे, शिक्षणाचा व्यापार सुरू आहे, रोजगार बंद केला गेला, सार्वजनिक मालमत्तेचे खाजगीकरण केले गेले, इव्हिएमच्या माध्यमातून लोकशाही ची हत्या केली गेली, शैक्षणिक शिष्यवृत्ती बंद झालेली आहे, सुरू आहे ती वेळेवर मिळत नाही, आंबेडरवादी विचारधारेच्या लेखकांना, कार्यकर्ते व सर्वसामान्य लोकांना लक्ष करून त्रास दिला जात आहेत, अनेक ठिकाणी जयंती साजरी केली म्हणून हत्या झाल्याचे प्रमाण वाढले आहे, जनहिताचे अनेक कायदे रद्द झाले आहेत, मार्गदर्शक तत्वाचा चुकिचा वापर केला जात आहे. स्वायत्त संस्थेचा चुकीचा वापर करून सत्ता उपभोगली जात आहे. देश, जनता यांना बाजूला सारून धर्म आणि विषमता यावर खुलेआम चर्चा होत आहे. देशात एकच नाही अनेक समस्या वाढल्या आहेत ज्यावर आंबेडकरवादी नेत्यांनी काम करणे आवश्यक आहे. ह्या सर्व गोष्टी सर्व नेत्यांनाही कळतात परंतु वळत नाहीत. एकत्र आल्याने चळवळीचा व समाजाचा फायदाच होणार चळवळीचा व समजाचा फायदा म्हणजे नेत्यांचाही फायदाच होणार पण नेते बेकीकरणात काय साध्य करत आहेत हेच कळत नाही. आज पर्यंत काय झाले सर्व विसरून केवळ आंबेडकरवादी समाजासाठी, आंदोलनासाठी, संविधानासाठी, शिक्षणासाठी, येणाऱ्या पिढीच्या भविष्यासाठी ईव्हिएम ला विरोध करून लोकशाही च्या संवर्धनासाठी सर्वांनी वैयक्तिक मतभेद विसरून केवळ आणि केवळ वैचारिक मतावर एकत्र येऊन एक पुन्हा मोठे आंदोलन, एक लढा उभा करून संविधान व संविधानाच्या लाभार्थांचे रक्षण करणे आवश्यक आहे. लोकशाही च्या माध्यमातून येथे हुकुमशाही प्रस्थापित होत असताना स्वतः ला आंबेडकरवादी म्हणून घेऊन गप्प बसने हे शहाणपणाचे लक्षन नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संघटीत होण्याचा संदेश दिला. स्वतः च्याच मनाने संघटना सुरू करून त्याचा फायदा फक्त स्वतः ला करून घेण्याचा संदेश अथवा शिकवण बाबासाहेब आंबेडकर यांची नाही. जे बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने चालणार नाहीत, त्यांना डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन राहण्याचा व समाजात मिरवण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. कंसातील राष्ट्रीय अध्यक्ष पद बाजूला काढून आपल्या स्टेजवरून स्वतः च्या च मुलांची जाहिरात करून त्याला नेता म्हणून थोपवण्या अगोदर स्वतः ला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनाचा, चळवळीचा सच्चा व वैचारिक कार्यकर्ता बनवून एकत्र या. जनता तुमच्या च पाठीशी उभी आहे. राजकीय फायदा तुमचाच होणार आहे. जनतेला केवळ वैचारिक व चळवळीत सक्रीय नेता पाहिजे.

अजूनही वेळ गेली नाही. शेवटची एक सुवर्ण संधी आहे. सर्वांनी एकत्र येऊन राजकीय व सामाजिक अजेंडा तयार करावा. सर्वजन एकत्र आल्याने सामाजिक व राजकीय ताकद निर्माण होईल. बाराव्या लोकसभा निवडणुकीत चार खासदार होते आज किमान सहा खासदार येतील, पंचवीस तिस आमदार येतील. कमीत कमी संसदेत आणि राज्य विधीमंडळात मजबूत आवाज उठवणारा एक वैचारिक फळी राहील. एकत्र येऊन इव्हिएमला विरोध करून बॅलेटपेपरवर निवडणूक झाल्यास वैचारिक व काम करणारे प्रतिनिधी निवडून जातील. आंबेडकरवादी नेत्यांच्या एकीकरणामुळे जर ईव्हीएम विरोधात आवाज उठवला तर देशपातळीवर मोठे आंदोलन उभे राहील, आणि बॅलेटपेपरवर निवडणूक झालीच तर अर्धी लढाई जिंकता येईल. म्हणून सर्वांनी मनाचा मोठेपणा दाखवून नामविस्तार दिनाचे औचित्य साधून पुन्हा एवढा एकिकरणाची मशाल पेटवून आंबेडरवादी समाजामध्ये सकारात्मक उर्जा भरून आपल्या कामाला सुरवात करावी. आता वेळ जरी कमी असला तरीही पुर्ण निघून गेला नाही. ऐकमेकांकडे बोट दाखवल्यापेक्षा एकमेकांचा हातात हात घ्यावा म्हणजे इतरांची चुकिच्या नजरेने बघण्याची हिंमत होणार नाही. विचाराचे व चळवळीच्या नेत्यांनी बेकीकरणात राहुन प्रस्थापित पक्षांना पाठींबा देऊन त्यांची ताकद वाढवल्यापेक्षा एकीकरण करून स्वतः ची ताकद वाढवली तर राजकीय सत्ता ही हस्तगत होईल आणि सामाजिक प्रश्न ही सुटायला मदत होईल. समाजातील लेखक, कवी, गायक, सामाजिक कार्यकर्ते यांनी एकीकरणासाठी सामाजिक प्रबोधन करून राजकीय नेत्यांवर नैतिक दबाव आणून त्यांना एकीकरण करण्यासाठी भाग पाडावे. जगाला मार्गदर्शन करणारा आंबेडकरवादाचा भारतात मात्र केवळ वापर केला जातो हि लाजीरवाणी गोष्ट आहे. दुसऱ्याला बाबासाहेब आंबेडकर सांगण्या अगोदर स्वतः बाबासाहेब आंबेडकर स्विकारने आवश्यक आहे. समाजातील जागृत लोकांनी एकीकरणासाठी सर्वोतोपरी मदत करून एकीकरणाला हातभार लावावा. आणि जर एकीकरण झाले नाहीच तर पश्चाताप करण्यापलीकडे काय उरणार? या ही प्रश्नाचे उत्तर शोधने आवश्यक आहे. एकिकरणाने मिळवलेला विजय साजरा करताना पुन्हा एकदा एकीकरण करणे यातच नेत्यांचे मोठेपणा व चळवळीचे भविष्य आहे.

# काव्यप्रतिमेने बहरलेला 'बहावा'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**काव्य आणि सुंदरतेचे अतूट असे नाते असते. अगदी साध्या गोष्टीतही सौंदर्य पाहण्याची आणि प्रामाणिक भावनेचा सुंदर अवखळ झरा होण्याची ताकद कवीकडे असते.आपण चिऊ- काऊचा घास खायला सुरूवात करतो अगदी तेव्हापासून कविता आपल्या जीवनात प्रवेश करते. काव्य ही संकल्पना मुक्त आहे, तिला कोणत्याही व्याख्येत अडकवता येत नाही. 'रमणीय अर्थ प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' अशी काव्याची व्याख्या जगन्नाथ पंडित यांनी केली आहे.**

कवितांमधून आपल्या आजुबाजुचे विश्व, स्वभावतरंग आणि निसर्गरंग , अशा जगण्याचे संदर्भ शब्दबद्घ होत असतात.फक्त शब्दरचना म्हणजे कविता नाही तर त्या रचनेतून अभिप्रेत असलेला अर्थ, शब्दकृतीचे संकेत यांचे विवेचन सहजपपणे वाचकापर्यंत जेव्हा पोहचते, तेव्हा ते अनुभव, भावना फक्त कवीचे राहत नाहीत , त्याला व्यापकता प्राप्त होत असते.

कवयित्री प्रा. प्रज्ञा पंडित रचित 'बहावा' हा काव्यसंग्रह उत्स्फूर्त भावनांचा सुंदर आविष्कार आहे. या काव्यसंग्रहात चारोळया, मुक्तछंद काव्य, दीर्घ कविता तसेच हिंदी कविता असे विविध विभाग आहेत. 'बहावा' हे त्यांचे १६वे पुस्तक आहे. एक सुंदर वृक्ष म्हणून बहावाकडे पाहिले जाते. पानगळीनंतर जेव्हा पिवळ्याधमक फुलांनी झाड लगड़तं आणि खाली पडलेला फुलांचा सड़ा आपल्याला खुणावत असतो, ते दृश्य अतीव देखणं असतं. ही झाडे आपल्याला जीवनाचे चक्र दर्शवत राहतात.सुख- दुःख यांचे चक्र सुरु राहते, पण माणसाला या फुलांप्रमाणे निःस्वार्थी जीवन जगता आले पाहिजे. लाभलेल्या प्रत्येक क्षणी आनंदाची उधळण करता आली पाहिजे. रखरखत्या उन्हात डौलाने उभ्या असणाऱ्या 'बहावा' प्रमाणे या काव्यसंग्रहातील कविता नाजुकशा भावभावनांनी फुललेला आहे.

सहजसुंदर रचना, अल्पाक्षरी तर काही दीर्घ कविता वाचताना मनाला एक प्रकारे शांतता लाभते. रचना , त्याचे विषय हलकेफुलके असले तरी कवयित्री सहजरित्या जगण्याचे सार विशद करते. या कवितासंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे, अस्थिर मनाला स्थिरता प्राप्त करुन देणाऱ्या या कविता आहेत. कुठेही अलंकारिक शब्दांचा वापर न करता अगदी ओघवत्या शैलीने हा काव्यसंग्रह ओतप्रोत भरलेला आहे.

या काव्यसंग्रहातील लहान - लहान रचना मनाचा ठाव घेतात. वाचकांची वाचिक क्षमता आणि आकलन शक्ती या घटकांचा विचार करून मर्यादित पानांमध्ये हा काव्यसंग्रह विसावला आहे. अवघ्या ४८ पानांमध्ये भावनाविष्काराचे दर्शन घडते. तरुण वाचकांनासुद्धा हलकेफुलके आणि एका बैठकीत वाचून होईल अशी पुस्तके आकर्षित करतात. ही मागणी लक्षात घेता कवयित्रीने अगदी नेमकेपणावर भर दिला आहे. या कवितांमध्ये मायेचा ओलावा, नात्यांमधील विविध रंग, मनोबंध आणि जगण्यातील संवेदनशीलता जपण्याचा संदेश अशा विषयांनी पुरेपुर बहरलेला आहे.

या संग्रहातील रचना वाचताना जाणवते की, या




शब्दाशब्दांतून कवयित्रीचे मन मुक्त संचार करत आहे.कवयित्री प्रा. प्रज्ञा पंडित कथा, लेख या साहित्यप्रकारात लेखन करत असल्या तरी कविता हा त्यांचा श्वास आहे, हे पदोपदी लक्षात येते.

'कविता तुझ्या नजरेतच तर उमटतात,
वाचून मी फक्त त्या लिहिते '

या ओळीतून कवयित्रीने किती सहजपणे कवितेच्या निर्मितीचा सुंदर क्षण टिपला आहे.

**कडेवर गर्द उन ठेवून भेट झाली सावलीशी**
**सोसल्या मी याचसाठी जाळणाऱ्या या झळा'**

ऊन - सावली या प्रतीकाच्या माध्यमातून जीवनातील सुख- दुःखाच्या अस्तित्वाचे महत्त्व या ओळीतून अधोरेखित केले आहे.

एकाकी मनाला उभारी देणाऱ्या, खचलेल्या जीवाला नवी दृष्टी देणाऱ्या या रचना खरेच विचारांना सकारात्मक दिशा देणाऱ्या आहेत. एक प्रकारे नवा आत्मविश्वास अंतर्मनात निर्माण होतो आणि मनाला प्रोत्साहन मिळते. कधीही व्यक्त न होणारा, नेहमी स्तब्ध राहणारा, डोळ्यात पाणी न आणणारा बाबा जेव्हा आपल्या जगात नसतो, तेव्हा मनात दाटून आलेली भावना कवयित्रीने ' बाबा' या दीर्घ कवितेत मांडली आहे. आपल्या बाबांपाशी व्यक्त होण्याची संधी कवयित्रीने कवितेच्या माध्यमातून पूर्ण केली.

**'कमकुवत होऊन जगण्यापेक्षा**
**कणखर होऊन जगणे जास्त सोपे'**

स्वतःला सतत प्रोत्साहित करण्यासाठी आणि येणाऱ्या संकटांना बिनधास्त भिड़ण्याची ताकत देणारी 'कानमंत्र' ही कविता आहे. स्वतःच स्वतःला आधार देणं ,स्वयं - प्रोत्साहित करणं किती गरजेचे आहे, हे या कवितेतून जाणवते. कवयित्रीने जीवनातील अगदी साध्या घटकांवरही किती सजगतेने भाष्य केले आहे.

'जीवनात हा चहा असाच राहू दे' म्हणणारी कवयित्री 'किती वादळे, किती झुंज ही बाकी आहे सांग एकदा' अशा रचनेद्वारे संपूर्ण विश्वातील समस्या, दुःख संपू दे अशी भगवंताकडे प्रार्थना करते आहे.

'मन' , 'श्वास मोकळा' , 'ओहोटी' , 'अपमान', 'दुःखाची चव' तसेच 'जिंदगी' , 'कोशिश', 'हरियाली' या हिंदी कविताही तितक्याच वाचनीय आहेत.

संवेदनशील काव्यफुलांनी फुलून आलेला हा 'बहावा' वाचकांच्या दृष्टीला आणि मनाला एक स्थिरता आणि शांतता प्रदान करेल, हे नक्की!

( बहावा - काव्यसंग्रह / कवयित्री : प्रा. प्रज्ञा पंडित / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १०० रुपये)

# जिजाबाई एक बाणेदार व्यक्तिमत्त्व



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**आज सगळं जगच शिवरायाच्या पराक्रमाचा अभ्यास करत आहे. कोणी शिवरायांसारखा व्यक्ती कधी झालाच नाही असे मानतात नव्हे तर जय भवानी जय शिवाजी म्हणत शिवसेनाही शिवरायांचा गौरव करते. अशा या शिवरायांना घडवलं कोणी?ते घडवलं शिवाजीची माता जीजाबाईंनी. जीजामाईचा जन्म बुलढाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथे १२/०१/२०१८ ला झाला. तिला चार भाऊ अनुक्रमे दत्ताजी, अचलोजी, रघुजी आणि महादूजी. ज्यावेळी जीजाऊने खेळणी हातात पकडायची होती. त्यावेळी जीजाभच्या हातात लखुजींनी तलवार देवून युद्धनीतीचे डावपेच शिकवले.**

बालविवाह प्रथा अस्तीत्वात असल्याने वयाच्या सातव्या वर्षांत म्हणजे डिसेंबर १६०५ ला जीजाऊचा विवाह शहाजीशी झाला. पहिला पुत्र संभाजी त्यानंतर एक एक करीत जीजाऊला आठ मुलं झाली. (सहा मुली आणि दोन मुलं.) संभाजी चांगला साहित्यीक होता. त्यांचे मन लढाईत रमले नाही. तरीही जीजाऊच्याच प्रेरणेने तेही युद्धकला शिकले होते. जेव्हा २५जुलै १६४८ ला मुस्तफा खानाने फितुरीने जीजा या गावी शहाजीने कैद केले. त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी विजापुरतर्फे लढत असतांना १६५५ मध्ये संभाजी युद्धात मरण पावला. पुढे रपेट करीत असतांना घोड्यावरुन पडून घायाळ झाल्यानंतर शहीजीदेखील २३ जाने १६६४ ला मरण पावले. महत्वाचं म्हणजे युद्धप्रसंगी शहाजी बाहेर बाहेर असतांना याच मा जीजाऊने शिवरायांना सांभाळले. त्यांचे संगोपनही केले. विशेषतः स्रीयांना युद्धात परवानगी नसल्याने शिवरायांनी घडवीत असतांना त्यांच्यात लखुजींनी शिकविलेल्या गुणांचा व युद्धकौशल्याचा वापर करुन महत्वाकांक्षा भरली. त्यांना राम क्रिष्ण यांच्या युद्धकौशल्यनीत्या शिकविल्या. रामायण महाभारत यातील व्यक्तीमत्वाचा अभ्यास त्यांच्याकडून पाठ करुन घेतला. तसेच जनाबाई, मुक्ताबाई, संत ज्ञानेश्वर शिकवला. तुकाराम समर्थ रामदासही. या सर्वांच्या चरित्रातून प्रेरणा घेवून शिवरायांनी स्वतःच मित्र बनवले. लहानपणापासून डोंगरं फिरणे, किल्ले फिरणे, आडवाटा शोधणे, घोड्यावर बसून फिरणे, नव्हे तर जीवाला जीव देणारे मित्र मिळवणे. ती मैत्री टिकवणे या सा-या गोष्टी बालवयातच शिवाजींनी हस्तगत केल्या. सांबरे पाटलाकडून घेतलेल्या जागेवर पुढे १६३९ ते १६४७ च्या काळात पुण्यात लालमहाल बांधून त्याच ठिकाणी सुरक्षीत ठिकाण मानून जीजाऊला ठेवल्यानंतर जीजाऊंनी त्याच काळात शिवरायांना घडवलं. स्वराज्यस्थापनेसाठी जीजाऊंनी स्वतःचा पोरगा दावनीला लावला.

आज शिवराय हवा आहे. पण आपल्या घरात नाही तर दुस-यांच्या घरात. स्वतःच्या पोराला साधं खरचटलेलंही आपल्याला बघवत नाही. तो मुलगाही मी माझी पत्नी आणि माझी मुले यातच गुरफटून राहतो. पण शिवाजी घडवीत नाही. माय तर नाहीच नाही. आईबाप फक्त शिकवितात. नोकरीसाठी. नोकरीचे आमीष दाखवतात मुलांना. मग मुलेही नोकरीसाठी शिकतात. मग जेव्हा नोकरी मिळत नाही तेव्हा आत्महत्या करतात. आज आम्हाला शिवाजीची वेशभूषा करणारा शिवाजी हवा नाही, तर नाही वेशभूषा केली तरी चालेल. पण शिवाजी महाराजांसारखे गुण असायला हवे आहेत. तसा मुलगा हवा आहे आम्हाला. आम्ही वेषभुषेलाच महत्व देतो शिवरायांच्या. प्रत्यक्षात गुणाला महत्व देत नाही. जर एखाद्यानं म्हटलं की देशावर शत्रूनं चढाई केली. आपल्या मुलाला युद्धावर पाठव. तर कोणीही आपल्या मुलाला युद्धावर पाठवणार नाही. कारण आम्हाला आज आमचा पुत्र प्रिय आहे. मात्र जीजामातेनं तसं केलं नाही. तिनं आपला मुलगा



दावणीला लावला. त्याला स्वराज्यासाठी तयार केलं. ती होती म्हणून स्वराज्य घडलं. कारण तिनं मरणालाही घाबरु नये हेच शिवरायांना सांगीतलं होतं. म्हणूनच आज शिवरायांचा आपल्याला अभिमान आहे. त्यामुळंच आपण आपल्या मुलाची वेषभुषा शिवाजी महाराजासारखी करुन घेतो. तसाच अभिमान जीजावूबद्दलही मनात बाळगावा. ती होती म्हणून स्वराज्याची व्याख्या आपल्याला समजली. तिनं जरी शिवरायांना औरंगजेब, आदिलशाही व निजामशाहीशी दोन दोन हात करायला लावले असले तरी त्याच गोष्टीपासून बोध घेवून आपण अनेक औरंगजेबाच्या अत्याचारी वहीवाटींना तोंड देवू शकलो व त्याचाच फायदा आपल्याला इंग्रजांची गुलामगिरी धुडकावून लावण्यात झाला. ती जर त्या काळात झाली नसती तर आजही आपण इंग्रजांचेच गुलाम असतो.

# माझे आजोबा चारित्र्याची व मायेची खाण

आधुनिक केसरी

मानवी जीवनात आल्यावर मानवी जीवन यशस्वी करणे व जिवाभावाची माणसे कमावणे हे ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्वावर व चारित्र्यावर अवलंबून असते. कोणाचे चारित्र्य व व्यक्तिमत्व फार चांगले असते तर कोणाचे चारित्र्य व व्यक्तिमत्त्व खूपच मलीन व गलिच्छ असते. कोणी चांगल्या व निखळ विचारांचे असतात तर कोणी फारच कपटी व वाईट विचारांचे असतात. तर कोणी बावनकशी चारित्र्याची व मायेची खान असतात. त्यांचे चारित्र्य चोवीस कॅरेट सोने असते.माझे आजोबा व्यंकटी बापूराव कांबळे हे सुध्दा बावनकशी चारित्र्याची खान होते. त्यांनी जीवनभर आपले चारित्र्य व व्यक्तिमत्व सांभाळले. व त्याचबरोबर आपली जिवाभावाची माणसे सुध्दा कमावली. व तसेच त्यांनी आपले चारित्र्य कधीच डागाळू दिले नाही. जीवनात आल्यावर पैसा तर कमावता येतोच पण अगोदर जिवाभावाची माणसे कमवायला शिका हे आजोबा मला नेहमी म्हणायचे. हे कमावलेले माणसेच एकदिवस आपल्या कामाला येतील. असे त्यांना वाटायचे. रुबाबदार राहणे व कडक स्वभावाचे बोलने हे त्यांचे पैलू होते. आयुष्यात कधीच चूकीचे वागले नाहीत व कधीच विनाकारण दुसऱ्यांना त्रास दिला नाही. हे मी जवळून पाहिले आहे.त्यांचे मन आभाळाएवढ्या विशाल उंचीचे होते. सगळ्यांशी प्रेमाणे बोलने व लोकांची मने जिंकणे हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्ये होते. परंतू हल्ली असे चारीत्र्यवान माणसे फार कमी झाली आहेत. अशा चारित्र्यवान लोकांची संख्या वाढणे ही काळाची गरज आहे.परतु सध्या चारीत्र्यहीन लोकांचा सुळसूळाट वाढला आहे.तो कमी होणे फार गरजेचे आहे.त्यासाठी आपल्याला महामानवांचा आदर्श घ्यावा लागेल. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण चारित्र्याला जिवापाड जपले पाहिजे. तरच भ्रष्टाचार, व्याभिचार व अत्याचाराचे प्रमाण कमी होईल.देशाचा व समाजाचा विकास कमी होईल.आज आठ नोव्हेंबर माझ्या आजोबाचा स्मृतिदिन आहे तरी त्यांच्या पावन स्मृतींना कोटी कोटी प्रणाम...

-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे



# हौथी बंडखोरांचा हल्ला : चिंता आणि चिंतन



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

आधुनिक केसरी

**तांबड्या समुद्रातील सुवेझ कालव्यातून मार्गक्रमण करणाऱ्या व्यापारी जहाजावर हौथी बंडखोर ड्रोण व क्षपनास्त्रांनी हल्ले करत आहेत. त्यांना वेळीच लगाम घातला नाही तर मध्यपूर्वेत युद्धाचा भडका उडू शकतो. संबंध जगाला संकटात टाकणाऱ्या हौथी बंडखोरांना कशा प्रकारे आवर घालणार हा खरा चिंतेचा प्रश्न आहे. लोकशाहीच्या रक्षणासाठी दहशदवादा विरूद्ध ठोस कारवाई करण्यात अमेरिका पुढाकार घेणार काय, हा खरा प्रश्न आहे.**

येमेन हौथी बंडखोरांनी तांबड्या समुद्रातील सुवेझ कालव्या नजीक व्यापारी जहाजावर हल्ले करण्यास सुरवात केल्यामुळे साऱ्या जगाची झोप उडाली आहे. येथील वाहतूक ठप्प् झाल्यामुळे जगापुढे मंदीचे आणि महागाई वाढीचे संकट उभे आहे कारण हे बंडखोर, व्यापारी जहाजाच्या हालचालीवर उघडपणे प्रगत लष्करी शस्त्राद्वारे हल्ले चढवित आहेत. जगाच्या इतिहासातील असा धक्कादायक पहिलाच प्रकार आहे. सुमारे तीन महिन्यापूर्वी 7 ऑक्टोबर रोजी हमासने इस्त्राइलवर मध्यरात्री अचानक हल्ला केल्यानंतर इस्त्राइलने गाझापट्टीवर प्रति कारवाई सुरू केली, ती अद्यापही चालू आहे. त्यामध्ये 1800 हजार पॅलिस्टिनी लोकांनी प्राण गमावले. तेव्हा हौथीनी निषेध म्हणून इस्त्राइलला सक्रिय पाठिंबा घोषित केला. इस्त्राइला जाणाऱ्या कोणत्याही जहाजाला सुवेझ कालव्यातून पुढे जाऊ देणार नाही आम्ही त्याची नाकेबंदी करू, कोडी करू, असा इशारा दिला. खरे तर हल्ले करण्यात आलेली सर्व व्यापारी जहाजे प्रत्यक्षात इस्त्राइलकडे जात होते असे नाही परंतु जगावर दबाव टाकण्यासाठी हे धक्का तंत्र हौथी वापरत आहेत. त्यांनी नोव्हेंबर महिन्यात एका इस्त्राइली मालवाहू जहाजालाही जप्त केले आहे. आतापर्यंत अनेक व्यापारी व व्यावसाईक जहाजावर ड्रोण आणि बॅलिस्टिक मिसाईलद्वारे म्हणजे प्रगत क्षपणास्त्रांनी हल्ले केले आहेत त्यामुळे कोट्यावधी डॉलरचे नुकसान झाले आहे. हा उघडपणे अंतरराष्ट्रीय वाहतूक कायद्यांचा भंग आहे. त्यामुळे प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने मित्र राष्ट्रांच्या व्यापारी जहाजांचे संरक्षण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नोंदल ऑपरेशन आरंभिले आहे. यामध्ये इंग्लड, कॅनडा, फ्रान्स, बहारीन, नॉर्वे आणि स्पेन या देशांचा समावेश आहे. ज्या जहाज कंपन्यावर हौथी बंडखोरांचे हल्ले झाले यामध्ये मेडेटिरियन शिपिंग कंपनी, मार्क्स हॅपग-लॉपड कंपनी आणि बी.पी.ए, तेल कंपनी या सह अनेक प्रमुख शिपिंग कंपन्याचा समावेश आहे. या हल्ल्यांना कंटाळून त्यांनी आपली जहाजे तांबड्या समुद्रापासून दूर वळवली आहेत आणि केप ऑफ गुड होप ला वळसा घालून त्यांना 12 तास उशिराने प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे वाहतूक दरवाढ होऊन परवठा साखळी तुटण्याची शक्यता आहे.

**खोल गुंतलेला इराण :** हौथी बंडखोरांना पाठिंबा कोण देतो, त्यांच्याकडे एवढी प्रगत शस्त्रे कुठून आली, त्यांचे एवढे धाडस कसे वाढले या प्रश्नाची उत्तरे जगातील तंज्ञाकडून शोधण्यात आली. अमेरिकेने तांबड्या समुद्रातील व्यापारी जहाजावरी हल्ल्यामागे इराण हा देश खोल गुंतलेला आहे असा सबळ पुराव्यानिशी रोख ठोक आरोप केला आहे. या हल्ल्याचा अर्थ काय, मार्ग बदलल्यामुळे कोणते परिणाम होतील त्यामुळे सागरी युद्धाचा भडका उडेल काय असे अनेक प्रश्न उभे राहतात. लोकशाही राष्ट्राचे नुकसान करावे, हमासच्या बंडाला सहाय्य करावे म्हणून इराण या छुप्या कारवाया करत आहे. आपला त्या हौथी बंडामागे काहीही हाथ नाही असे सांगणाऱ्या चोराच्या उलट्या बोबा अशी इराणची कुट निती आहे. इराण स्वतःचे दुष्ट हेतू साध्य करण्यसाठी येमेनला युद्ध क्षेत्र बनवित आहे. हौथी बंडखोरांना लेबनॉन मधील हिजबुल संघटना तसेच इराण हे देश पाठिशी घालत आहेत.



थोडे मागे वळून पाहता असे दिसते की, 2014 पासून हिजबुल ही संघटना हौथीला युद्ध कौशल्य आणि लष्करी प्रशिक्षण देत आहे. असे अमेरिकेतील दहशहतवादी विरोधी केंद्राने (टेरोरिझम कॉम्बेटिंग सेंटरने) केलेल्या संशोधनानंतर ही माहिती समोर आली आहे. हौथी इराणला आपले मित्र मानतात कारण सौदी अरेबिया हा देश दोघांचा समान शत्रू आहे. या बंडखोरांना शत्रे पुरविण्याचा इराणवर संशय आहे. अमेरिकेच्या मतानुसार इराणी गुप्तचर संघटना हौथीला व्यापारी जहाजांची खडान खडा माहिती देत आहे,त्यामुळे हे बंडखोर जगातील व्यापारी जहाजावर बेछूट हल्ले करत आहेत. इराण हा देश हौथीच्या पाठिशी आहे ते सिद्ध करण्यासाठी अमेरिकेने अनेक सबळ पुरावे जमविले आहेत. त्यामुळे अंतरराष्ट्रीय न्यायालयात लोकशाही राष्ट्रे पहोचलीतर इराणची भंभेरी उडेल.

**इतिहास हौथी बंडखोराचा :** येमेनया देशाच्या मोठ्या भागावर हौथी बंडखोरांनी नियंत्रण प्रस्थापित केले आहे. मालवाहू जहाजावर हल्ले करून जगात आपला दरारा निर्माण करण्याचा या संघटनेचा प्रयत्न आहे. येमेनच्या शिया मुस्लिम अल्पसंख्यांक झैदी या उपपंथातील एक सशस्त्र संघटना आहे, त्यांनी या चळवळीलाव नाव दिले आहे, ते संस्थापक हुसेन अल्ल हुती याच्या नावाने. तत्कालीनयेमेनचे राष्ट्राध्यक्ष अली अब्दुला सालेह यांच्या भ्रष्ट कारभाराचा मुकाबला करण्यासाठी हा गट 1990 साली स्थापन करण्यात आला होता आणि आता तो 33 वर्षाचा झाला आहे. सौदी अरेकिबेयाच्या सैन्याच्या मदतीने येमेनचे अध्यक्ष सालेह यांनी 2023 मध्ये हौथी बंडखोरांना संपविण्याचा प्रयत्न केला परंतु हौथी बंडखोर संपले नाहीत. येमेनच्या सरकार विरूद्ध ते 2014 पासून गृह युद्ध लढत आहेत. सौदी अरेबिया आणि अरब अमिरातच्या नेतृत्त्वाखाली अरब देशांच्या युतीने येमेनच्या सरकारला हौथी बंडखोराविरूद्ध लढण्यासाठी पाठिंबा दिला आहे. संयुक्त राष्ट्र संघाच्या 2022 च्या माहितीनुसार या गृहयुद्धामुळे सुमारे 3 लाख 77 हजार लोक मरण पावले आहेत आणि 4 दशलक्ष लोक विस्थापित झाले आहेत. त्यावरून हौथी बंडखोर हे किती मोठ्या पापाचे धनी आहेत ते स्पष्ट होते. हमास आणि हिजबुल सह इस्त्राइल अमेरिका आणि पश्चिमी लोकशाही देशाविरूद्ध इराणच्या नेतृत्त्वाखाली प्रतिकारात्मक कारवाई करणाऱ्यांचा एक गट म्हणून हौथीने स्वतः ला घोषित केले आहे. हौथी बंडखोर हमासला जाहिर पाठिंबा देत आहेत. इराणमधील सरकारच्या दीर्घकालीन भौतिक समर्थनामुळे हौथीला जोर चढला आहे, तसेच इराणमुळे त्यांच्या अस्थिर करणाऱ्या कृतीला पाठिंबा मिळत आहे.

**लगाम कसा घालणार :** हौथीच्या दहशवादी कारवाया चौखुर आणि सैराट झाल्या आहेत. येमेनच्या अधिकृत सरकारचा त्या बंडखोरांना पाठिंबा नाही, परंतु येमेनची बहुतांश लोकसंख्या हौथीच्या नियत्रणाखाली असलेल्या भागात राहते. तसेच साना आणि येमेनच्या उत्तरेला असलेल्या ताबड्या समुद्राच्या किणारपट्टीवर हौथीचे नियंत्रण आहे. हे बंडखोर त्या भागात कर गोळा करतात आणि नोटा ही छापतात. युनोच्या सुरक्षा परिषदेत असे नोंदविले आहे की, 2010 पर्यंत हौथीचे 100,000 ते 120,000 ऐवढे अनुयाई होते व ते सशस्त्र सैन्य बाळगतात आणि त्यांचे निशस्त्र समर्थकही आहे. अशा या संघटनेवर लगाम घातला नाही तर, हमास, हजिबुल आणि हौथी मिळून मध्य पूर्वेत धुमाकुळ घालू शकतात आणि जागतिक शांततेला धोका पोहचवू शकतात. अमेरिकेने त्या विरुद्ध ठाम कारवाई केल्यास जगाचे आर्थिक नुकसान टाळता येऊ शकेल. सोमालियाच्या किनाऱ्यावरील सागरी चाच्यांचा भारताने जसा बंदोबस्त केला, तसा हैथी बंडखोरांवरही कारवाई करावी लागेल, याबाबतीत भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी ठाम इशारा दिला आहे, तो रास्त होय.

**समारोप :** अशा प्रकारे या चर्चेवरून हे स्पष्ट होते की हौथी बंडखोर उघडपणे हमासची बाजू घेऊन सुवेझ कालव्यातील तांबड्या समुद्रातील व्यापारी जहाजावर ड्रोण व क्षपणांस्त्राचा हल्ला करत आहेत. इराणने हौथीला पाठिशी घालणे थांबविले पाहिजे नाहीतर अमेरिका व लोकशाही राष्ट्रे इराणवर हल्ला करतील आणि त्यामुळे तिसरे महायुद्ध जवळ येऊ शकते. जागतिक व्यापारामध्ये खिळ घालणारे हे युद्ध तंत्र मानव जातीला आर्थिक संकटाच्या खाईमध्ये ढकलणारे आहे. हौथी बंडखोरांना वेळीच लगाम घातला नाही तर गाझापट्टीप्रमाणे येमेन हे सुद्धा युद्ध क्षेत्र होईल आणि जग तिसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले जाईल. हा धोका लक्षात घेऊन दहशतवादाचा भस्मासूर गाडण्यासाठी ठोस कारवाई केली पाहिजे. त्यामुळे सुवेझ कालव्यातील व्यापार सुरळीत पार पडू शकेल. हा जगाच्या आर्थिक प्रश्नांचा गुंता सोडविण्यासाठी हौथी बंडखोरांवर वेळीच लगाम घालणे आवश्यक आहे. जो-बाईडन यांचे प्रशासन अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणात गढून गेले आहे. त्यांना सुवेझ कालव्याकडे पाहण्यास वेळ नाही. वेळीच अमेरिकन नौदलाची कारवाई केली नाही तर,हौथी बंडखोर जगाची व्यापारी व्यवस्था उद्धवस्त करतील आणि त्यामुळे अन्न साखळी तुटले. आफ्रिका व आशिया खंडातील अनेक गरीब राष्ट्रांवर उपासमारीच वेळ येईल, हे लक्षात घेऊन इराणवर कारवाई केली पाहिजे. लोकशाही राष्ट्रांनी आर्थिक निर्बंध लादले पाहिजेत तरच हौथी ही दहशदवादी संघटना जमिनीवर येऊ शकेल. इराणच्या चुकामुळे मध्य पुर्वेत युद्धाचा भडका उडण्याची बिकट परिस्थिती निर्माण होऊ शकते. इराण कोंडित सापडला तर त्याची अवस्था भिक नको पण कुत्रा आवर अशी होईल. त्यामुळे मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार हा खरा प्रश्न आहे.

# आजार एक आमंत्रित पाहुणा



सुरेश मोहिनीराज चौधरी
संपर्क क्र.: 70 20 25 39 48

आधुनिक केसरी

**आजार एक अनामंत्रित पाहुणा आजारपण !या हिवाळ्याच्या सीजनमध्ये बहुतेक ठिकाणीअनेक आजारपण दिसून येतात. सर्दी , थंडी ताप अंगदुखी वगैरे अनेक व्याधींनी अनेकांना व्यापून टाकलेले असते. लहान मुलांबद्दल काही बोलायचं नाही, कारण लहान मुले जन्मल्यापासून पंधरा वर्षाचे त्यांना कांही समज नसते. पुढे तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व वगैरे टप्पे येतात ,या ठिकाणी एक शंका उपस्थित होते की आपल्या महाराष्ट्रात प्रौढ आणि वृद्ध लोक जास्त आजारी पडतात की तरुण ?वृद्ध आजारी पडणे याबद्दल कोणाच्याही मनात असेच विचार येतात की आता यांचं वय झालं आहे.**

ही दुखणी जसे थंडी ताप मलेरिया संधिवात हे आजार वृद्धांना सतवणारच! असेच विचार पीडित मनुष्यही करत असतो! लहान मुलांच्या बाबतीत नगण्य म्हणजे एक ते पाच टक्के मुलेच खूप समजदार असतात, त्यांच्या लक्षात येऊ शकते की ,आपण आजारी कां पडलो? आणि त्यांची काळजी घेणारे पालक म्हणा, आई-वडील म्हणा, असतातच .वेळीच तज्ञ डॉक्टरांकडे मुलांना घेऊन जातात व योग्य ते उपचार उपचार केले जाततच .व त्यांना आरोग्यमुक्ती करून देतात .आता प्रश्न पडतो तो तरुणांचा !तरुण वय म्हणजे उत्साहाने ओतप्रोत भरलेलं ,आम्ही काहीही करू शकतो, वाटेल त्या परिस्थितीत वाटेल तो संघर्ष करीत प्रतिकूल परिस्थितीशी उद्भवलेल्या संधीचा योग्य फायदा घेत यशाच्या मार्गाकडे जाणारा हा तरुण वर्ग असल्याने त्यांच्या कुटुंबाच्याच नव्हे समाजाच्याच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रच तरुणांकडे खूप मोठ्या अपेक्षेनं बघत असतो तरुण पेटला ,म्हणजे काय होतं हा ज्वलंत इतिहास सार्या देशाने पाहिला आहे ,अनुभवला आहे! अनेक तरुण एखादे वेळेस आजारी पडले तर विचार करता येतो. एखादा तरुण एखाद्या वेळेस आजारी पडला तर विचार करता येतो. परंतु नेहमीच आजारी पडणारे तरुण पडणे , हे निश्चितच चिंतनीय आहे !असाच एक जण एका कॉलेजमध्ये भेटायला गेला .तो आरोग्य तज्ञ होता. प्रिन्सिपल साहेबांची भेट घेऊन त्यांना आरोग्यावर व्याख्यानाची संधी द्यावी अशी त्याने प्रिन्सिपल साहेबांना विनंती केली. त्याच्या इच्छेचा मनःपूर्वक आदर करीत ते उद्गारले" अरे जरूर! तुमच्या वयाचा अंदाज मी जर केलात तर तो चुकणार नाही असे मला वाटते .आपण 75 ते 78 या वयात असाल !"चुकला तुमचा अंदाज !"व्याख्याता म्हणाला ." मी वयाची 83 पार केली आहे !"काय सांगता ?आणि डोळ्यांवर अजूनही चष्मा नाही



?"आश्चर्याने प्राचार्य उद्गारले .मग नक्कीच आपल्याला आमचं निमंत्रण मिळेल. " अहो "त्याने दिलेल्या विजिटिंग कार्ड कडे पाहत ते म्हणाले "केळकर नांव ना आपलं? अहो!

काय सांगावं !आज काल वृद्धांपेक्षा तरुणच आजारी दिसतात मला! हार्ट प्रॉब्लेम, हेडेक प्रॉब्लेम, संधिवात प्रॉब्लेम, डायबिटीस प्रॉब्लेम ,थकव्यांचा प्रॉब्लेम ,एक का अनेक! अनेक प्रॉब्लेम्सने आमचे विद्यार्थी त्रस्त असतात. आम्ही आपणांस एक दिवस जरूर निमंत्रित करूत आम्ही. "ती पाच मिनिटाची बैठक संपली तरुणांना हे असं का होतं हे खरोखरच चिंतनिय आहे ज्या तरुणांकडून कुटुंबाच्या त्याच्या निवास निवासस्थानातील परिसराच्या समाजाच्या अर्थात गाव प्रांत आणि राज्य यांच्या भरपूर सकारात्मक अपेक्षा असताना मनात येते की "अरे तरुणा ,कोण होतास तू ?कोण झालास तू ?"अशा अपेक्षा तरुणांकडून पूर्ण होणे शक्य नसल्या तरी किमान स्वतः शक्तिशाली ताकतवर कणखर व कायमस्वरूपी निरोगी तरी त्यांनी राहायलाच पाहिजे अशी अपेक्षा त्यांच्याकडून कुटुंबीयांनी ठेवणे काय गैर आहे मग तो तरुण आपोआपच सर्वच कामे करू लागतो आणि अनेकांच्या अपेक्षा पूर्ण करतो. थोडसं चिंतन जर केलं तर याचे उत्तर मिळायला वेळ लागणार नाही .सकाळी सात ते आठ च्या सुमारास मॉर्निंग वॉक करून परतताना , लघु उद्योजक छोटे छोटे व्यापारी, आपापल्या गाड्या लावून उभ्या असतात .तेथे मिळतात नाश्त्याचे रुचकर पदार्थ भजे, पकोडे ,वडापाव, मिसळपाव ,पावभाजी, कांदापोहे ,किंवा इडली डोसा, वडा सांबर ,इत्यादी !तूफान गर्दी असते या प्रत्येक गाड्यांवर तरुणांची! निःसंशय हे सर्व पदार्थ निश्चितच अप्रतिम चविष्ट असतात याच गाड्यांवर पाणी पिण्याची सोय असते या गाड्या वर कॉलेज तरुणांपासून विविध कंपन्यात काम करणारे कामगार तसेच तरुण वर्ग ही गर्दी करत असतो .याशिवाय अनेक रिकाम टेकडी तरुण मंडळीही या पदार्थांच्या लालचीने त्या ठिकाणी गर्दी करतात .एखाद्या वेळी कधीतरी बदल म्हणून असले पदार्थ खायला काहीच हरकत नाही पण रोज? विचार करा ,हे असले जिभेला अत्यंत आनंद देणारे पदार्थ त्यांनी का प्रतिकारशक्ती वाढते? शारीरिक अंतर्बाह्य यंत्रणा मजबूत होते? ही यंत्रणा कार्यक्षम होते? स्नायू मजबूत आणि कणखर होतात ?पेशी कार्यक्षम होतात ? उलट आपल्या शारीरिक यंत्रणेत एवढा बिघाड होतो की हे पदार्थ कोणकोणते रोग शरीरात निर्माण करतील हे सांगता येत नाही. बरं! प्रत्येकाजवळ बाईक असतेच. दोन फरलांगावर असलेल्या भाजी मंडईत ही मंडळी बाईक घेऊनच जातील. सर्वच तरुण असे वागतात असे या ठिकाणी नमूद करावयाचे नाही .परंतु जवळपास जाण्याचा प्रसंग आला तरीही "तेवढा वेळ वाचतो "या गोंडस कारणाखाली पायी जाण्याची संवय ही तरुण मंडळी टाळतात. हे पदार्थ जरा खाऊन बघा !भिजवलेली मोड आलेली कडधान्ये, साधी वरण-भात भाजी पोळी, भाकरी ,सीजनल फळे ज्यूस लिंबू असे पदार्थ आपल्या आहारात वापरून बघा .रोज सकाळी थोडा व्यायाम करा ,मैदानी खेळ खेळा! आधी ठरवा, नंतर आपली जीवनशैली अगदी तशीच बनवा! मग बघा कोणत्याही रोगाची हिंमत होणार नाही तुम्हाला स्पर्श करण्याची! तरुणांनो मजबूत व्हा, कणखर व्हा,शक्तिशाली व्हा, चार्ज व्हा, आनंदी राहा आणि सर्वोपयोगी, समाजोपयोगी राष्ट्रोपयोगी व्हा, पेटून उठा.



## अनाथांची माय सिंधुताई...

लळा लेकरां लावून,
माय दिगंताला गेली...
तुझ्या विना कोण माय,
आता अनाथांचा वाली...१

तुचं धरले पोटाशी,
तुचं भरविला घास...
व्याकुळल्या त्या जीवांना,
तुझ्या मायेचीच आस...२

संसाराचा सारीपाट,
तुझा उधळून गेला...
धनी कुंकवाचा कसा?
तुझ्या मुळावर आला...३

जरी नाव तुझे चिंधी,
तूच सिंधुताई केले...
नदीपरी गं वासल्य,
माय अनाथांना दिले...४

जन्म दिलास गोठ्यात,
गाय झाली तुझी माता...
लेक आली तुझ्या पोटी,
नाव ठेविले ममता...५

किती सोसलेस माय,
येतो अंगावरी काटा...
राहिलीस स्मशानात ,
हरवल्या साऱ्या वाटा...६

वासनांध नजरांचे,
तुझ्या जीवा वाटे भय...
स्मशानात दडविशी,
तुझ्या देहाला तू माय...७

जेव्हा भुकेने व्याकुळ,
जीव तुझा माय झाला...
खाल्ली भाकरी भाजून,
सरणाच्या निखाऱ्याला...८

फुटलेल्या गाडग्याचे,
माय प्यायलीस पाणी...
कितीं मैल चाललेत,
पाय तुझे अनवाणी...९

कधी घेतला आसरा,
मंदिराच्या गाभाऱ्यात...
पोटासाठी रमलीस,
विठ्ठलाच्या भजनात...१०

जीव इवला कुशीत ,
त्याची परवड झाली...
अन् स्मशानात फिरे ,
माय बाळंतीण ओली...११

तुझ्यासारखीच माय,
तुझी धीराची ही जाई...
तुझ्या माघारी गं झाली,
तुझ्या लेकरांची आई...१२

तुझ्या लेकरांच्या मनी ,
तुझी कोरली गं मूर्ती..
तुझ्यामुळेच होईल,
त्यांची जगतात कीर्ती...१३

तुझ्या स्मृतिदिनी आली,
माझ्या लेखणीला धार...
अनाथांची माय तू गं,
थोरं तुझे उपकार...१४
थोर तुझे उपकार...

सौ.शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे परभणी ९८२३०६६६०६

## दुष्कृत्यांची करूया होळी

सत्कार्याने भरवूया झोळी
दुष्कृत्यांची करूया होळी
द्वेष, मत्सर, लोभ अन हेवेदावे
यासर्वांची बांधून फेकू मोळी

जिद्दीने अगदी कोळयासारखी
पळवून लावू दुष्मनांची टोळी
मुखी गोड पक्वान्न भक्षुया
किंवा वाढुया पुरणाची पोळी

कुविचारी संगतीवर नेम धरुनी
मारा सदवर्तनाची योग्य गोळी
दूरच ठेवूया गर्दी ढोंगीपणाची
शहाणी असो वा साधीभोळी

गुटखा, चरस, मावा, पानसुपारी
जो तो का? हातावर चोळी
आज ठरवुनी जाळून टाकू
बिडी बंडल अन चिमूट-गोळी

मानुया आपल्याच कन्या
शेजाऱ्यांच्या लेकीबाळी
आकांडतांडव नको मानवा
सहकार्याची दे रे हाळी.

पुण्य कमवूया सासरी माहेरी
कधी जाता आपल्या आजोळी
गाठी गुंफूया सुविचारांची
पुटपुटत या कवितेच्या ओळी.

®रज्जाक शेख (श्रीरामपूर)
96657778558



## ज्योत

घनदाट अंधारात
भेदूनीया अंधाराला,
तेवू लागली ज्योत,
प्रकाश त्याचा गेला गगनाला..

तेऊ लागली ज्योत
काळ्या कुट्ट अंधारात
सोसाट्याच्या त्या वाऱ्यात
मंद मंद होती तेवत..

धगधगत्या त्या ज्वाला
निरागस डोळ्यात,
केस हिन त्या ललना
सौंदर्याच्या भोवऱ्यात..

रुढी परंपरेच्या त्या
गोल गोल वादळात
शेण दगड मातीच्या माऱ्यात
निष्ठावान ती कर्तव्यात..

अंधाराला भेदून त्या
अंधारावर करीत मात
एक एक पाऊल पडे
सोनेरी त्या प्रकाशात..

अंधकारातली ती वाट
तेजोवलयातून करीत पार,
अंगणातल्या तुळशीची
सावली दिसे दूर त्या चंद्रावर..

जळता जळता स्वत:ला
प्रकाशमान केल्या दाही दिशा
आशा आकांक्षा फुलवित
उगवली एक नविन उषा..

हजारो शिंपल्यातून सापडतो
असा एखादाच मोती.
नतमस्तक होऊन
कर तेथे जुळती,
मौल्यवान असा तो या जगती..

© सौ.वैशाली महाडिक.
शिरवळ - सातारा
मो.९७६७४३७९२३

## ॥ उद्धार पामराचा ॥

लोंबती लक्तरे तयाची, लाळही गळे,
विपन्नावस्थेत उभा रस्त्यावर तो पामर बळे।
नाही कुणास चिंता त्याच्या भुकेची,
नाही कुणास दया त्याच्या अपंगत्वाची ॥१॥
रूपेरी दौलतीचे धनी वाकुल्या दाखवित,
राजरोस पळती आलिशान गाडीत।
पथिकांचेही गावीही नसे त्याचे आक्रीत,
या निःसंग वृतीने आला तो जीव धोक्यात ॥२॥
सरकार दरबारात अर्ज त्याचा फायलीत,
हलेना तो वजनाविना म्हणती ती जग रीत ।
रोज करी नमस्कार परी घडेना चमत्कार,
आर्जविता नेत्यास तो ही टाकीतसे फुत्कार ॥३॥
बघुनी त्यास एकदा कळवळला एक दयावंत,
उपचार करी बळे नेऊन पथिकाश्रमात।
केशवपनाचा सोहळा झाला नवी वस्त्रे ल्याला,
खुप दिवसांनी मिष्टान्न खाऊन तृप्त झाला ॥४॥
वेळीच कौशल्य मिळवून विणकामाचे,
स्वहस्ते भरजरी शेला विणितसे रामाचे।
तयाचा झुकलेला माथा उन्नत झाला,
जगी एका पामराचा उध्दार झाला ॥५॥
आहेर वा.र.नासिक
बी.ई.एम.आय.ई.बी.ओ.ई
मो.९९५८७८२९८२



## भरम...

ल्योक लय मोठ्ठा हापीसर झाल्लाय
त्येला बी भेटली बैकू हापीसरीन
कोन्नाला काय सांगावं माय
हामचं खटकरम हामच्यासंगं हाय...
लेकराचे दिसले व्हते पाळन्यात पाय
पन बाळोत्यानं झाकून ठुली व्हत्ती त्येची माय
हामी वावरात गेल्ल की चोरून खायाचा
दुद्दावर्ली घट्ट साय...
आत्ता चोरून कै खातोया जनू...?
मजल्यावर मजले बग्गून
हामचं डोस्क लागलंया निस्त भनभनू...
म्या मनलो
फूळूक पान्याचं सागूतीचं इसळून ठू घंगाळ
ह्यो जमानाच हाय वो लय वंगाळ...
कंचं करम...? कंचा धरम...?
ह्यो जीनगानी मंजी निस्ता भरम....
- राम कोत्तापल्ले



## तुझ्या डोळ्यात मी....

धुंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी
बंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

धुसर दिसतो आहे आरशात मी मला
स्कंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

स्वर्गातून बाहेर अता येऊ मी कशाला?
स्वच्छंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

तुझ्या डोळ्यांनी काल लिहिली गझल
छंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

मद मस्त मदिरा प्राशून असा मी
मंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

स्वतःलाच विसरलो मी असा कसा?
बे-धुंद झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

सजले बघ तुझ्या डोळ्यांत चांदणे
चंद्र झालो आहे तुझ्या डोळ्यात मी

© बलराज संघई
9420015108

## नववर्षाचा संकल्प

नववर्षाचा संकल्प म्हणजे
अळवावरचे नुसते पाणी
आता पडले, सरकन सरले
खेळातली गोल गोल राणी

आज केले, उद्या सोडले
ताणल्या जात नाही इरादे
अर्धे मुर्धे राहूनच जाती
पक्क्या संकल्पाचे कच्चे वादे

हरएक वर्षी संकल्प नवा
नऊ दिवसाची नवी नवलाई
चार दिवसात नावीन्याची
उडून जाते निश्चय कलई

निर्धार असला पक्का जरी
पण कच्ची होते सातत्य धार
अल्पावधीतच तुटून जाते
संकल्पाची नवथर तार

@ कल्पना मापूसकर
मीरारोड, ठाणे
मो. 90826 46494




## असेच कधीतरी वाटते

असेच कधीतरी वाटते
परतावेत गेलेले सारे क्षण
मनातील खोल जखमांचे
पुसले जातील जुने व्रण

शिक्षणातल्या अडचणींची
व्हावी थोडी बोथट धार
स्व कष्टाने यश मिळवून
करावे कर्तुत्व शिखर पार

आर्थिक झालेली कोंडी
सोसलेले मान अपमान
अनेक बेड्या पायातल्या
स्वप्नांचे दिलेले बलिदान

गाण्यातल्या सप्तसुरात
सजावा जगण्याचा ताल
आनंद धुंद विहरत जावा
सापडावा हरवलेला काल

आता आयुष्यात उरले
परतीचे सांज रंग जरी
समाधानी तृप्त ओंजळ
दैवाने भरावी मात्र खरी
सौ.माधुरी म. इनामदार...

## शुभ रात्री

मध्यरात्री ची वेळ होता,
जीव सृष्टी ही निजून जाती,
सदैव लख्ख हे नभ
चांदण्याची,
ही जणू शाल पांघरून घेती.

कर्म कार्य अफाट करूनी,
विश्रांती न मिळे कुठे ही,
थकलेल्या ह्या देहाला हे मन,
स्वप्नं दाखवितात उद्याची ही .

शांत निजता हा देह ,
मन हे भ्रमण करीत राही,
स्थिर अस्थिर कला ही मनाची,
मार्ग मनुष्याचे विस्कळीत राही.

करावे नाम स्मरण सदा देवांचे ,
मन चित्त एकाग्र होईल देहाचे,
कष्ट अफाट आणि सदास्मरण,
प्रवास शुभ करी शुभ रात्रीचे .
शुभ रात्री...

- तुषार राजेश लाखे.
- वरोरा, जिल्हा चंद्रपूर.

## किर्ती सुगंध

प्रभात समयी सुगंधी फुलांचा
दरवळे चोहीकडे तो सुगंध
मन होई सर्वांचे प्रफुल्लित
रोम रोम जाहले पुलकित

पत्करला तू जो पेशा
निभवावा तो चोख असा
जनमनात तुझ्या कर्तृत्वाचा
दरवळावा किर्ती सुगंध

असावे चारित्र्य तुझे नेटके
आचरण नसावे ते फाटके
पेरावी सुविचारांची खाण
मित्र परिवारांच्या संगतीत

नसावा तो व्यर्थ दुराभिमान
जागृत ठेवावा तो स्वाभिमान
होई गर्वाचे घर ते खाली
जेव्हा मनी उसळे दुराचार

मनोभावे करावी सेवा
आपुल्या वृध्द आईवडिलांची
जपावे त्यांच्या भावनांना
हेच खरे मानवी संस्कार

कर्माने होतो माणूस मोठा
जपावा मनात हा मंत्र
कुसंगतीने बिघडते ते
आनंदी जीवनाचे ताळतंत्र

सुसंगती सदा घडावी
आपल्या सर्वांच्या जीवनात
गर्जे निनाद मानवतेचा
आपुल्या त्या अंतर्मनात
बबन दामोदर गुळवे

उमरगा कोर्ट, ता.अहमदपूर
मो.९७३०९३९७३२.

## भावना

भावनाच नाही उरली
मनाच्या वेदनेला,
अव्यक्त व्यक्त या शब्दांनी
सांगतो लेखणीला.
शब्दांनीच साधला डाव
बाजार भावनांचा,
क्षणोक्षणी खेळ मांडला
माझ्याच आयुष्याचा.
मर्म ना कळाले मजला
जाणिवांच्या फुलांचे,
वेदनेच्या पाकळ्यांनाही
अश्रूच वाटे मोलाचे.
मन पटलावर
येते सय आठवणींची,
आसवेच सांगती
पुन्हा एकदा लढण्याची

राजेंद्रकुमार शेळके
नारायणगाव,पुणे.

## नवे वर्षे आले...!

फुलांची उधळण ही
साऱ्या अंगणात झाली,
सोन्याचा दिन उगवला
चोहीकडे धरती नटली.
सुख-दुःखाच्या मार्गात
उठती नेहमी ज्वाला,
मोठा संघर्ष करून
गुंफूया विकासाची माला.
नसानसातून जोश
चित्ती उधळू दे गडे,
संकल्प पूर्ण करण्यास
माथा टेकुया देवापुढे.
चांगले जगण्यासाठी
जिद्दीने संघर्षाला मारू,
विज्ञानाच्या प्रकाशाने
भव्य-दिव्य क्रांती करू.
चैतन्य ऱ्हदयात घेऊनी
नैराश्याची होळी करूया,
उत्साह मनात आणून
विकासाचा मार्ग धरूया.
नवीन युगाचे गाणे
आनंदाने गाऊ मनी,
चांगले संकल्प करू
या नव्या वर्षाच्या दिनी...!
- अय्युब पठाण लोहगांवकर

# माता रमाई आंबेडकर

आधुनिक केसरी

**माता रमाईच्या जयंतीचं हे एकशे पंचविसावं वर्ष. परंतु आंबेडकरी चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते यांनी मोठ्या प्रमाणावर या वर्षाकडे दुर्लक्ष केले. बाबासाहेबांची १२५ वी जयंती जशी धुमधडाक्यात साजरी झाली तशी रमाईच्या १२५ व्या जयंतीचं वर्ष साजरं व्हायला हवं होतं. पण ते तसं झालं नाही. रमाईच्या आदर्शवादाचा, जगण्याचा तसेच रमाई या आपल्या सगळ्यांच्या अस्तित्वाचा महोत्सव साजरा व्हायला हवा होता. अख्खं वर्ष संपत आलं तरी आपल्यातल्या कार्यकर्त्याला जाग आलेली दिसत नाही.**

संबंध महाराष्ट्रातल्या अनेक स्वयंघोषित आंबेडकरी नेतृत्वांनी आणि त्यांच्या चेल्या चपाट्यांनी ही मोठी घोडचूक केली आहे. ती केली नसती तर त्यांचं नेतृत्व सिद्ध झालं असतं. कारण पुढील ७६ व्या वर्षात कितीही आदळआपट केली तरी ही चूक भरून निघणारी नाही. शासकीय पातळीवर काय झाले ते माहीत नाही कारण काही स्तुतिपाठकांनी कोल्हेकुई केल्याचे ऐकिवात आहे. महामानवांना २५ काय नि ७५ काय दररोजच जयंती साजरी करता येते, अशी सारवासारव केली तर काही अर्थ नसेल. मानवी आयुष्यात अनेक वर्षे असतात आणि त्याचे महत्त्व किंवा वैशिष्ट्य वेगळे असते. ७५ व्या रमाई जयंती वर्षात आंबेडकरी समाज आणि चळवळीच्या अनुषंगाने महोत्सवाचा विचार अगदी कोणत्याही परिस्थितीत पुढे आलेला दिसत नाही. परंतु हा विचार बुद्धीष्ट रिसर्च फाऊंडेशन या नांदेडातील संस्थेने केला आणि रमाईच्या जयंतीचं शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष संपण्यापूर्वी हा महोत्सव घडवून आणण्यासाठी दिवस रात्र एक केला, त्याबद्दल आंबेडकरी समाजानेच नव्हे तर तमाम भारतीयांनी बीआर फाऊंडेशनचे आभारच मानले पाहिजेत. कारण रमाई नसत्या तर बाबासाहेब हे बाबासाहेब नसते. बाबासाहेब नसते तर तुम्ही आम्ही नसतो. हे त्रिकालाबाधित सत्य आहे. रमाई बाबासाहेबांची केवळ एक पत्नी, सहचारिणी नव्हती तर ती कोट्यवधी दीनदुबळ्यांची आई होती. रमाई बाबासाहेबांनी स्वतःची एकूण चार अपत्ये गमावली पण त्यांनी या देशातील लाखो सूर्यपुत्रांना जन्माला घातले. बाबासाहेबांच्या बाबासाहेबपणात रमाईचा असीम त्याग समाविष्ट झालेला आहे. या त्यागाची परतफेड होऊ शकत नाही. परंतु एक छोटासा प्रयत्न असणारा सावित्री रमाई महोत्सव हा एक ऐतिहासिक सोहळा असणार आहे. एक दिवस रमाईसाठी महोत्सव आयोजित करून फार मोठे कार्य केले असे अजिबात नाही तर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेली ही धडपडच आहे, असे म्हणता येईल.

नांदेडातल्या बी. आर. फाऊंडेशनने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि रमाई जयंतीच्या पार्श्वभूमीवर शहरातील कै. डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात सावित्री रमाई महोत्सव आयोजित केला आहे. या निमित्ताने सावित्रीच्या लेकींचा सन्मान होणार आहे. यात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या उच्चशिक्षित किंवा उच्चपदस्थ महिलांचा सन्मान होणार आहे. मात्र, अजूनही काही आमच्या माया बहिणी रमाईगत जगण्याला जळण्याची झालर लावून जीवन जगत आहेत. त्यांचाही सन्मान होणे अपेक्षित आहे. सावित्रीच्या लेकी या रमाईच्याही लेकीच आहेत. रमाईच्या त्यागावर आणि सावित्रीमाईच्या क्रांती चळवळीवर आज अनेक महिला विविध क्षेत्रात भराऱ्या मारत आहेत. पिढ्यानपिढ्यांच्या गुलामगिरीला तोडून स्वातंत्र्याची फळे चाखत आहेत. ही फळे या मुक्तीच्या झाडाला उगीचच लगडलेली नाहीत. हे झाड काल्पनिक नाही. या झाडाला एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकाने रक्ताचे पाणी करून सिंचिले आहे. याला अविरत चालणाऱ्या संघर्षाचे सेंद्रिय खत घातले आहे. हे झाड केवळ स्त्रीमुक्तीच्या भाषणांवर वाढलेले नाही. जिवाची पर्वा न करता वेळोवेळी पुकारलेल्या लढ्यांच्या विश्वविजयी फुलमोहोरांचे ते संगोपन आहे. हरेक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आपले अस्तित्व सिद्ध करणाऱ्या स्त्रियांनी सावित्री रमाई यांना जाणून घेतले पाहिजे. आज मिळणारे सुखवैभव, सुखनैव आयुष्य ही त्यांचीच देण आहे. आजच्या या मायालेकींना केलेली जन्मोनजन्मींची ती बोळवणच आहे. म्हणून आजच्या कोणत्याही जाती धर्मातील स्त्रियांनी 'सावित्री - रमाई'ला विसरता कामा नये. आजच्या हिंदुस्थानी स्त्रिया मोठ्या प्रमाणावर धार्मिक व्रत वैकल्यात गुरफटलेल्या आहेत. त्या अजूनही धार्मिक बंधनाच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या आहेत. तसेच पुरुषी अत्याचाराखाली त्या दबलेल्या, सर्व प्रकारच्या शोषणाला बळी पडलेल्या आणि अंधश्रद्धांच्या आहारी गेलेल्या या स्त्रियांनी हेच आपलं आयुष्य आहे; तेच आपले नशीब आहे असे मानले; आजपर्यंत तसे त्या मानीत आल्या आहेत. या सर्व प्रकारच्या गुलामगिरीने त्यांचे स्वाभाविक सौंदर्य जाळून त्यांना कुरुप करून ठेवले आहे. पण हे त्यांच्या सहजासहजी लक्षात येत नाही, अशी असणारी परिस्थिती सर्वत्र दिसून येते. सण, उत्सव आणि व्रतवैकल्ये उपवास यांच्या आधीन राहून स्वतःचे शारीरिक सौंदर्य उजळविण्यात त्या स्वतःला धन्य मानतात. उच्चशिक्षित किंवा उच्चपदस्थ अधिकारी असल्या तरी आणि पती कसाही असला



तरी वडाच्या झाडाला दोरा गुंडाळून तोच नवरा मागण्याचा प्रघात अजूनही सुरूच आहे. आपला पती श्रेष्ठ आहे आणि आपण त्याची मानसिक तथा शारीरिक दृष्टीने सेवाभावी दासीच आहोत, ही मानसिकता जाता जात नाही, हे त्या महिलांसह त्यांच्या जातसमुहाचीही शोकांतिका आहे. अशा महिलांनी एक तर सावित्री रमाईंना सोयीस्कररीत्या बाजूला केले किंवा केवळ फोटोला पुष्पमाला अर्पण करण्याइतकेच मर्यादित ठेवले. त्यामुळे इतरवेळी देवीदेवतांचे फार मोठे प्राबल्य त्यांच्या आयुष्यात असलेले दिसून येते. आपण धर्माच्या नावाखाली वेगवेगळ्या पद्धतीने गुलाम केले जात आहे याची साधी जाणीवही त्यांना नसते. शिक्षण हे वाघिणीचे दूध मानून प्राशन करणाऱ्या या महिलांनी खरं तर वाघिणीगत या व्यवस्थेविरोधात चवताळून उठले पाहिजे. पण तसे होताना दिसत नाही, धर्म हा श्रद्धेचा विषय मानला जातो. धर्म आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेची गुलामी वंशपरंपरेने आजीकडून आईकडे, आईकडून बाईकडे, बाईकडून ताईकडे अशी आली असल्यामुळे आणि त्यांना त्यामुळेच आपल्या गुलामीची जाणीव नसल्यामुळे ती झिडकारून टाकण्याचा विषयच निर्माण होत नाही.

स्त्रीमुक्तीचा विचार बुद्ध काळापासून पुढे सतत प्रसवत राहिला आहे. भारतीय संविधानाने पुरुषांच्या बरोबरीचा हा समानतेचा नव्हे तर सर्वांगीण दृष्टीने समतेचा विचार केलेला आहे. बुद्धाच्या मानवी स्वातंत्र्याची विचारधारा संविधानाने ह्या भारतवर्षाला दिली आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अथक परिश्रमातून बुद्ध तत्त्वज्ञानाचे प्रतिबिंब भारतीय संविधानात पडलेले आपल्याला दिसते. हे संविधान स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा हक्क आणि आपले स्वतंत्र मानवी जीवन जगण्याचा अधिकार प्रदान करते. परंतु ग्रामीण भागासह शहरातही विविध पातळ्यांवर पुरुषच कारभारी असल्याचे आपणास पदोपदी जाणवते. स्थानिक स्वराज्य संस्थेपासून देशाच्या सर्वोच्च संस्थेपर्यंत या स्त्रियांच्या पाठीमागे पुरुष भक्कमपणे उभे ठाकतात. स्त्रियांची दशा आणि दिशा ठरविण्याचा पारंपरिक वारसा पुरुषांकडेच आहे. ज्या स्त्रियांनी कौटुंबिक बंधने झुगारली; त्या महान झाल्या. पण कुटुंब भावनेला सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक स्त्रियांनी आपल्या उज्ज्वल भविष्याला तिलांजली दिली आहे. आपले करियर संपुष्टात आणले आहे. लग्नाआधी चित्रपटसृष्टीत नाव कमावणाऱ्या नट्यांचे लग्नानंतर काय होते, हे याचे उत्तम उदाहरण आहे. लहानपणी वडिलांच्या छत्रछायेखाली वाढावे, कुमारवयात भावाने संरक्षण करावे, लग्नानंतरचे तारुण्य नवऱ्याने सांभाळावे आणि म्हातारपणीच्या काठीचा आधार मुलगाच व्हावा ही धर्मांध सांस्कृतिक मानसिकता भारतीय महिलांची अजूनही गेलेली नाही. त्यांनी अशा स्वरूपाच्या जीवनाला खरे जीवन मानून आपलेसे केले आहे. या जीवनात तिला निर्णयप्रक्रियेत कोणतेही स्थान नाही, एवढेच नाही तर स्वतः संबंधी निर्णय घेण्याचाही अधिकार तिला नाही. अडाणी अशिक्षित असणाऱ्या शेतमजूर व शेतकरी महिलांनी काबाडकष्ट केले तरी तिला मिळालेल्या पैशांवर घरातील पुरुषांचाच अधिकार राहिलेला आहे. तिची वेशभूषाच अशी मान्य करण्यात आली की, तिच्या कपड्यांना खिसाच नाही. या नव्या आधुनिक युगात तिनी पर्स वापरली तरी त्यात पैसा कुठून येणार? बदलत्या काळानुसार स्त्री जेव्हा कमावती झाली तेव्हा तिच्या पैशाच्या अधिकारावरची पुरुषांची पकड हळूहळू कमी होत गेली असली तरी ती कायमची संपुष्टात आलेली नाही. नोकरी व्यवसायात असलेल्या महिलांना पुरेसा पैसा मिळत असला तरी त्याचे विस्तारित अर्थकारण पुरुषांच्याच हाती असते. अपवादात्मक परिस्थितीत ज्या स्त्रियांनी पुरुष जिवंत असताना घरासह बाहेरचाही आर्थिक कारभार हाती घेतला आहे, त्याबरोबरच कौटुंबिक निर्णय घेण्याचा अधिकारही स्वतःकडे ठेवलेला आहे अशी परिस्थिती पुढारलेल्या समाजाला पडद्याआडून मान्य होत नाही. स्त्रियांच्या शिक्षणाला आणि नोकरी व्यवसायाच्या क्षेत्रात आपले भविष्य घडविण्याच्या प्रक्रियेला विरोध करणारी समाजमान्य पुरुषांची जमात आजही वेगवेगळ्या कारणांनी कार्यरत आहे. त्यांचे वर्चस्व कायमस्वरूपी झुगारून द्यायचे असेल तर सावित्री रमाई नावाचे शस्त्र सतत परजत राहावे लागेल. मी माता सावित्री आणि रमाईच्या कार्यकर्तृत्वामुळे घडले, माझे आयुष्य नि भविष्य उजळले असे छातीठोकपणे सांगणाऱ्या महिलांनी 'सावित्री-रमाई' जिवंत ठेवण्यासाठी काही अर्थनिर्णय घेणे गरजेचे आहे. ही सुरुवात खरे तर आपल्या घरापासूनच करायला हवी. पोकळ स्वरूपाची कृतज्ञता व्यक्त करण्याची केवळ वल्गना न करता त्यांनी आपली मजुरी, मिळकत, मानधन, पगार किंवा वेतन यातील काही हिस्सा खऱ्या अर्थाने ज्या माय माऊल्यांनी आपल्याला घडविलं, ज्यांनी आपलं मानवी जीवन कारणी लावलं, त्यांच्या चरणी अर्पण करायलाच हवे! इतके या निमित्ताने समजून घेतले आणि तसे वागण्याचा प्रयत्न केला तरी जगण्याचे प्रयोजन सफल होईल, ह्यात शंका नाही.

प्रज्ञाधर ढवळे
९८९०२४७९५३

# भारत - ऑस्ट्रेलिया सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार लागू



किरणकुमार आवारे
संपर्क क्र. 9423086021

आधुनिक केसरी

**एप्रिल-नोव्हेंबर २०२३ मध्ये भारताकडून ऑस्ट्रेलियाला केलेली मालाची निर्यात १४ टक्के नी वाढून ५.८७ अब्ज डॉलर झाली तर, देशाच्या एकूण व्यापारी मालाच्या निर्यातीत मात्र घट झाली. डिसेंबर मध्ये भारत ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार लागू झाला. एप्रिल-नोव्हेंबर २०२३ या कालावधीत ऑस्ट्रेलियामधून भारताची आयात १९ टक्के नी घसरून ११.१४ अब्ज डॉलर झाली आहे. सर्वसमावेशक आर्थिक सहकार्य करार (CECA) लागू झाल्यांनतर भारत आणि ऑस्ट्रेलिया द्विपक्षीय व्यापार ३० अब्ज डॉलर वरून १०० अब्ज डॉलर वार्षिक वाढण्याची आशा आहे.**

बांगलादेश, साखर आयात कर :- बांगलादेशने साखरेच्या आयातीवरील कर कमी केले. कच्च्या साखरेवरील प्रतिटन ३००० टी.के वरून १५०० टी.के करण्यात आली आहे तर शुद्ध साखरेवरील ६००० टी.के वरुन ३००० टी.के करण्यात आली आहे, परिणामी भारतातून बांग्लादेशला साखरेच्या निर्यातीत वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे देशातील भाव वाढतील असे वाटत नाही, पण बांगलादेशातील साखरेचे भाव मात्र कमी होऊ शकतात. बांगलादेश दरवर्षी आवश्यकतेच्या ९० ते ९५ टक्के साखर आयात करते.

**खाद्यतेलाची खपत :-** देशातील खाद्यतेलाची उपलब्धता वाढविण्यासाठी सरकारने खाद्यतेलाच्या आयातीवरील नियंत्रण कमी केले, सन २०२२-२३ हंगामामध्ये १,३८ लाख कोटी रुपयांच्या खाद्यतेलाची आयात झाली. खाद्यतेलाची खपत प्रति व्यक्ती १ किलोने वाढून साडे सतरा किलो प्रति व्यक्ती प्रति वर्ष इतकी झाली. सर्वात जास्त खाद्य तेल स्पेन मध्ये प्रति व्यक्ती प्रति वर्ष ३३ किलो इतकी आहे. खाद्यतेलाची मागणी आणि खपत सातत्याने वाढताना दिसत आहे. केंद्र सरकार तेलबियांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करत आहे.

**अन्न महामंडळाकडून ३ जानेवारीला लिलाव :-** भारतीय अन्न महामंडळाच्या महाराष्ट्र प्रादेशिक कार्यालयाच्या वतीने दि. ३ जानेवारी ला लिलावांतर्गत गहू आणि तांदळाचा साठा विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. यामध्ये १७५०० मेट्रिक टन गहू आणि ५००० मेट्रिक टन तांदळाचा साठा विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्र विभागाअंतर्गत एकूण २५ धान्यसाठा आगारातून गव्हाचा तर,९ धान्यसाठा आगारातून तांदळाचा साठा उपलब्ध करून दिला जाणार आहे. खुल्या बाजारातील विक्री योजनेमुळे अन्नधान्यांच्या वाढत्या किमतीने आळा घालण्यास मदत होणार आहे.

**सोयाबीनचे भाव :-** आंतरराष्ट्रीय बाजारात खाद्यतेल स्वस्त झाल्याने विक्रमी आयात झाली. यामुळे देशात स्वस्त दराने खाद्यतेल आले. यामुळे तेलबियाचे भाव दबावाखाली आले. सोयाबीनच्या दरावर परिणाम झाला. सोयाबीन फुलोऱ्यात असताना पावसाने खंड दिल्याने सोयाबीनचे मोठे नुकसान झाले. त्यामुळे त्याचा उत्पादनावर परिणाम झाला. नजीकच्या काळात सोयाबीनचे भाव वाढतील असे वाटत नाही. खुल्या बाजारपेठेत सोयाबीन चे भाव ४५००-४८०० रुपये प्रति क्विंटल इतके राहतील असे वाटते.

**तूर दरात घसरण :-** बाजारात तूर दरात घसरण झाली आहे मात्र चणा आणि उडदाचे भाव स्थिर राहिले. तुरीच्या किमती ३५० रुपयांनी कमी होऊन ८८०० ते ८९०० रुपये प्रति क्विंटल झाले. चण्याच्या किमती ५००० ते ५६०० रुपये प्रतिक्विंटल वर स्थिर राहिल्या. उडदाचा भाव ७००० ते ९२०० रुपये प्रतिक्विंटल या दरम्यान स्थिर राहिले.

**तूर विक्रीसाठी नव्या पोर्टलचे उदघाटन :-** देशातील तूर उत्पादकाकडून पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने तूर खरेदी केली जाणार आहे. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत या पोर्टलचे उदघाटन करण्यात आले. या पोर्टलद्वारे नाफेड आणि एनसीसीएफ सारख्या सहकारी संस्थांकडून तूर डाळीची खरेदी शेतकऱ्याकडून केली जाईल. त्यामुळे तूर डाळीच्या किमती नियंत्रित राहण्यास मदत होईल

**कांदा, तेजी-मंदी :-** कांद्याचे भाव सातत्याने घटत आहेत. मागील एका महिन्यात कांद्याच्या भावात जवळपास ४० टक्के ची घसरण झाली. भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने निर्यातबंदी लागू केली होती. आता उपलब्धता अधिक असल्याकारणाने कांद्याची निर्यात पुन्हा खुली केली जाऊ शकते. पण कांद्याची निर्यात सुरु केली तरीही कांद्याच्या भावात जास्त सुधारणा होईल असे वाटत नाही. फक्त ३ ते ४ रुपये प्रतिकिलोची वाढ दिसू शकते. बफर साठ्यासाठी केंद्र सरकारने २५ हजार टन खरिप कांद्याची खरेदी केली. केंद्र सरकारने २०२४ मध्ये कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी बफर साठा हा ३ लाखावरुन ७ लाख टनापर्यंत वाढविण्यात आला आहे. बाजारात मार्च पासून मोठ्या प्रमाणात उन्हाळ कांदा येण्यास सुरु होईल. जसजसे भाव कमी होतील तसतसे सरकारकडून खरेदी वाढेल.

**गहू, तेजी-मंदी :-** देशात ३२० लाख हेक्टरवर गव्हाची लागण झाली. पण विपरित वातावरणामुळे उत्पादकता कमी राहण्याची शक्यता तज्ञांकडून वर्तवली जात आहे. पण तरीही ११४० लाख टनावर गव्हाचे उत्पादन होण्याचे अंदाज अन्न महामंडळाने वर्तविले आहे. गव्हाचे वितरण जास्त झाल्यामुळे सरकारी साठा कमी आहे, सरकार यावर्षी गव्हाची खरेदी वाढवू शकते. याचा निश्चितच फायदा भाव वाढीवर होऊ शकतो. पण खुल्या बाजारपेठेत वितरण अधिक असल्याने मोठ्या वाढीची शक्यता नाही. अन्न महामंडळाकडून गव्हाची खरेदी यावर्षी लवकर सुरु होईल.

**जिरा लागवड क्षेत्रात वाढ :-** जिरा उत्पादनात अग्रेसर असणा-या गुजरात आणि राजस्थान या दोन्ही राज्यांमध्ये या हंगामात जिऱ्याच्या लागवड क्षेत्रात वाढ झाल्याचे पहावयास मिळाले असून याचा परिणाम जिऱ्याच्या भावावर दिसुन आला. त्यामुळे जिऱ्याचे भावजवळपास निम्म्याने कमी झाले. सध्या जिऱ्याचे व्यवहार२९ हजार ५६० रुपयांवर पोचले आहेत. दोन महिन्यांपूर्वी हाच भाव जवळपास ६५ हजार रुपये होता. बाजार समित्यांमध्ये जिऱ्याला ३० हजार ते ३२ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. नवा जिरा बाजारपेठेतयेण्यास अजूनअवकाश आहे. पण उत्पादन वाढीच्या अंदाजामुळे व्यापारीमागील हंगामातील साठवणुकीतील जिरा सध्या विक्रीस आणत आहेत. याचा दबावनवीन जिरा बाजारात आल्यानंतरही कायम राहू शकतो.

**शेतकऱ्यांकडे ७० टक्के कापूस शिल्लक :-** दि.१ ऑक्टोबर पासून ३१ डिसेंबर पर्यंत जवळपास ३० टक्के कपास बाजारपेठेत आली. अजूनही ७० टक्के कापूस शेतकऱ्यांकडे शिल्लक आहे, अपेक्षेपेक्षा भाव खूपच कमी असल्यामुळे शेतकरी कापूस विक्रीस तयार नाहीत. अवकाळी पाऊस गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव आणि कमी मोसमी पावसामुळे कपाशीची गुणवत्ताही कमी आहे, नजीकच्या काळात कपाशीच्या भावात चांगली वाढ होईल असे वाटत नाही.

**वाईन उद्योगास प्रोत्साहन देणारी योजना :-** राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी वाईन उद्योगास प्रोत्साहन देणारी योजना पाच वर्षासाठी राबविण्याचा निर्णय गुरुवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. ही योजना कोविड काळात २०२०-२१ मध्ये बंद करण्यात आली होती. राज्यातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना लागवडीसाठी प्रोत्साहन देणे, सुका मेवा बनविणे तसेच पर्यायी उत्पादनाची निर्मिती करण्यासाठी या वाईन उद्योगाला प्रोत्साहन देणारी योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेत सन २०२०-२१, सन २०२१-२२ आणि सन २०२२-२३ या वर्षात उद्योजकांनी व्हॅटचा भरणा केला आहे. सन २०२३-२०२४ हे आर्थिक वर्ष संपण्यास कमी कालावधी शिल्लक असून योजना बंद होण्यापूर्वी निश्चित केलेल्या १६ टक्के प्रमाणे व्हॅटचा परतावा देखील देण्यात येणार आहे.

**इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन :-** मक्यावरील इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रति लिटर ५ रुपये ७९ पैसे अनुदान दिले जाणार आहे. सध्या ६६.०७ रुपये प्रतिलिटर या दराने इथेनॉलची खरेदी केली जाते. आता ७१ रुपये ८६ पैसे या दराने खरेदी केली जाईल. सन २०२५ पर्यंत भारत सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण २० टक्के इतके ठेवले आहे. याचा मक्याच्या भाव वाढीला निश्चितच फायदा होऊ शकतो.

**सिल्क समग्र-२ योजनेला मान्यता:-** राज्यातील रेशीम शेतीला चालना मिळून राज्यातील शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र-२ ही योजना सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या कालावधीत राज्यात राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**रब्बी लागणक्षेत्र :-** रब्बी हंगामात ९१ टक्के पेरण्या पुर्ण झाल्या. ज्वारीचे लागणक्षेत्र वाढले तरीही एकूण पेराक्षेत्र मात्र कमीच आहे. महाराष्ट्रात रब्बी लागण क्षेत्र ५४ लाख हेक्टर आहे त्यापैकी ४९ लाख हेक्टरवर लागण झाली. मागील वर्षापेक्षा १० टक्के लागण कमी आहे. नोव्हेंबरच्या अखेरीस झालेल्या पावसामुळे २३ लाख २० हजार हेक्टरवर पोहचले जे मागील वर्षाच्या तुलनेत ८ टक्के ने अधिक आहे. ज्वारीचे लागण क्षेत्र १३ लाख ७० हजार हेक्टरवर पोहचले जे मागील वर्षाच्या तुलनेत ९ टक्के ने अधिक आहे. मक्याचे लागणक्षेत्र १९ टक्के आणि गहूचे लागणक्षेत्र २० टक्के ने अधिक आहे. डिसेंबर अखेर पर्यंत रब्बी हंगामात ९१ टक्के पेरण्या पुर्ण झाल्या. ज्वारीचे लागणक्षेत्र वाढले.



# लैंगिक समस्या निदान व उपचार

आधुनिक केसरी

**नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.**

**पन्नाशीनंतरचे कामजीवन : पन्नाशीनंतरच्या कामजीवनाबद्दल अनेकांना अतिशय कुतुहल आणि उत्कंठा देखील असते. अनेक जण असेही म्हणतात की एकदा का पन्नाशी उलटली की आपला कार्यभाग संपला. मुलेही मोठी झाली. आता शरीरसंबंधांची गरज नाही. अनेकांना असं वाटतं की मुलेबाळे झाली, त्यांची लग्न झाली की सामाजिकदृष्ट्या हा भाग संपतो किंवा कमी होतो. खरं म्हणजे असे अजिबातच नाही. सेक्स हे एक प्रकारचे 'ब्रेन टॉनिक' आहे. जे शरीर आणि आरोग्य निरोगी राखण्यासाठी भरपूर मदत करते. काही कारणांमुळे लैंगिक शिथिलता आली असेल तर तज्ज्ञांना दाखवून त्यावर उपचार करून घेता येतात. वय वाढल्यानंतर लैंगिक क्रिया किंवा इच्छा कमी होते हे अत्यंत चूक आहे. बऱ्याचदा वय जास्त असलेल्या स्त्रीसोबत संबंध असणे किंवा तिच्यासोबत लग्न करणे हा विषय आता पूर्वीसारखा अमान्य राहिलेला नाही. पन्नाशी उलटलेल्या व्यक्ती, कमी वय असलेल्या व्यक्तीपेक्षा अधिक चांगल्या प्रकारे समागम करू शकतात. कारणे - त्यांना क्रिया करताना अजिबात घाई किंवा लवकर उरकण्याची गडबड नसते. ते समोरच्या जोडीदाराला पूर्ण आनंद देण्यासाठी प्रयत्नशील असतात. समागम करणे एवढेच त्यांचे ध्येय नसते. त्यांना इतर गोष्टींमध्ये (फोर प्ले) मध्ये जास्त रस असतो. अनुभवांमुळे त्यांच्यात एकप्रकारची परिपक्वला आलेली असते. पन्नाशीनंतरचे सेक्स लाईफ सुदृढ ठेवण्यासाठी काय कराल ? मुलं मोठी झालेली असतात व लग्नानंतर वेगळी झालेली असल्यामुळे जोडप्याला एकांत मिळण्याचा वेळ वाढलेला असतो. संपत्ती, नाव, व्यवसाय या गोष्टी प्रस्थापित झाल्यामुळे डोक्यावरील तणाव देखील कमी झालेला असतो. मात्र अशा वेळी लैंगिक शिथिलता येण्याची देखील शक्यता असते. मात्र तज्ज्ञ डॉक्टर सेक्सॉलॉजिस्टना दाखवून सेक्स लाईफ पूर्ववत करता येते. पहिल्यापेक्षा व्यायाम चांगला होत असतो. जेवणाची गुणवत्ता वाढलेली असते. आवडी-निवडीला वाव मिळालेला असतो तसेच. तणावरहित असल्याने इच्छाही वाढलेली असते. या काळात साथीदार गरोदर राहण्याची किंवा इतर काळजी मिटलेली असते. मात्र साथीदाराला इतर काही उपचार लागत असतील जसे की हार्मोनल इम्बॅलन्स, पाळी गेल्याने खालच्या अंगात कोरडेपणा इ. बाबींसाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. पन्नाशीनंतर स्त्रियांच्याही अनेक जबाबदाऱ्या कमी झालेल्या असतात. मुलं मोठी आणि स्वावलंबी झालेली असतात. अशा वेळी त्या स्वतःसाठी वेळ देऊ शकतात. मातृत्व आणि पत्नीत्व या दोन्हींच्या जबाबदाऱ्या बऱ्यापैकी कमी झाल्याने स्वतःला वेळ देणे त्यांना शक्य असतं. वय जरी पन्नास असले, तरी मन चिरतरूण असेल, राहणीमान, स्टाईल, पर्सनॅलिटी आणि फिटनेस याकडे लक्ष दिल्यास आयुष्य चिरतरुण बनून जातं. पन्नाशीनंतर कोणत्याही प्रकारे स्त्री किंवा पुरुषांना कसल्याही प्रकारची कमजोरी असेल तर त्यांनी तज्ज्ञ सेक्सॉलॉजिस्टला भेटून ती समस्या त्वरित दूर करावी. अतिशय चांगल्या प्रकारची औषधे, क्रीम, ऑईल तसेच गरज पडल्यास ओ शॉट, पी शॉट यासारखे इंजेक्शन आणि अतिशय रामबाण असणारी ट्रीटमेंट उदा. पेनाईल इम्प्लांट या सर्व प्रकारच्या ट्रीटमेंट तज्ज्ञांकडून घेतल्यास पन्नाशीनंतरचे लैंगिक आयुष्य अतिशय सुखकर होते.**



**डॉ. विजय दहिफळे**
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248




# बापानेच केली मुलाची विक्री : आंतरराज्यीय मानवी तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** आर्णी तालुक्यातील कोपरा येथील इसमाने आपल्या मुलाची परराज्यात विक्री केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला. आर्णी पोलीसांनी अवघ्या १४ तासात बापाने विकलेल्या पिडीत बालकास सुखरूप ताब्यात घेवून आंतरराज्यीय मानवी तस्करी करणा-या टोळीचा पर्दाफाश करुन जेरबंद केले. श्रावण दादाराव देवकर, चंद्रभान लखडाजी देवकर, कैलास लक्ष्मण गायकवाड रा. गांधीनगर आर्णी, अरविंद राम्मया उस्केमवार वय ३५ वर्ष रा. भाग्य नगर आदिलाबाद, बोल्ली गंगाराजु गंगाराम वय ४५ वर्ष रा. मोहनरावपेठ ता कोर्डला जि. जगतीयाल अशी आरोपींची नावे आहे. पुष्पा श्रावण देवकर वय २७ वर्ष रा. कोपरा ता. आर्णी या महिलेने पोलीस अधिक्षक डॉ. पवन बन्सोड यांच्यातकडे तक्रार दिली. तीन वर्षाचे बाळास तिचे पतीने ईतर साथीदाराचे मदतीने परराज्यात विकी केले आहे असे तक्रारीत नमुद केले होते. पोलीस अधिक्षकांनी सदर माहीती आर्णी ठाणेदार केशव ठाकरे यांना देवून जलद गतीने तपासचके फिरवीण्याकरीता आदेशीत केले. त्यावरून फिर्यादी पुष्पा श्रावण देवकर वय २७ वर्ष रा. कोपरा ता. आर्णी जि. यवतमाळ हीला पोलीस स्टेशन ला बोलावून तिचे जबानी रिपोर्ट वरून अप क ०८/२०२४ कलम ३७०,३४ भा द वि. चा गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गून्हा हा अज्ञान बालाकाचे तस्करी संबधाने असल्याने पोलीस स्टेशन आर्णी येथे सदर गुन्हयाची पिडीत बालक व आरोपी शोध घेण्याकरीता दोन वेगवेगळया पथके तयार करून आरोपी व पिडीत बालकाचा युध्द पातळीवर शोध घेण्यात आला. गुन्हयातील आरोपी श्रावण देवकर, चंद्रभान देवकर यांना अटक केली. कु जय यास तेलंगणा राज्यात विकी केल्याची माहीती प्राप्त होताच पोलीस स्टेशन आर्णी येथील पथक तात्काळ तेलंगणा राज्यात रवाना करण्यात आले. सदर पथकाने १४ तासाचे आत सदर पिडीत जय याचा आदीलाबाद, कोर्डला जिल्हा जगतीयाल येथे शोध घेवून त्यास सुखरूप ताब्यात घेतले. तसेच गुन्हयातील आरोपी कैलास गायकवाड, अरविंद उस्केमवार, बोल्ली गंगाराम यांना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर गुन्हा हा आंतरराज्यीय मानवी तस्करी चा असल्याने सखोल तपास सुरू आहे. सदरची कारवाई ही पवन बन्सोड साहेब, पोलीस अधिक्षक, पियुष जगताप, अपर पोलीस अधिक्षक, चिलुमुला रजनींकात सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभगीय पोलीस अधिकारी दारव्हा यांचे मार्गदर्शनात केशव ठाकरे पोलीस निरीक्षक आर्णी, पो.उप.नि चंदन वानखडे, सफौ व्यंकटेश मच्छेवार, पोहवा गणेश राठोड, पोना मनोज चव्हाण, मपोना जया काळे, पोकॉ मिथून जाधव यांनी केली.



# किड्स लर्निंग स्कूल, भेंडी येथे मेडिटेशन (ध्यानधारणा) कॅम्पचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** श्री चिंतामणी शैक्षणिक संस्था संचलित किडस् लर्निंग स्कुल, श्री टी.एन. रौदळ जुनियर कॉलेज, सिद्धिविनायक सेमी स्कूल येथे शनिवार दिनांक ६ जानेवारी रोजी सहजयोग ध्यानधारणा संस् व स्कुल च्या वतीने शिबीर आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना मनःशांती, मनाची एकग्रता, स्मरणशक्ती वाढीसाठी साठी ध्यानधारणा कशी आवश्यक आहे याबाबत राहूल कानडे, दिपक चव्हाण व स्कुलच्या मनिषा वाघ महत्त्व विशद केले. ध्यानधारणेतून मन प्रसन्न राहते, चांगले विचार, चांगले आचार, आपली संस्कृती, आपले कुटुंब, कुटंबातील सदस्य, शिक्षक, मित्र मैत्रिणी व ज्या क्षेत्राशी आपण संबंधित आहोत त्या प्रती असलेली भावना या सगळया गोष्टींबाबत सकारात्मक विचार करण्याची शक्ती ध्यानधारणेतून प्राप्त होत असते. याप्रसंगी मुख्याध्यापिका सुचिता रौंदळ, विभाग प्रमुख मनिषा वाघ, कांचन पगार, रिना पाटील, दर्शना पाटील, कविता पवार ,श्वेता शिंदे, सुरेखा ठाकरे, संगीता नावरकर, धनश्री वाणी , तेजस्विनी पगार, कविता आहेर , विद्या पाटील, रोहिणी हिरे, सुवर्णा काकुस्ते, भावना पाटील, भाग्यश्री येशी , रुपाली जाधव, बांगर मॅंडम, कांचन देवघरे, वैशाली चाटे, जयश्री आहेर, वैशाली मोरे, माधुरी रौंदळ , सोनाली पाटील, इत्यादी शिक्षक सहभागी होते.

कार्यक्रमाचे यशस्वीपणे सुत्रसंचलन दर्शना पाटील व मनिषा वाघ यांनी आभार यांनी मानले.

# लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424




आधुनिक केसरी

आपण अलीकडे नेहमीच वेगवेगळी सुप आवडीने पितो. कधी फिटनेस साठी तर कधी हेल्दी बनण्यासाठी. थंडीच्या मस्त गुलाबी सिझन मध्ये हिरवेगार हेल्दी गरम गरम पालक सुप मिळाले आणि तेसुद्धा क्रिमी, तर...

प्रत्येकवेळी बाहेरून किंवा हॉटेलमध्ये जाऊन सुप पिणे शक्य नसते. म्हणून अगदी तस्सेच आणि त्यापेक्षा हेल्दी सुप आपण घरीच बनवू शकतो. पहायचे मग..

**साहित्य :** 1 पालकाची जुडी, 2 लसूण पाकळ्या, 2 चमचे फ्रेश क्रीम, 1 चमचा बटर ,1 चमचा कणिक , चिमूटभर हिंग, अर्धा चमचा मिरपुड, अर्धा कप दूध , अर्धा चमचा साखर, चवीनुसार सैंधव. **कृती :** प्रथम पालक निवडून स्वच्छ धुवून घ्यावा . गॅस वर पालक पूर्ण बुडेल एवढे पाणी उकळायला ठेवावे . पाणी पूर्ण उकळल्यावर मगच पालक त्यात घालून 1 ते दीड मिनिट झाकण न ठेवता उकळून घ्यावा व लगेंच चाळणीतुन् काढून एकदम थंड पाण्यात ठेवावा. म्हणजेच ब्लान्च् करून घ्यावा. जास्त वेळ उकळला तर तो काळपट होतो. तसेंच जास्त वेळ गरम पाण्यात तसाच राहीला तरी जास्त उष्णतेने त्याचा रंग बदलतो. लगेंच अगदी फ्रीझच्या थंड पाण्यात ठेवला म्हणजे पालेभाज्यांचा रंग हिरवगार मस्त राहतो. म्हणून कोणतीही पालेभाजी करताना जर हिरवागार रंग तसाच ठेवायचा असेल तर ही पद्धत वापरावी. आता गॅस वर कढईत बटर घालून त्यात कणिक घालावी .हॉटेल्स मध्ये शक्यतो मैदाच वापरला जातो .घरी बनवल्यामुळे आपण कणिक वापरून जास्त हेल्दी बनवू शकतो .कणिक छान गुलाबी झाली की त्यात लसूण किंचित ठेचून स्वादासाठी घालावा .हिंग पावडर घालून सावकाश पाणी घालत घालत सतत ढवळावे म्हणजे गुठळ्या होणार नाहीत .आपल्याला जेवढे सुप बनवायचे असेल त्यानुसार पाणी घालावे. मग दूध घालून व्यवस्थित उकळी आली की त्यात मिक्सर मधून पालकाची प्युरी बनवून घालावी. मग मिरपूड ,साखर घालून सैंधव घालावे. सतत हे सूप ढवळत रहावे. शेवटी फ्रेश क्रीम घालावे व अजून रिचनेस साठी आवडत असेल तर थोडेसे बटर घालावे. आता आपले हे तयार सूप सर्व्हिंग बाऊलमध्ये काढून वरून सजावटी साठी फ्रेश क्रीम घालून गरम गरम सर्व्ह करावे .

**वैशिष्टय :** मिरपूड ,हिंग यामुळे स्वाद तर छान येतोच पण चव सुद्धा छान येऊन पोटासाठी उत्तम बनते . कणिक व सैंधव वापरल्यामुळे तब्येतीसाठी जास्त हेल्दी होते .बटर ,दूध व क्रीम मुळे क्रिमी होऊन जास्त टेस्टी बनते .आणि पालकाचा हिरवागार रंग सुरेख दिसतोच पण त्यावर शुभ्र

क्रीम मुळे पाहून खाण्याचा मोह आवरणे शक़्यच नाही . पालक तब्येतीसाअसल्यामुळे युक्त असल्यामुळे एकदम माईल्ड व टेस्टी असे हे सूप कधीही उत्तम व पौष्टिक आहे .

# तरुणांनी आता विचारांची दिशा बदलावी



शाम हेडाऊ
संपर्क क्र.9834301568

आधुनिक केसरी

**देश आता एका वेगळ्या दिशेने प्रगतीच्या पथावर जाताना आपण पाहत आहोत. संपूर्ण जगात आता मोठ्या प्रमाणात वेगवेगळे बदल आपल्याला पाहायला दिसत आहेत. जगातल्या लोकांच्या गरजा बदलल्यात, आवडीनिवडी बदलल्यात, वैचारिक पद्धती बदलली , जगण्याच्या पद्धती बदलल्या आणि सगळे जग आता एक छोटसं गाव, छोटं खेडं म्हणून आपल्या एका क्लिकवर आलेल आहे. या जगानी हरितक्रांती बघितली, श्वेतक्रांती बघितली, पिवळी क्रांती बघितली, निळी क्रांती बघितली, औद्योगिक क्रांती ही बघितली आणि आता हा देश सायबर क्रांतिही बघतो आहे . एकूणच या देशानेच नव्हे तर संपूर्ण विश्वाने आता एका वेगळ्या वाटेवरचा प्रवास सुरू केलेला आहे . जागतिक**

पातळीवर आता मोठी स्पर्धा निर्माण झालेली आपण पाहतो आहोत . हीच स्पर्धा आता देशामध्ये सुद्धा आपल्याला पाहायला मिळते आहे . कालपरत्वे होणारे बदल स्वीकारणे आणि हे बदल स्वीकारून बदलत्या काळाची पावले ओळखत आपण त्या दिशेने वाटचाल करणे हे यशस्वीतेचे मानक बिंदू मानले जातात . जगात कोणत्या वस्तूंची मागणी आहे ? जगाच्या मागणीत काय बदल होत चालला आहे ? आणि होणारे बदल हे कुठून कुठून पुरवठा केले जात आहेत ? या पुरवठ्याच्या साखळी अर्थात तुमच्या भाषेत सांगायचं तर या सप्लाय चेन मध्ये आपण काय सप्लाय करू शकतो ? याचा विचार करणे आता गरजेचे झाले आहे , आवश्यक झाले आहे .

सध्या तरी आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात तरुणाईचे लक्ष हे शिक्षणानंतर नोकरी मिळावी आणि एकदा का त्या नोकरीला आपण स्थिरावलो की मग पुढचे 55 , 58 , 60 वर्ष आपण निश्चिंत होऊन जगू शकतो ही संकल्पना आणि विचार आता बदलण्याची नितांत गरज आहे . सरकारी नोकऱ्या सतत निघत जातील आणि , त्यात आपल्याला नोकरी मिळतच जाईल हा विचार आता तरुणाईला डोक्यातून काढून टाकावा लागणार आहे . कारण , ज्या गतीने आपली लोकसंख्या वाढते आहे त्या गतीचा विचार केला तर प्रत्येकाला नोकरी देणे हे कोणत्याही सरकारच्या आवाक्यात नाही . कोणतेही सरकार येवो ते पूर्ण रोजगाराची अवस्था या देशात कधीही निर्माण करू शकणार नाही . हे एक अटळ सत्य आहे . आणि हे सत्य आपण स्वीकारायलाच हवं असं मला वाटतं मित्रांनो . सरकार मला नोकरी देईल आणि मी माझ आयुष्य पुढे सुखात जगेन हा विचार आपण करण्यापेक्षा आता जगाची पावलं ज्या दिशेने जात आहेत त्या दिशेचा विचार करून मी नोकरीच्या मागे न धावता मी स्वतःचा एखादा छोटा उद्योग , मोठा उद्योग , मध्यम उद्योग सुरू करू शकतो का ? आणि मी स्वतः कोणाच्याही हाताखाली नोकरी न करता मी स्वतः मालक म्हणून अनेकांना नवीन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो का ? हा विचार करणे आता आपल्या काळाची गरज आहे . या दृष्टीने ज्या दिवशी तुम्ही विचार करायला सुरुवात कराल त्या दिवशीपासून तुम्हाला एक नव्हे तर शेकडो संधी तुम्हाला उपलब्ध होतील . कारण जन्माला येण्याच्या आधीपासून एक ग्राहक बाजारपेठेला मिळतो आहे तर , त्याच्या मृत्यू पश्चात सुद्धा पुढच्या एक वर्षापर्यंत एक ग्राहक आपल्याकडे अर्थात बाजारपेठेला कायमस्वरूपी टिकलेला आहे . आज आपल्या देशाची लोकसंख्या जवळपास 135 करोड झालेली आहे . आणि येणाऱ्या पुढच्या पंचवीस तीस वर्षाच्या काळात आपली लोकसंख्या कमी होईल याची तीळ मात्र शक्यता नाही . म्हणून या 135 करोड लोकसंख्येला त्यांची जी गरज आहे , त्यांची जी आवड आहे ती गरज आणि आवड आपण पूर्ण करू शकतो का ? किंवा त्यांच्या गरजांमध्ये त्यांच्या आवडीनिवडी मध्ये आपण काही नवीन गोष्टींची भर टाकून त्या गोष्टी त्यांना उपलब्ध करून देऊ शकतो का ? याचा विचार एक उद्योजक म्हणून आजच्या तरुणाईने करायला हवा . होय... मित्रांनो, तुम्हाला उद्योजकतेच्या क्षेत्रात आज लाखो संधी तुमची वाट पाहत आहेत . आणि म्हणून आज एक छोटेखाणी का होईना व्यवसायाला मी सुरुवात करेन आणि त्यातून मी स्वतःची एक चांगला मोठा उद्योजक म्हणून प्रतिमा निर्माण करू शकेल हे स्वप्न पाहणं , या दिशेने विचार करणं आणि त्या दिशेने पावलं टाकणं ही आता काळाची गरज आहे मित्रांनो . अगदी लहानसहान उद्योगापासून सुरू झालेले उद्योग आज मोठ्या प्रमाणावर पोहोचलेले आहेत . आणि त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली एक वेगळी छाप निर्माण केलेली आहे . लिज्जत पापड , वनिता आहार असे कित्येक उद्योजकांचे उदाहरण तुम्हाला देता येतील . याच उदाहरणांमध्ये भविष्यात तुमचं नाव येऊ शकतं . आणि त्या दिशेने तुम्ही प्रयत्न करायला हवेत असं मी इथे अधोरेखित करू इच्छितो.

गेल्या 25 वर्षांमध्ये मी स्वतः उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास या विषयावर महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र अर्थात एम सी इ डी ,



मिटकॉन , जिल्हा उद्योग केंद्र , सूक्ष्म लघु एवम मध्यम उद्योग मंत्रालय अर्थात एम एस एम इ यांच्या माध्यमातून शेकडो व्याख्यान मी दिलेली आहेत . आणि जेव्हा मी हे व्याख्यान देऊन बाहेर पडतो किंवा हे व्याख्यान दिल्यानंतर कधीतरी एखाद्या तरुणाचा , तरुणीचा फोन येतो की सर तुमच्या मार्गदर्शनातून आम्हाला खूप नवीन माहिती मिळाली , तुमच्या व्याख्यानातून आम्हाला एक नवीन प्रेरणा मिळाली , आमच्या विचारांची दिशा बदलली आणि आम्ही आता स्वतःचा उद्योग सुरू केलेला आहे . असे अनेक तरुण- तरूणी आहेत की ज्यांनी स्वतःचा उद्योग तयार करून एक मोठं विश्व आज तयार केलेल आहे . तेव्हा या मार्गदर्शनाची गरजही लक्षात येते . मित्रांनो आज सरकार सुद्धा स्टार्टअप योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात कर्ज देण्याचं काम करते आहे . छोट्या उद्योगासाठी , मध्यम उद्योगांसाठी आणि मोठ्या उद्योगांसाठी सुद्धा तुमची जी गरज आहे , तुमची जी मागणी असेल त्या मागणीच्या अनुषंगाने आता सरकार कर्जाचा पुरवठा करते आहे . शिवाय या कर्जाच्या योजनाही आता सुलभ केलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर एम सी इ डी , मिटकॉन , जिल्हा उद्योग केंद्र , एम एस एम इ , उमेद यांच्या माध्यमातून उद्योगाच्या नवनवीन संधी , उद्योगाच्या क्षेत्रातील नवनवीन वाटा , उद्योगाचे बदलत स्वरूप , बदलत्या इंडस्ट्रीज , त्यासाठी लागणाऱ्या मशिनरीज , आणि भांडवल उभारणी , उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास , अकाउंटिंग , बँकिंग अशा विविध विषयांवर मार्गदर्शन सुद्धा देत आहे . आणि बऱ्याच ठिकाणी , बऱ्याच वेळा हे मार्गदर्शन अनेक ठिकाणी मोफत उपलब्ध आहेत . काही ठिकाणी निवासी आणि मोफत अशाही पद्धतीत आज ट्रेनिंग दिल्या जात आहे . उद्योजकतेचे ट्रेनिंग दिल्या जात आहे. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान अर्थात उमेद यांच्या माध्यमातून तर ग्रामीण भागातील महिलांसाठी , मुलींसाठी त्या स्वतःच्या पायावर उभ्या रहाव्या , त्यांनी आत्मनिर्भर व्हावं या दृष्टिकोनातून आज मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण दिल्या जात आहे . एकूणच आजचे वातावरण आपण पाहतो आहे हे वातावरण उद्योजकतेच्या दिशेने जाणाऱ्या तरुणाईला अतिशय पोषक असं वातावरण आहे . या वातावरणाचा फायदा घेत आपण स्वतः आपल्या विचारांची दिशा बदलून उद्योजकतेकडे वळल्यास येणारा काळ हा तुमच्यासाठी निश्चितच यशदायी ठरेल यात शंका नाही .

त्यामुळे मला असं वाटतं की आता तरुणाईने नोकरीच्या मागे न धावता आणि या नोकरी मिळविण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या मोठ्या रकमेसाठी टेन्शन न घेता जी रक्कम नोकरी मिळविण्यासाठी देण्याची तयारी आपण ठेवतो त्याच रकमेत सरकारच्या उद्योग व्यवसायासाठी असणाऱ्या कर्जाची भर घेऊन , सोबत घेऊन आपण स्वतःचा एक लहान मोठा उद्योग सुरू करावा . आणि आपण स्वतःच्या मनाचे राजे होऊन उद्योग विश्वात स्वतःच एक मोठं नाव कमवावं , आपली एक वेगळी ओळख निर्माण करावी जी या राष्ट्राच्या निर्मितीमध्ये सुद्धा मोलाचे योगदान देणारी ठरू शकेल. या दिशेने आजच्या तरुणाईने विचार करावा, त्यावर मंथन करावे . त्या दिशेने आपण वाटचाल करावी. आपल्या मित्र-मैत्रिणींच्या ग्रुप मध्ये यावर चर्चा करावी . आणि , ज्याला ज्या क्षेत्रात आवड आहे त्यांना सोबत घेऊन भागीदारीच्या पद्धतीने सुद्धा स्वतःचा उद्योग सुरू करावा यावरही चिंतन व्हावं , चर्चा व्हावी आणि तुमच्या विचारांची दिशा बदलून तुम्ही उद्योग व्यवसायाच्या क्षेत्रात उंच भरारी घ्यावी म्हणून आजचा हा लेखन प्रपंच.

# जगण्याला भिडणाऱ्या स्त्रियांची गाथा : खोडा



उमेश मोहिते
संपर्क ७६६६१८६९२८


आधुनिक केसरी

**उमेश मोहिते हे कथाकार,समीक्षक म्हणून सुपरिचित असून त्यांचा ' खोडा ' हा पाचवा कथासंग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे.या कथा संग्रहात एकूण ११ कथा असून या सर्वच कथा ग्रामीण भागातील नातेसंबंध आणि त्या नातेसंबंधात वेगवेगळ्या प्रसंगी निर्माण होणारे ताण,पेचप्रसंग जिवंतपणे चित्रित करणाऱ्या आहेत.' खोडा घालणे ' म्हणजे अडथळा निर्माण करणे होय आणि रोजचे जगणं जगत असताना पतीच्या निधनानंतर स्त्रीला कशा प्रकारे वेगवेगळ्या माध्यमातून खोडा घातला जातो, हे ' खोडा ' कथेतून लेखकाने दाखवून दिले आहे. बदलता निसर्ग, अस्मानी-सुलतानी संकटांना कंटाळून मेटाकुटीला आलेला शेतकरी आत्महत्या करतो, परंतु त्याच्या पाठीमागे रहाणारी त्याची पत्नी आणि मुलांचे हाल काही केल्या संपत नाहीत.**

पती निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी त्याच्या पत्नीवरच पडते.त्या स्त्रीला घरच्यांच्या पोटापाण्याची सोय करून शेताचीही व्यवस्था करावी लागते.' खोडा ' कथेतील पारबतीच्या जगण्याची परवड होते.ती मुलाला बी भरणासाठी पैसे मागण्यासाठी जाते तेव्हा ॲटो चालवणारा वसंता पैसे देत नाही,तर स्वतःच पैशाची अडचण सांगतो.मुलगा पैसे देत नाही,पण भाऊ तरी मदतीला येईल म्हणून ती भावाकडे जाते,पण भाऊ तिच्या मुलीलाच मदतीच्या बदल्यात मागणी घालतो. आखरीला ती सावकाराकडे पैसे मागावेत म्हणून जाते ; तर रंगनाथ सावकार निर्दयी वृत्तीने शेती नाहीतर दागिना गहाण ठेवायला सांगतो.अशा पध्दतीने जो तो संकटाशी तोंड देणाऱ्या पारबतीला साथ देण्याऐवजी खोडा घालण्याचे काम करतो. थोडक्यात शेतकरी आत्महत्येनंतर त्या कुटुंबाची झालेली दशा ' खोडा ' कथेतून उमटली आहे. असाच आशय असणारी ' धडक ' नावाची कथा आहे.ज्या कथेत गजरा ही विधवा असते आणि सुरेखा नावाची तिची लग्नाला आलेली मुलगी आहे.आपली मुलगी चांगल्या ठिकाणी द्यावी ही प्रत्येक माय-बापाची इच्छा असते.सुरेखाचा मामा आपल्या मुलासाठी सुरेखाची मागणी गजराकडे करतो,पण नोकरी नसल्यामुळे गजरा भावाच्या घरी मुलगी द्यायचं नाही म्हणते.त्यामुळे भावाला आपली बहीण दूर लोटते आहे असे वाटते.मात्र रंगातात्या नोकरीवाले स्थळ घेऊन येतात,पण त्यासाठी हुंडा देण्यासाठी पैसा आवश्यक असतो. गजराचा मुलगा भावड्या काही लक्ष देत नाही ; तर भांडण करून अडथळा आणतो. हा सगळा संघर्ष ' धडक ' कथेत रेखाटला आहे.एखाद्याने आपलं म्हणून मदत करावी आणि पैसे घेणाऱ्याने वेळेवर पैसे परत नाही केले तर मधल्या माणसाची कशी दमकोंडी होते,हे ' दमकोंडी ' या कथेत रंगवले आहे.दोन एकर जमीन असलेला राजाराम अपघातात अधू झालेला आहे. तो विधवा बहिणीला तिच्या पोरीच्या लग्नासाठी सुभानराव सावकाराकडून पैसे व्याजाने घेऊन देतो. मात्र बहीण वेळेवर पैसे परत देऊ शकत नाही तेव्हा राजाराम टेन्शनमध्ये दारू पिऊन सावकाराला शिव्या देतो.सावकार मग संतापून पैशाच्या बदल्यात त्याची म्हैस सोडून आणतो आणि राजारामचा रोजगार बुडतो.ही कथा खासगी सावकारीचे भयावह स्वरूप दाखवते.' निर्णय ' या कथेत शहरी चंगळवादी संस्कृतीची लागण गावखेड्यालाही कशी झाली आहे,हे दाखवले आहे.आज संपर्काची साधने वाढल्यामुळे सर्रासपणे शाळा,कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुला-मुलींच्या हातात मोबाईल आहे.त्या मोबाईलचा वापर मुलांनी गरजेपुरता आणि मर्यादितच केला पाहिजे ; नाहीतर मुलं भरकटून जाऊ शकतात,हे ' निर्णय ' या कथेतील मोहनच्या एकतर्फी प्रेमातून दिसून येते.तो एका मुलीच्या मागे लागतो,परंतु ती मुलगी मात्र आपले चुकीचे पाऊल पडले तर त्याचा आपल्या शिक्षणावर परिणाम होईल नि मग आपले शिक्षण अर्धवट राहू शकते,असा विचार करते आणि त्याला साद देत नाही,असा आशय असलेली ही कथा आजच्या तरुण मुला-मुलींनी अवश्य वाचली पाहिजे. सिनेमातले आयुष्य आणि प्रत्यक्षातले आयुष्य यामध्ये नक्कीच जमीन-अस्मानाचा फरक असतो ; त्यामुळे कोणताही निर्णय घेत असताना तो भावनेच्या भरात न घेता,खूप विचारपूर्वकतेने घेतला पाहिजे,हे ' निर्णय ' या कथेमधून लेखकाने सूचवले आहे.छोट्या मोठ्या नोकरीला असणाऱ्या नोकरदार वर्गाच्या जीवन जगतानाचा संघर्ष ' झुंज ' या कथेतून प्रत्ययकारकतेने कथाकार मांडला आहे.प्रत्येक माणसाला नोकरदार खूप मजेत आयुष्यात जगत असतो,असे वाटत असते. त्यामुळे त्याच्याकडून मदतीची मोठी अपेक्षा असते. परंतु नोकरदाराच्या समस्या फक्त त्यालाच माहीत असतात आणि तो कशा प्रकारे झुंज देत राहतो, हे ' झुंज ' कथेतून दर्शवले आहे ; तर ' होरपळ ' या कथेत कोरोनामुळे कशी अनेक कुटुंबाची त्या जीवघेण्या काळात होरपळ झाली,हे नोंदवले असून कोरोनाच्या त्या काळात एका विधवेची भयावह परिस्थितीमुळे झालेली फरफट नि उपासमारी जिवंतपणे ' होरपळ ' कथेत आली आहे.दोन मुलींचे ऑन लाईन शिक्षण,तिचा बंद रोजगार आणि कुटुंबासाठी करावी लागणारी तिची धडपड,ह्या साऱ्या गोष्टी या कथेत आलेल्या आहेत,तर अगदी लहान सहान गोष्टीत भाव-भावकी एकमेकांकडून मानपान मिळवण्याची अपेक्षा ठेवते आणि त्यातूनच उभ्या राहिलेल्या संघर्षाची कहाणी ' इस्कोट ' कथेत शब्दांकित झाली आहे.

.. एकंदरीतच मराठवाडी बोलीचा लहेजा असलेली ही ग्रामीण बोलीतील कथा मनाचा ठाव घेऊन विचार प्रवृत्त करते आणि मनात रेंगाळणारी आहे.या कथांतून ' उचलीली जीभ आन् लावली टाळ्याला ' , ' सत ना गत ' अशा ग्रामीण म्हणीही नेटकेपणे आल्या आहेत.एकूणात उमेश मोहिते यांच्या ' खोडा ' या संग्रहातील कथांमधून प्रतिकूल स्थितीत किंचितही न डगमगता खंबीरपणे उभे राहून स्वतःचे घर-कुटुंब सांभाळणाऱ्या आणि स्वतःच्या अंगभूत हुशारीने योग्य निर्णय घेणाऱ्या धाडसी नि खंबीर स्त्रियांचे प्रेरणादायी दर्शन होते आणि त्यामुळे या धीरोदात्त स्त्रियांकडून इतर स्त्रियांना संघर्षरत राहण्याची प्रेरणा मिळेल,हे नक्की ! म्हणूनच म्हणावेसे वाटते की,' खोडा ' मधील प्रत्येक कथा म्हणजे जणू काही खंबीरपणे स्वतःच्या हिंमतीवर घर-कुटुंब चालवणाऱ्या स्त्रियांची प्रेरणादायी गाथाच आहे ...

**कथासंग्रह - खोडा**
**लेखक - उमेश मोहिते**
**प्रकाशक - तेजश्री प्रकाशन ,कोल्हापूर**
**( मो.७६६६१८६९२८ )**
**पृष्ठे - १३३**
**मूल्य - २०० रु.**
**मुखपृष्ठ - सरदार जाधव**
**परीक्षण :श्री.शरद ठाकर,**
**सेलू ता.सेलू जि. परभणी**
**( मो.८२७५३३६६७५ )**



# श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराची शासकीय समिती बरखास्त करा

## अन्यथा रस्त्यावर उतरू : वारकरी आणि हिंदुत्वनिष्ठ संघटनांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** कोट्यवधी विठ्ठलभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात केवळ मौल्यवान जडजवाहिरात, सोन्याचे दागिने, प्रसादाचे लाडू, शौचालय यांत गैरव्यवहार झाले; इतकेच नाही, तर देशातील अनेक मोठी मंदिरे फायद्यात असतांना मंदिर समितीच्या आर्थिक बेशिस्तीमुळे मंदिराला वर्ष 2021-22 या आर्थिक वर्षात 6 कोटी 5 लाख 82 हजार रुपयांचा तोटा झाला आहे. सुयोग्य आर्थिक व्यवस्थापन करता येत नसल्याKENमुळे 3 कोटी 77 लाख 21 हजार 565 रुपयांचा वस्तू सेवा कर (जी.एस्.टी.) मंदिराला नाहक भरावा लागला आहे. बँकांकडे शिल्लक असलेला 69 लाख 14 हजार 913 रुपयांच्या टी.डी.एस्.चा निधी मंदिर समितीला परत मिळवता आला नाही. तसेच निविदा न काढता 'बी.व्ही.जी.' कंपनीला कंत्राट देऊन लाखो रुपयांची उधळपट्टी करणे, मंदिराकडे सुमारे 1250 हून एकरहून अधिक जमीन असतांना त्याचा वर्षाला केवळ 5 लाख 26 हजार रुपयांचा खंड मिळणे, हा घोटाळा नव्हे तर काय आहे? असे अनेक अक्षम्य गैरव्यवहार करणाऱ्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर



समिती तात्काळ बरखास्त करावी आणि गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी समस्त वारकरी आणि 'महाराष्ट्र मंदिर महासंघ' यांनी केली. जर असे झाले नाही, तर आम्ही रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू, असा इशाराही यावेळी सरकारला देण्यात आला.

पंढरपूर येथे झालेल्या या पत्रकार परिषदेत 'महाराष्ट्र मंदिर महासंघा'चे राज्य समन्वयक तथा 'हिंदु जनजागृती समिती'चे महाराष्ट्र संघटक श्री. सुनील घनवट, वारकरी संप्रदाय पाईक संघाचे

**3 कोटी 77 लाख रुपये पाण्यात ? :** इनपुट टॅक्स क्रेडिट कर (आय.सी.टी. क्रेडिट) हा व्यवसाय खरेदीवर भरला जातो; मात्र साहित्य विक्री झाल्यावर तो जी.एस्.टी.मधून कमी करून घेता येतो; मात्र त्याचा उपयोग न केल्यामुळे जी.एस्.टी. पोर्टलवर मंदिराचे वर्ष 2017-18 ते 2022-23 पर्यंत सुमारे 3 कोटी 77 लाख 21 हजार 565 रुपयांचे आय.सी.टी. क्रेडिट उपलब्ध आहे; मात्र मंदिर समितीने तज्ञांकडून लेखी मत न घेता तेवढ्या रुपयांचा जी.एस्.टी. शासनाकडे भरलेला आहे. तो निधी सेट ऑफ करता आला असता. एकूणच 'आंधळ दळतंय कुत्रं पीठ खातंय!' असा कारभार चालू आहे. अशा प्रकारे अन्य प्रकरणांत किती रुपयांचे नुकसान झाले असेल, याचा अंदाज येतो.

राष्ट्रीय प्रवक्ते ह.भ.प. रामकृष्ण वीर महाराज, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर संरक्षण कृती समितीचे अध्यक्ष श्री. गणेश लंके, ह.भ.प. नागेश बागडे महाराज, हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होती.

या वेळी घनवट म्हणाले की, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात 314 हून अधिक प्राचीन मौल्यवान दागिन्यांच्या ताळेबंदात नोंदी अन् मूल्यांकन नसल्या प्रकरणी मंदिर समितीने जो खुलासा केला आहे. त्यावरून त्यांनी एकप्रकारे सर्व घोटाळ्याची स्वीकृतीच दिली आहे, असेच म्हणावे लागेल. दागिने गहाळ झालेले नाहीत म्हणणाऱ्या मंदिर समितीने मग ते दागिने लेखापरीक्षकांना तपासणीसाठी का उपलब्ध करून दिले नाहीत? त्या काय गौडबंगाल आहे? थातूरमातूर खुलासा करणाऱ्या मंदिर समितीने निकृष्ट प्रसाद, आगाऊ रकमा, गोशाळेची दुरवस्था, शौचालयात 22 लाखांचे नुकसान आदी अनेक गंभीर आरोपांविषयी काहीच खुलासा केला नाही. यातच खरे काय ते समोर आले आहे. खरेतर मंदिराचे सरकारीकरण होऊन 38 वर्षे झाल्यावरही प्राचीन मौल्यवान दागिन्यांचे मुल्यांकन अन् नोंद झालेली नसेल, तर श्री तुळजापूर मंदिराप्रमाणे प्राचीन दागिन्यांची अदलाबदली होऊ शकते. खोटे कागदपत्रे वा दस्तावेज तयार केले जाऊ शकतात. त्यामुळे या अक्षम्य प्रकाराच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यासाठी आम्ही पंढरपूर पोलीस ठाणे आणि सोलापूर जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. वर्ष 2013 मध्ये आम्ही पत्रकार परिषद घेऊन श्री विठ्ठल मंदिरातील घोटाळ्याचे अनेक मुद्दे मांडले होते. आज 10 वर्षांनंतरही बहुतांश घोटाळे मंदिरात परत परत होत आहेत, हे अतिशय गंभीर आहे. पुणे येथील 'बी.एस्.जी. ॲन्ड असोसिएट्स' या सनदी लेखापरीक्षक संस्थेने मंदिराचे लेखापरीक्षण करून 23 मार्च 2023 या दिवशी अहवाल सादर केला आहे. यात मंदिर समितीच्या 27 प्रकारचे अत्यंत गंभीर गैरकारभार समोर आले आहेत.

वर्ष 2021-22 चे अंदाजपत्रकात मंदिर समितीने 6 कोटी 24 लाख 71 हजार रुपये जमा, तर 12 कोटी 30 लाख 53 हजार रुपये खर्च दाखवले आहे. म्हणजे 6 कोटी 5 लाख 82 हजार रुपयांचा तोटा झाला आहे. कोट्यवधी भक्त आणि मोठ्या प्रमाणावर अर्पण मिळणारे महाराष्ट्रातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर तोट्यात कसे काय असू शकते? आज देशभरात मोठी मंदिरे नफ्यात असतांना श्री विठ्ठल मंदिर कोणामुळे तोट्यात गेले?

**भूमी घोटाळा ?:** मंदिराच्या नावाने 1,250 हून अधिक एकर भूमी असतांना मंदिर समितीकडे वर्षाला केवळ 5 लाख 26 हजार रुपयांचा जमीन खंड जमा झाल्याचे दाखवले आहे. यात लेखापरीक्षकांनी 'हा खंड चुकीच्या पद्धतीने दाखवल्याचे अहवालात म्हटले आहे.' प्रत्यक्षात एवढी प्रचंड भूमी असतांना इतका अत्यल्प खंड कसा काय? 'डाल में कुछ काला है!' नव्हे, तर 'पूरी डाल ही काली है' असेच म्हणावे लागेल.

# लोह्यात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त ६ जानेवारी रोजी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार दिन साजरा करण्यात आला.

शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात प्रारंभी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे जिल्हा निवड समिती अध्यक्ष मोहन पाटील पवार, जिल्हा उपाध्यक्ष सुनील पाटील चव्हाण, जिल्हा कार्यकारणी सदस्य गणपत जामगे, प्रदीप कांबळे, तालुका निवड समिती अध्यक्ष गजानन दांगटे, व्यंकटेश वाघमारे, विशाल घंटे, सुनील पाटील पवार, संग्राम पाटील चव्हाण, अंबादास पवार, संतोष तोंडारे, विलास सावळे आदींची उपस्थिती होती.





# फुलंब्री, खामगाव येथे नमो चषक नोंदणी

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खामगाव येथे शुक्रवार (दि.५) रोजी 'नमो चषक' नोंदणी करण्यात आली. यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. आ. हरिभाऊ बागडे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सजन बागल यांच्या नेतृत्वात फुलंब्री येथे संत सावता माळी विद्यालयात आणि खामगाव येथे श्री. गोरक्षनाथ शिक्षण संस्थेत ही नोंदणी करण्यात आली.

यावेळी फुलंब्री तालुकाध्यक्ष सांडु जाधव, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष इलियाज शाहा, जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब तांदळे, जिल्हा सरचिटणीस ऋषी नरवडे, जिल्हा उपाध्यक्ष विश्वास जगदाळे, जिल्हा चिटणीस अभिलाष सोनवणे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष गणेश तांबे, मंगेश जाधव, गणेश जाधव, आवीश जाधव, अजय नागरे, नवनाथ वखरे यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

# शालेय समितीच्या अध्यक्षपदी डॉ. वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**वडोदबाजार :** येथील सरस्वती भुवन विद्यालयाच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी डॉ. गोपाळ राधाकिसन वाघ यांची गुरुवारी निवड करण्यात आली. ते सद्या वडोदबाजारचे उपसरपंच म्हणून कार्यरत आहे. नुकतीच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून क्रीडा विषयात पीएचडी प्राप्त केली आहे. शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील यांनी त्यांची नियुक्ती केली. माजी सरपंच शेख रजाक भाई सरपंच पती साबेर पठाण, शेलेश पाटणी, अनिल वाघ, अरुण वायकोस, शेख सद्दाम, अशोक शिनगारे, पांडुरंग ब्राह्मणे, रामदास कापसे, काळू म्हस्के, ताजमत शहा आदीसह नागरिक यावेळी उपस्थित होते.



# हजारो ग्रामरोजगार सेवक नाशिक ते मुंबई पदयात्रेत सहभागी होणार : समाधान नवले

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र ग्रामरोजगार सेवक संघाच्या वतीने येत्या १५ जानेवारी पासून नाशिक ते मुंबई लाँग मार्च (पदयात्रा) काढण्यात येणार आहे. राज्यभरातून हजारो ग्रामरोजगार सेवक बांधव या पदयात्रेत सहभागी होणार असल्याची माहिती रोजगार सेवक संघाचे राज्य प्रसिद्धी प्रमुख श्री.समाधान पाटील नवले यांनी दिली.

ग्रामीण भागातील मजुरांसाठी संजिवनी ठरलेल्या रोजगार हमी योजनेचा कणा असलेला रोजगार सेवक मात्र आपल्या अस्तित्वाची लढाई लढताना दिसतो आहे. दररोज हजारो मजूरांना काम उपलब्ध करून देऊन,त्यांची हजेरी घेणे,त्यांचे पेमेंट ऑनलाईन करुन मजुरी मिळवून देण्यापर्यंत काम करणाऱ्या ग्रामरोजगार सेवकांना सरकारने वाऱ्यावर सोडल्याचे चित्र आहे. म्हणून येणाऱ्या १५ जानेवारी रोजी नाशिक च्या निलगिरी बाग येथुन हजारोंच्या संख्येने ग्रामरोजगार सेवक. हे मुंबईच्या दिशेने निघतील, मुंबईत पोचल्यावर हे आंदोलक मा.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी धडक देऊन न्याय मागतील असे नियोजन करण्यात आले आहे.

**काय आहेत मागण्या ?**
१) ग्रामरोजगार सेवकांना दरमहा फिक्स मानधन देण्यात यावे.
२) मिळणारे मानधन हे त्यांच्या स्वत:च्या खात्यात मिळावे.
३) ग्रामरोजगार सेवकांना विमा संरक्षण मिळावे.
मागील वर्षानुवर्षे आम्ही राज्यातील २८ हजार ग्रामरोजगार सेवकांच्या विविध प्रश्नांवर शासनाशी भांडतोय, मात्र दुर्दैवाने आजपर्यंत आमच्या कोणत्याही मागण्याविषयी सरकारने सहानुभूती ने विचार केला नाही. म्हणुन आम्ही येत्या १५ जानेवारी पासून नाशिक ते मुंबई लाँग मार्च काढुन आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी करणार आहे .ही लढाई आमच्यासाठी 'करो या मरो' ची असणार आहे.
**–विनोद चव्हाण, राज्य अध्यक्ष, महाराष्ट्र ग्रामरोजगार सेवक संघ.**



# गोराडखेडा येथे दोन जणांचा अपघातात मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यात पाचोरा तालुक्यातील गोराडखेडा येथे दोन जणांचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना शुक्रवारी शहरात ट्रॅक्टरच्या पुढे जाण्याच्या नादात दुचाकीवर मागे बसलेले ७८ वर्षीय वृद्ध पडल्यानंतर अज्ञात वाहनाखाली सापडून त्यांचा मृत्यू झाला. दुसऱ्या एका घटनेत जळगावात दाम्पत्याच्या दुचाकीला अपघात होऊन वृद्ध महिलेचा मृत्यू झाला. पारोळा येथील रहिवासी युसूफ शेख (७८) आणि अस्लम शेख (४४) हे पिता-पुत्र जळगावातील जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात नेत्रतपासणीसाठी आले होते. तीन दिवसांपासून ते रुग्णालयातच होते. शुक्रवारी त्यांना घरी सोडण्यात आले. अस्लम हे वडील युसूफ यांच्याबरोबर दुपारी दुचाकीने पारोळा येथे घरी जात होते. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहावरील गुजराल पेट्रोलपंपासमोरील उड्डाणपुलावरून ते जात असताना युसूफ यांचा अचानक तोल गेला. ते रस्त्यावर पडले. त्याचवेळी मागून येणाऱ्या भरधाव वाहनाखाली आले. त्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला.



# ढगाळ वातावरणाचा हरभरा, गहू पिकाला फटका

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये ठिकठिकाणी आज धुकेचधुके धुईचे चित्र होती पाहटे व सकाळी धुईमुळे रस्ते दिसता दिसत नव्हते या धुईचा फटका आता हरभरा मका, गहु, शाळू ज्वारी आदि रब्बी पिकांना बसण्याची शक्यता आहे.माहे नोव्हेंबर -२०२३ मधे ढगाळ वातावरण व अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे पिके मातीमोल केले तर आता नवीन वर्ष जानेवारी -२०२४ मधेही सतत ढगाळ वातावरण कमीअधिक थंडी,पाऊस व त्यात नव्याने धुई त्यामुळे रब्बी पिक हंगाम मधेही पिकांची वाट लावण्याचे चित्र आहे. नोव्हेंबरमधे झालेल्या आवकाळी पावसामुळे रब्बी पिक हंगाम ची पेरा केला तो वाया गेला नंतर शेतकऱ्यांनी दुबार पीक पेरा केला अवकाळीचा ओलावा जमीनीत टिकून राहील्याने पेरा नंतर जोरदार उगवणी व वाढ सुरु आहे. अशात पुन्हा निसर्गाने आपला खेळ सुरुच ठेवला व सतत ढगाळ वातावरण बदलते हवामान धुई असे चित्र निर्माण झाली आहे. मका गहु हरभरा शालु ज्वारी पिके चांगली असतांना दुषित वातावरणामुळे पुन्हा फटका बसत आहे.तर सततच्या दुषित वातावरणामुळे मानवी जीवनावरही परिणाम जाणवत असुण वृध्द लहान मुले बालके वातावरणामुळे परेशान झाले आहे थंडी ताप पडसा खोकला आदी आजारांचे वाढते चित्र दिसून येत आहे.

# रोहित्रातील तांब्याची तार, प्लेटांचीही चोरी

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** जिल्ह्यातील चाळीसगाव शहरानजीकच्या एमआयडीसी परिसरातील रोहित्रातून सुमारे चार लाखांची तांब्याची तार आणि प्लेटा चोरी प्रकरणातील संशयितांच्या शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरणाच्या पथकाने मुसक्या आवळल्या. दोन संशयितांकडून सुमारे एक लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, चाळीसगाव शहरानजीकच्या एमआयडीसी परिसरातील मॉर्निसा बायो ऑर्गेनिक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील रोहित्रातील सुमारे चार लाख १० हजार रुपयांची तांब्याची तार आणि प्लेटांची चोरी झाली होती. त्यासंदर्भात सचिन नागरे (रा. हिरापूर रोड, चाळीसगाव) यांच्या तक्रारीवरुन शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील अहमद शेख इस्माईल (२७) आणि सलमान बेग हुसेन बेग (२६, दोन्ही रा. जहांगीरवाडी, चाळीसगाव) यांची माहिती तपासाधिकारी दीपक पाटील यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना माहिती दिली. त्याअनुषंगाने सहायक फौजदार शशिकांत महाजन, हवालदार योगेश बेलदार, नितीन वाल्हे, भरत गोराळकर, अमोल पाटील, नंदकिशोर महाजन, अजय पाटील, अमोल भोसले यांच्या नव्यानेच रचना करण्यात आलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासचक्रे फिरवत दोघा संशयितांच्या मुसक्या आवळल्या.



# ज्येष्ठांच्या आशीर्वादामुळेच विकासरथ पुढे नेऊ शकलो : आ. फारुख शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील सर्व्हे क्र.४०४ (सिराजुल उलूम मदरसा) येथील मोकळ्या जागेस कुंपण भिंत बांधणे. या १ कोटी खर्चाच्या कामाचा शुभारंभ मौलाना मुक्तार अहमद मदनी यांचे शुभहस्ते संपन्न झाला. आ.फारुख शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास  मौलाना हाफिज हिफजुर रहेमान, मौलवी शकील, मौलाना शोएब मौलाना अब्दुल्ला, मौलाना जिया उर रहमान, मौलाना अन्वर उल हक, मौलाना अब्दुला, मौलाना एकलाक, मौलाना हेलाल, मुफ्ती झिया उर, मौलाना रिझवान, मौलाना इर्शाद, मौलाना जमालुद्दिन, मौलाना मोहम्मद आरिफ, हाफिज एयाज अहमद, कारी काशीद अली, सलीम शाह,नगरसेवक नासिर पठाण, नगरसेवक सईद बेग, नगरसेवक मुकतार अन्सारी, नगरसेवक आमिर पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मौलवी शकील यांनी आ.फारुख शाह यांच्या विकास कामाचा आढावा मांडला. सिराजुल उलूम मदरसा  शहरातील नामांकित मदरसा असून याठिकाणी जवळ जवळ ८०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुमारे १ कोटी खर्चातून मोकळ्या जागेस कुंपण भिंत बांधणे, प्रवेशद्वार आणि इतर कामे केले जाणार  आहेत. मदरसा सिराजुल उलूम येथे झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इलियास सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मौलाना अब्दुला यांनी केले.मौलाना मुक्तार अहमद मदनी यांनी आशिर्वाद दुवा देवून कार्यक्रमाचा समारोप केला.

# जेजुरी गडावरील प्लाईंग रायनो बंद व्हावा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** प्लाईंग रायनो (पॅरामोटर) भाविकांची खुप मोठ्या प्रमाणावर जेजुरी गडावर / परिसरामध्ये लुट करत असल्याचे निदर्शनास आल्याने या प्रश्नी रिपब्लिकन पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे यांनी आवाज उठविला आहे. ही लूट थांबावी म्हणून तहसिल कार्यालय आणि जेजुरी पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आलेले आहे. निवेदनात काही मुद्दे नमूद करण्यात आलेले आहेत. अमोल साबळे यांनी असे म्हटलेले आहे की, जिजामाता हायस्कुल/एस.पी. कॉलेज विदयार्थीनी / विदयार्थी यांना कर्कश आवाजाने ध्वनीप्रदुषणाचा सामना करावा लागतोय.तसेच जवळुनच महावितरणाची लाईन गेली आहे. केव्हाही दुर्घटना घडू शकते.प्लाईंग रायनो (पॅरामोटर) याचा कोणत्याही प्रकारचे जी.एस.टी. बिलींग दिले जात नाही.प्लाइंग रायनो (पॅरामोटर) याचा कोणत्याही प्रकारचा इन्शुरन्स काढला जात नाही.त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका आहे.तसेच कोणत्याही प्रकारचे सुरक्षा व्यवस्था नसल्याचे निदर्शनास आले आहे.

जेजुरी गडाच्या पावित्र्यास,पुरात्वास इजा होण्याची खूप मोठ्या प्रमाणात शक्यता असल्या कारणाने प्लाईंग रायनो (पॅरामोटर) त्वरित बंद करावे अशी विनंती अमोल साबळे यांनी केलेली आहे.त्यामुळे या प्रकरणी लक्ष देण्याची मागणी केलेली असून या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए)) या पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुद्धा अमोल साबळे यांनी दिलेला आहे.

# बाजारसावंगी येथील पर्जन्यमापक यंत्रणा कागदोपत्रीच; महसूल विभागाला विसर

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे पर्जन्यमानमापक यंत्रणा कागदोपत्रीच असुन विभागाला त्याचे विसर पडल्याचे चित्र आहे.

महसूल विभागांचे काम पाऊस मोजनी पर्जन्यमानमापक यंत्रणा द्वारे करण्यात येते व पाऊस कमी अधिक यावरच दुष्काळ सुविधा सवलती मिळतात.परंतु मंडळ मधे बाजार सावंगी येथे पर्जन्यमानमापक यंत्रणा बसविण्याची हालचाली गत दोनतीन वर्षांपासून सुरु होत्या परंतु तलाठी सजा चे तलाठी बदलत गेले ते काम तसेच पडून राहिले तलाठी चव्हाण यांच्या काळात पाऊस मोजनी पर्जन्यमानमापक यंत्रणा बसविण्याची हालचाली सुरू झाल्या यात तलाठी कदम मॅडम आल्या त्यांनी यावर जागा पाहणी यंत्रणा लावण्याची प्रक्रिया हाती घेतली त्यांचीही अचानक बदली झाली व तद्नंतर तीनचार तलाठी बदलून आले गेले मात्र ते पर्जन्यमान मापक यंत्रणा कागदोपत्रीच पडून आहे.कुठली हालचाली नाही.या संदर्भात नागरिकांनी तक्रारी केल्या वर्तमानपत्रात बातम्या ही छापून आल्या परंतु पाउस मोजनी यंत्र पर्जन्यमानमापक काही बसवल्या गेले नाही.अद्यापही ते प्रकरण तसेच कागदोपत्री दबुन  पडून आहे.गतवर्षि पावसाचे प्रमाण अत्यल्प असताना पैसेवारी लावण्यात खुप उशीर लागला.जेंव्हाकी शासनाने महसूल मंडळ एकच ठिकाणी पर्जन्यमान मापक न बसवता गावागावांत बसविले पाहिजे कारण निसर्गाचे पावसाची हुलकावणी तसेच सारखे पाऊस न पडता कमी अधिक वा नाही असी स्थीती पावसाची असते त्यामुळे गावागावांत पर्जन्यमान मापक बसविण्याची गरज आहे.परंतु बाजार सावंगी येथे महसूल विभागीय कार्यालय अधिकारी तथा तहसील कार्यालय अंतर्गत हे पर्जन्यमान मापक बसविण्याची हालचाली का व कोठी थांबली, याचे बजट चे काय झाले याची सखोल चौकशी प्रकरण मार्गी लावण्याची मागणी शेतकरी नागरिकांतून होत आहे.



# वैजापूर तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून तालुकाध्यक्षपदी बाबासाहेब धुमाळ, उपाध्यक्षपदी मोबीन खान तर सचिवपदी फैसल पटेल यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येथील नगरपालिकेच्या फुले - आंबेडकर सभागृहात पार पडलेल्या कार्यक्रमात प्रथम दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच त्यांच्या जीवनचारित्र्यावर प्रकाश टाकणारी भाषणे झाली. पत्रकार संघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांची निवड झाल्यानंतर त्यांचा सत्कार करण्यात आला. वैजापूर तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांसाठी पत्रकार विजय गायकवाड व दीपक थोरे यांनी नावे सुचवली. अमोल राजपूत यांनी त्यास अनुमोदन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल त्रिभुवन यांनी केले तर प्रवीण भाडाईत यांनी आभार मानले. याप्रसंगी पत्रकार काकासाहेब लव्हाळे, मन्सूर अली, सुयोग वाणी, नितीन थोरात, बाबासाहेब सरोदे, ज्योती हांगे, भारती कदम, ज्योती सोमवंशी आदी उपस्थित होते. या निवडीबद्दल आमदार रमेश बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगाकवर, राष्ट्रवादीचे नेते भाऊसाहेब ठोंबरे, भाजप नेते डॉ दिनेश परदेशी, माजी नगराध्यक्ष शिल्पा परदेशी, बाळासाहेब संचेती, साबेरखान, उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसीलदार सुनील सावंत, मुख्याधिकारी भागवत बिघोत, पोलिस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे, शेख अकिल, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य एकनाथ जाधव, जिल्हापाध्यक्ष कल्याण दांगोडे, जे. के. जाधव, माजी जिल्हा  परिषद सदस्य पंकज ठोंबरे यांनी स्वागत केले.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# मराठा सेवा संघाच्या वतीने दशरात्रोत्सव साजरा

## सामान्य ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धेचे आयोजन



आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** जिल्ह्यातील कोकलगावच्या स्वामी विवेकानंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मराठा सेवा संघाच्या वतीने दशरात्रोत्सव साजरा केला जात आहे.१२जानेवारी पर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर उत्सवात मराठा सेवा संघाचे संस्थापक शिवश्री पुरुषोत्तम खेडेकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधुन विध्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवन चरित्रांची पुस्तके भेट देण्यात आली आहेत. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य बाळासाहेब गोटे होते,तर संतोष सरोदे, शीला कांबे, उत्सव समितीचे अध्यक्ष एम.जी. इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. राजमाता जिजाऊ माँ साहेब यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. दरम्यान उपस्थित मान्यवरांनी स्वामी विवेकानंद, संत गाडगे बाबा, महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदींच्या जीवन कार्यावर प्रकाश झोत टाकून विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात परिसरातील तोंडगाव, टो, केकतउमरा, राजगाव, धुमका व स्थानिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपला सहभाग घेतला आहे. संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक भाऊसाहेब उर्फ नारायणराव काळबांडे यांच्या मार्गदर्शनात चालणाऱ्या या कार्यक्रमात मराठा सेवा संघ व त्यांच्या इतर कक्षांचे समजाउपयोगी कार्याची माहिती देण्यात आली. संस्थेचे शिक्षक विजय काळबांडे यांनी राष्ट्रसंताच्या ग्रामगीता मधील " जीवन शिक्षण " या आध्यायावर व्याख्यान दिले. शाळेच्या विद्यार्थीनी कु. दिपाली उचित हिने सूत्रसंचालन केले तर कु. आरती उचितने सर्व उपस्थितांचे आभार मानले.



# राजूर येथील लिटल स्टार स्कूलच्या विद्यार्थ्यांनी लुटला सहलीचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** भोकरदन तालुक्यातील राजूर येथील लिटल स्टार प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील सिध्दार्थ उद्यान, पाणचक्की, बीबीचा मकबरा, वेरूळच्या लेण्या, भद्रा मारोती यासारख्या ऐतिहासिक व धार्मिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद लुटला. या शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी उद्यानातील विविध प्राण्यांचे निरक्षण करून त्यांची ओळख करून घेतली. चिमुकल्यांनी पहिल्यांदाच मत्सालय,ससा,हत्ती, मगर, वाघ, सिंह यांसारखे प्राणी प्रथमच पाहिल्याने त्यांच्या मनात कुतूहल निर्माण झाले होते. वस्तू संग्रहालय व ऐतिहासिक वास्तूं संदर्भात जाणून घेतले. उद्यानातील खेळणी तसेच झुकझुक गाडीचाही मनमुराद आनंद लुटला. पाणचक्की, बीबीचा मुकबरा, देवगिरी किल्ला, वेरूळची लेणी याविषयी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका शितल आढे, शिक्षिका गीता घुगे, वैशाली कायदे, रेश्मा शेख यांनी सहलीचे उत्तम नियोजन केले होते. सहलीसाठी पालकांनीही योग्य ते सहकार्य केले.

# बजाज फिन्सर्वचे एक पाऊल पर्यावरणपुरक दिशेकडे : गुंतवणूकदारांचाही होणार फायदा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** बजाज फिन्सर्व च्या ॲप किंवा संकेतस्थळावर बुक केलेल्या एफ डी वर गुंतवणूकदारांना आकर्षक व्याज दर नव्या वर्षाच्या दोन तारखेपासून मिळणार आहे. या बजाज फिन्सर्व च्या घोषणेमुळे गुंतवणूकदारांचा फायदा तर होणारच आहे मात्र पर्यावरण पुरक दिशेकडे ही एक पाऊल नववर्षात टाकले जाणार आहे .

डिजिटल क्रांती च्या दिशेने टाकलेले हे एक पाऊल आहे. जे पर्यावरण पुरक असून गुंतवणूकदारांसाठी हा एक सहज व सोपा डिजिटल प्रवास असणार आहे . या डिजिटल प्रक्रीयेचा अवलंब करणाऱ्यांना उच्च व्याजदराचा लाभ देखील मिळणार आहे .

मागील दोन वर्षात आमच्या ठेवीची संख्या दुप्पट झाली आहे . ही दुप्पट वाढ म्हणजे बजाज ब्रॅण्ड वर गुंतवणूकदारांनी दाखवलेल्या विश्वासाची पोच पावती आहे, अशी माहिती बजाज फिन्सर्व चे मुदत ठेवी आणि गुंतवणूक विभाग प्रमुख सचिन सिक्का ही या घोषणेच्या प्रसंगी दिली. जेष्ठ नागरिक यांनी ४२ महिन्यांसाठी मुदत ठेवी जर ॲप किंवा संकेतस्थळावर बुक केल्या तर त्यांना ८.८५% वार्षिक व्याज दर मिळणार आहे. ६० वर्षांखालील ठेवीदारांना ८.६० % वार्षिक व्याज दर ॲप किंवा संकेतस्थळावर बुक केल्या वर मिळणार आहे नवीन मुदत ठेवी आणि त्यांच्या परिपक्वते नंतर ४२ महिन्या करिता केल्या जाणाऱ्या ५ कोटी रुपयांपर्यंत च्या ठेवीवरील सुधारीत व्याज दर लागू केले जातील. बजाज फिन्सर्व कंपनी देशातील सर्वात मोठी ठेव घेणारी एन बी एफ सई म्हणून उदयास आली आहे . ३० सप्टेंबर २०२३ रोजी ५४, ८२१ कोटी आहे . बजाज फायनान्स मुदत ठेवी उपक्रम हा सर्वाधिक स्थिरता असलेल्या उपक्रम असून क्रिसल ( सी आर आय एफ आय एल ) द्वारे एएए / स्थिर आणि आय सी आर ए द्वारे एएए स्थिर प्रमाणित केले गेले आहे . ज्या मुळे गुंतवणूकदाराकरिता हा गुंतवणूकीचा एक सुरक्षित असा पर्याय ठरतो .३ जानेवारी २०२४ बजाज फ़ायनान्स लिमिटेड., बजाज फ़िन्सर्वचा एक भाग असून, देशातील सर्वात मोठ्या आर्थिक सेवा समूहांपैकी एक आहे, ज्यांच्याद्वारे त्यांच्या ॲप किंवा संकेतस्थळाचा माध्यमाने बुक केलेल्या डिजिटल मुदत ठेवींवरती(एफ़डी) आकर्षक असा ८.८५,% चा व्याज दर दिला जाणार आहे. कंपनीचा ॲपचा माध्यमातून गुंतवणूकीची एक बाजारपेठ खुली होणार आहे, जिथे ग्राहकांना म्युच्युअल फ़ंडाचे देखील अनेक पर्याय उपलब्ध असतील.

# श्रुती म्हात्रे यांना कामगार मित्र गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पनवेल :** तालुक्याचे नामांकीत शिक्षण संस्था प्रशिक सोसायटीच्या वतीने दरवर्षी वर्धापन दिनानिमित्त वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना प्रशिक सन्मान देऊन गौरव करण्यात येत असतो. यावेळी प्रशिक सन्मान २०२३ च्या मानकरी ठरल्या आहेत श्रुती शाम म्हात्रे यांनी कामगार क्षेत्रात उत्कृष्ट कामगीरी केल्याबद्दल व कामगार क्षेत्राच्या अलौकिक कार्याबद्दल त्यांना शाम म्हात्रे स्मृती " कामगार मित्र " गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार रायगड पब्लिक स्कुल, देवीचा पाडा या शाळेच्या प्रांगणात दि. ६ जानेवारी २०२४ रोजी सायं. ४:०० वाजता केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री भारत सरकार मा. रामदासजी आठवले यांच्या हस्ते दिला जाणार असुन याबद्दल श्रुती म्हात्रे ह्यांचे संपुर्ण तालुक्यातून अभिनंदन होत आहे. कामगार क्षेत्रामध्ये प्रचंड आनंदाचे वातावरण असुन कामगार चळवळीमध्ये काम करणाऱ्या श्रुती म्हात्रे यांच्यावर सर्व कामगारांनी अभिनंदनाचा वर्षाव केला.

# श्री संत सोपानकाका जेजुरीतून दिंडीचे प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** श्री संत सोपानकाका संजीवनी समाधी सोहळ्यात सहभागी होण्याकरिता दरवर्षी प्रमाणे जेजुरी येथून टाळ मृदूंग हरीनामाचा गजर करीत पायी दिंडीचे शनिवार प्रस्थान झाले जेजुरी सासवड मोरगाव सांप्रदाय ट्रस्ट च्या वतीने गेली सोळा वर्ष सातत्यानेही सुरु असून हरिभक्त पारायण कै दशरथतात्या जगताप यांनी या भागवत सांप्रदाय ट्रस्ट ची स्थापना करून पायी दिंडी सोहळा सूरू केला आहे या परिसरातील अनेक सामप्रदायक वारकरी यात सहभागी होत असतात यंदा ही संत साहित्य असलेल्या या दिंडीचा प्रारंभ तुलसी, मृदूंग पताका पूजनाने करण्यात आला यात उपस्तिथ मान्यवर श्री मार्तंड देवसंस्थान ट्रस्ट अध्यक्ष पोपट खोमणे , उद्योजक नंदकुमार निरगुडे, पोपट नाना पवार,प्रशांत लाखे,बापूसाहेब



भोर,नाना बारसडे, महादेव कापरे,संजय शिर्के,संदीपअप्पा जगताप, शिवराज झगडे, सर्जेराव कदम,संजय भोसले यांचा सन्मान करण्यात आला.दिंडी प्रमुख एन डी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली या दिंडीच्या प्रस्थानाचे आयोजन करण्यात आले होते, जेजुरी पंचक्रोशीतील मान्यवरानी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवत दिंडी सहभाग दर्शवीला जेजुरी ग्राम प्रदक्षणा घेत पायी दिंडी लवथळेश्वर, साकुर्डे, शिवरी खळद मार्ग पालखी सासवडकडे रवाना झाले कार्यक्रमाचे आयोजन नामदेव शेरे,जयवन्त जगताप छबन कामथे,राहुल बयास संतोष दरेकर यांनी केले.

# आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** शेतातील नाला वळविण्यात आल्याने पिकांचे नुकसान झाले. वारंवार मागणी करून न्याय मिळत नसल्याने शेतकऱ्याने आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदारांनी शेतकऱ्याला न्याय देण्याऐवजी त्याच्या विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले. आर्णी तहसील प्रशासनाच्या या कारभाराविरोधात सर्व स्तरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. गौतम गेडे (रा. जवळा, ता. आर्णी) असे विष प्राशन करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी नववर्षच्या पहिल्याच १ जानेवारी रोजी आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदार भोसले यांनी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. यावर आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी संताप व्यक्त केला.अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी सन्मानाने वागावे, असा इशारा त्यांनी दिला आहे.



# नांदेड शहरात 'सावित्री - रमाई' महोत्सवाचे आयोजन

## अशोक चव्हाण यांची उपस्थिती; सुषमा अंधारे यांच्या व्याख्यानाकडे आंबेडकरी समाजाचे लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील बुद्धीष्ट रिसर्च फाऊंडेशनच्या वतीने रविवार दि. ७ जानेवारी रोजी दुपारी ३ वा. शहरातील कै. डॉ. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात सावित्री रमाई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची विशेष उपस्थिती राहणार असून या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंगाराणी अंबुलगेकर हे राहणार असून माजी मंत्री डी. पी. सावंत, माजी विधानपरिषद सदस्य अमरभाऊ राजूरकर, प्रख्यात वक्त्या सुषमाताई अंधारे, आरसीसी कोचिंग क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, जिल्हा कोषागार अधिकारी ज्योती बगाटे, सायन्स कॉलेजचे





उपप्राचार्य प्रा. डॉ. लक्ष्मण शिंदे, जि.प. च्या प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रोहिणी एंगडे, ज्येष्ठ ओबीसी नेते बालाजी इबितदार, युवा आंबेडकरी नेते राहुल लोहबंदे यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती निमंत्रक तथा माजी नगरसेवक महेंद्र पिंपळे, संयोजक प्रवीणकुमार कुपटीकर, स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, संयोजन समितीच्या अध्यक्षा अंजली मुनेश्वर यांनी आज येथे दिली. मुक्ता साळवे नगरीत ( कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृह ) सावित्रीमाई फुले यांची १९३ वी जयंती आणि माता रमाई आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त सावित्री रमाई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात कवयित्री रुपाली वागरे वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटनपूर्व कविसंमेलन होणार आहे तर उद्घाटन सत्रानंतर सुप्रसिद्ध व्याख्यात्या सुषमा अंधारे यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान होणार आहे. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या सिने पार्श्वगायिका कविता राम आणि संचाचा बुद्ध भीम गितांचा बहारदार कार्यक्रम संपन्न होईल. दरम्यान, कु. श्रीया पाटील या बालिकेचे रमाईगितावर नृत्य प्रहसन होणार आहे. तसेच सावित्री रमाई जीवन गौरव पुरस्कार, माता रमाई आंबेडकर विशेष सन्मान पुरस्कार, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले समाजभूषण व त्यागमुर्ती माता रमाई समाजभूषण पुरस्काराचे वितरण होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. कल्पना जाधव, डॉ. भीमराव हटकर हे करणार आहेत. शिवसेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे आंबेडकरी विचार मंचावरून काय बोलणार याकडे आंबेडकरी समाजाचे लक्ष लागले आहे.

महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बी. आर. फाऊंडेशनचे संस्थापक कोंडदेव हटकर, अध्यक्ष सुमेधा हटकर, सचिव अर्चना गवारे, संयोजन समितीचे कार्याध्यक्ष सत्यपाल सावंत, उपाध्यक्ष डॉ. साहेबराव ढवळे, सहकार्याध्यक्ष अजय एडके, सचिव जी. पी. मिसाळे, सहसचिव डॉ. राम वनंजे, राज गोडबोले, सदस्य विजय सोंडारे, लक्ष्मीकांत हटकर, संध्या जांभळे, सुनिता कानिंदे, शोभा कोकरे, सुनिता वासाटे, रमेश कसबे, एन. टी. पंडित, आर. पी. कोकलेगावकर, सी. एस. ढगे, एम. डी. जोंधळे, नितिन एंगडे, मिलिंद नरवाडे, डॉ. किशन गायकवाड, संजय जाधव, नागोराव डोंगरे, अनुरत्न वाघमारे, पांडूरंग कोकुलवार, मारोती कदम, शंकर गच्चे, कैलास धुतराज, रणजीत गोणारकर, चंद्रकांत कदम, प्रशांत गवळे, प्रकाश ढवळे नागलगांवकर तसेच सल्लागार एन. डी. गवळे, प्रफुल्ल सावंत, प्रा. कैलास राठोड, सुरेश हटकर आदींनी केले आहे.



# मनुष्याने संयम बाळगल्यास स्त्री भयमुक्त जगेल : राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचा सूर

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मनूष्यप्राण्याने संयम बाळगल्यास स्त्री भयमुक्त जगेल ! सर्वांनी संयम पाळण्याची गरज आहे. स्त्रीला अनंत काळाची माता म्हणुन अंतःकरनातुन मान दिला तरच स्त्री - पुरुष समानता नांदेल व धरतीचे नंदनवन होईल असा सूर राजे धर्मराव कला-वाणिज्य महाविद्यालय आलापल्ली व माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजिय राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेतील स्पर्धकांचा होता. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीचे औचित्य साधुन राजे धर्मराव कला-वाणिज्य महाविद्यालय आलापल्ली येथे 'सद्यस्थितीत महिला सुरक्षित आहेत का?' ह्या विषयावर राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. यू. टिपले हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री. एम. पी. हडपे, माजी विद्यार्थी व ग्रंथपाल डॉ. एन. टी. खोब्रागडे, माजी विद्यार्थिनी व प्राध्यापिका कु. ए. एस. मद्दीवार व महाविद्यालयाचे जेष्ठ प्राध्यापक भुगोलविभाग प्रमुख डॉ. आर. एन. कुबडे हे हजर होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ.मारोती ऊध्दवराव टिपले म्हणाले की, सावित्रीबाईंनी लावलेल्या रोपट्याचे विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे. आज महिला विविध क्षेत्रात सेवा अर्पण करीत आहे. परंतु स्त्री भयमुक्त जिवन जगत असेल तरच ह्या वटवृक्षाची फळे समाजाला चाखता येईल. सदर कार्यक्रमाला राज्यभरातील विवीध १० महाविद्यालयातील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. ५००० रु चे प्रथम पारितोषिक सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर चे प्रलय श्याम मशाखेत्री ह्यांने पटकाविले. ३००० रु चे द्वितीय पारितोषिक आंबेडकर महाविद्यालय चंद्रपूर चे अविनाश एकनाथ रामटेके ह्याने पटकाविले तर तृतीय पारितोषिक इग्नु रिसर्च सेंटर नागपूरचे रितेश कुमार तिवारी ह्याने पटकाविले. सदर सर्व व्यवस्था व पारितोषिके महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेतर्फे आयोजित करण्यात आली होती. ५००० रु चे प्रथम पारितोषिक ॲड. राहुल बावने ह्यांच्या तर्फे ३००० रु चे द्वितीय पारितोषिक माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री. एम. पी. हडपे ह्यांच्या तर्फे व २००० रु चे तृतीय पारितोषिक ग्रंथपाल डॉ. एन. टी. खोब्रागडे ह्यांच्या तर्फे आयोजित केले होते. प्रमाणपत्राची व्यवस्था माजी विद्यार्थी प्रवीण फुलझेले ह्यांनी, नास्त्याची व्यवस्था माजी विद्यार्थिनी प्राध्यापिका कु. अर्चना मद्दिवार ह्यांनी तर चहाची व्यवस्था माजी विद्यार्थी किरणकुमार खोब्रागडे ह्यांनी सांभाळली. कार्यक्रम गोंडवाना विद्यापिठ गडचिरोली अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयमधुन आगळावेगळा कार्यक्रम म्हणुन चर्चीला जात आहे.

# ऐकार्जुना येथे 25 हेक्टरवर उभे राहणार उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र

## मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून कृषी विकासाला चालना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्यात भाजीपाला पिकांची उत्पादकता, गुणवत्ता, बिजोत्पादन, काढणी पश्चात तंत्रज्ञान आदी विषयांवर संशोधन व्हावे, एवढेच नव्हे तर विदर्भातील भाजीपाला पिकासंदर्भात सुधारीत तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने, राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नातून ऐकार्जुना (ता. वरोरा) येथे उच्च तंत्रज्ञानयुक्त भाजीपाला संशोधन केंद्र उभे राहत आहे. कापूस उत्पादन संशोधन केंद्राप्रमाणेच जिल्ह्यात भाजीपाला संशोधन केंद्र असावे, असा विचार एक महिन्यापूर्वी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केला. याबाबत श्री. मुनगंटीवार यांनी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडे मागणी केली. ना.मुनगंटीवार यांच्या मागणीला अल्पावधीतच कृषी मंत्री श्री. मुंडे यांनी मान्यता देऊन याबाबतचा आदेश जिल्हा कृषी महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी (दि.3 जानेवारी) पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्याकडे सुपूर्द केला. त्यामुळे आता ऐकार्जुना येथे 25 हेक्टर जागेवर 31 कोटी 90 लक्ष रुपये खर्च करून बांधण्यात येणा-या भाजीपाला संशोधन केंद्राचा मार्ग मोकळा झाला आहे.

भारत हा भाजीपाला उत्पादनात चीन नंतर जगात दुस-या क्रमांकावर आहे. जगात घेतल्या जाणा-या एकूण भाजीपाला उत्पादनाच्या 15 टक्के भाजीपाला उत्पादन भारतात होते. भाजीपाला उत्पादनासाठी लागणारा कमी कालावधी, जास्त उत्पादन, भरपूर प्रमाणात उपलब्ध असणारी आहार पोषण मुल्य व शेती क्षेत्रात आणि शेती बाहेरील क्षेत्रात रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता यामुळे भाजीपाला हा महत्वाचा घटक मानला जातो.

भारतीय वैद्यकीय अनुसंधान परिषदेच्या निकषानुसार प्रति व्यक्ती प्रति दिन 300 ग्रॅम भाजीपाला आहारात घेणे आवश्यक आहे. परंतु प्रत्यक्षात प्रतिव्यक्ती ऐवढा भाजीपाला आपल्या देशात उपलब्ध नाही. भाजीपाल्याची अयोग्य काढणी, हाताळणी आणि टिकविण्याच्या अपु-या सुविधेमुळे उत्पादीत भाजीपाल्याचे जवळपास 30 ते 40 टक्के नुकसान होते.

विदर्भातील अनुकूल हवामान व जमीन यामुळे बहुतेक सर्वच भाजीपाला पिकांची लागवड केली जाते. चंद्रपूर जिल्ह्यात प्रामुख्याने मिरची, हळद, वांगी, टोमॅटो, कांदा, फुलकोबी, पत्ताकोबी, मुळा इत्यादी भाजीपाल्याची पिके घेतली जातात. चंद्रपूर जिल्ह्यात प्रमुख भाजीपाला पिकाखाली एकूण 2432 हेक्टर क्षेत्र असून त्यापासून 17802 मेट्रीक टन उत्पादन होते. जिल्ह्यातील लागवडीखालील जमीन मुख्यतः खोल गर्दकाळी (56.60 टक्के), उमळ काळी जमीन (25.5 टक्के), मध्यम गर्द काळी जमीन (10.5 टक्के) असून पर्जन्यमान 1100 ते 1500 मि.मी. आहे. भाजीपाला पिकाच्या लागवडीसाठी जिल्ह्यात उपयुक्त जमीन, मुबलक पाणी व मजुरांची उपलब्धता असल्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यात भाजीपाला लागवडीस मोठा वाव आहे.

भाजीपाला पिकात अनुवंश शास्त्राचा अभ्यास करून सुधारीत / संकरीत वाण विकसीत करणे व गुणवत्तापूर्ण उत्पादनास चालना देणे. भाजीपाला पिकांच्या देशी वाणांचे संवर्धन करणे आणि या पिकांच्या लागवडीस चालना देणे. दुर्मिळ अशा रानभाज्यांचे संवर्धन व लागवड करणे. भाजीपाला पिकांचे लागवड तंत्रज्ञान विकसीत करून गुणवत्तापूर्वक उत्पादन वाढविणे. पिकांच्या दर्जेदार उत्पादनासाठी ठिबक सिंचन, फर्टिगेशन इत्यादी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करणे. भाजीपाला पिकांचे रोपवाटिका व्यवस्थापन व सुधारीत तंत्रज्ञान विकसीत करणे. बिजोत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे. संरक्षित भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान विकसीत करणे. भाजीपाला पिकांवर येणा-या किडी व रोगांचा अभ्यास करून त्यावर नियंत्रणाचे प्रभावी उपाय शोधणे. भाजीपाला पिकांची प्रक्रिया, मुल्यवर्धन आणि साठवणूक यावर संशोधन करणे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर